रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३० एप्रिल २०२३



# खारघरचे 'बळी'

## सरकारच चुकले तर शिक्षा कोणाला ?

**आधुनिक केसरी**


**महाराष्ट्र राज्य सरकारने निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना खारघरच्या खुल्या मैदानात व लाखोंच्या उपस्थितीत 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार बहाल केला. यामागे सरकारचा हेतू चांगलाच होता. पण प्रशासकीय पातळीवर नियोजन चुकले! निष्काळजीपणा भोवला! त्यात १४ श्रीसेवकांचा मृत्यू झाला. हे शिंदे- फडणवीस सरकारने ही चूक मान्य करावयाला हवे. राज्यात सरकार कोणाचेही असो! दुर्घटना टळलेल्या नाहीत. या दुर्घटनेचे विरोधी पक्ष नेते राजकीय भांडवल करू पहात आहे. तसेच या पुरस्काराला जातीय चष्म्यातून टीका केली जात आहे, हे दुर्देव आहे. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. देशात दुर्घटना व अपघातात! यात लाखो लोक प्राण गमावतात. नैसर्गिक आपत्तीत भूकंप, पूर, वादळ, वीज पडणे, दरड कोसळल्याने अनेकांचा मृत्यू होतो! तर माणसांच्या निष्काजीपणामुळे अपघात आणि दुर्घटना होत असतात!**

राष्ट्रीय गुन्हा अन्वशेन च्या अहवालानुसार २०२१ मध्ये देशात अपघातात सुमारे १ लाख ५५ हजार ६२२ जण मृत्यू पावले. गृह विभागाच्या२०२१ च्या अहवालानुसार २०१८ ते २१ या तीन वर्षात नैसर्गिक आपत्तीत ६८०० जण मृत पावले, भारतात वीस वर्षात ७९. ५ अब्ज डॉलर म्हणजे सुमारे ५९ खर्व रूपायांचे नुकसान झाले. याबाबत केंद्राने २००५ मध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा केला. त्यासाठी लोकांचे प्राण वाचविण्यासाठी एन.डी. आर.एफ. या सुरक्षा पथकाची स्थापना केली. या पथकाने आतापर्यंत ४ लाख ७० हजार लोकांचे प्राण वाचविले आहेत. करोना काळात भारतात ४५ लाख लोक मृत्यू पावले, अशी जागतिक आरोग्य संघटनेची ( डब्लू. एच. ओ ) माहिती आहे. खासगी व धार्मिक कार्यक्रमात दुर्घटनेत लोकांचा बळी गेल्यानंतर यात निष्काळजीपणाचा ठपका ठेऊन आयोजक, संस्था प्रमुख आदींच्या विरोधात पोलिसात गुन्हे दाखल केले जातात! इतकेच नव्हे,त्यासाठी चौकशी समिती, न्यायालयीन चौकशी केली जाते. पण त्यानंतरपुढे काय होते ? त्या अहवालात ज्या कारणामुळे दुर्घटना, घडली याची कारणे दिली जातात! पण त्याची राज्य सरकार साधी दखलही घेत नाही. भविष्यात अश्या घटना होवू नयेत निकष व याची नियमावली करत नाही. अशीच दुर्घटना१६ एप्रिल २०२३ रोजी खारघर येथे घडली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र भूषण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा सोहळा 'भूतो ना भविष्यती' असा व्हावा सरकारचा हेतू होता. यावर्षीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार अप्पासाहेब धर्माधिकारी यांना दिला. त्यामुळे काही जणांची पोटदुखी सुरु झाली. हा पुरस्कार ब्राह्मणाला दिला गेला ?असा सवाल केला गेला. 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्याची परंपरा १९९५ मध्ये भाजपा -शिवसेना युतीचे सरकारला असताना बुध्दी सुचली होती. ती पुरोगामी पक्षांना सूचलेली नाही. हा पुरस्कार हा साहित्य, क्रीडा, विज्ञान, पत्रकार, समाज सेवा कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना दिला जातो! तो जात पाहून दिला जात नाही, याचे भान असले पाहिजे. पहिला पुरस्कार १९९५ मध्ये पु.ल, देशपांडे यांना दिला गेला. त्यानंतर लता मंगेशकर ( १९९७ ) विजय भटकर( १९९९ ) सुनील गावसकर ( २००० ) सचिन तेंडूलकर ( २००१ ) भीमसेन जोशी ( २००२ ) अभय बंग( २००३ ) बाबा आमटे ( २००४ ) रघुनाथ माशेलकर ( २००५ ) रतन टाटा( २००६ ) रा.कृ. पाटील ( २००७ ) नानासाहेब धर्माधिकारी ( २००८ ) सुलोचना लाटकर ( २००९ ) तर जयंत नारळीकर ( २०१० ) अनिल काकोडकर ( २०११ ) बाबासाहेब पुरंदरे ( २०१५ ) आशा भोसले यांना ( २०२१ ) डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी ( २०२३ ) या व्यक्तींना पुरस्कार दिला. या व्यक्ती जातीपेक्षा कर्तृत्वाने महान आहेत. काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे राज्यात १९९९ ते २०१४ पर्यंत राज्यात सत्ता होती, तेंव्हा राज्य सरकारने जात पाहून पुरस्कार दिले काय ? २०१५ मध्ये शिवचरित्र लाखो लोकांपर्यंत पोहचविणारे आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर निस्सीम प्रेम करणारे बाबासाहेब पुरंदरे यांना हा पुरस्कार दिला गेला. तेंव्हा नेते शरद पवारांनी ते केवळ ब्राह्मण आहेत म्हणून त्यांना लक्ष्य केले. त्यावेळी शासकीय कार्यक्रम उधळून लावण्याची धमकी दिली गेली. तेंव्हा मनसेचे नेते राज ठाकरे यांनी पवारांच्या जातीयवादी भूमिकेवर प्रहार तर केला, तसेच 'बाबासाहेबांच्या धक्का जरी लागला तर महाराष्ट्रात तांडव करेन' असा इशारा दिला होता. २००८ नानासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला गेला. तीच समाजसेवेची परंपरा डॉ.अप्पासाहेब धर्माधिकारी चालवत आहेत. त्यांच्या समाजसेवेची दखल घेवून राज्य शासनाने २०२३ चा महाराष्ट्र भूषण दिला आहे. यात आक्षेप घेण्याचे कारण काय ? त्यांनी हा पुरस्कार मागितलेला नव्हता. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना देण्यात आलेला २५ लाखांचा निधी दिला,तो त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिला आहे. हा पुरस्कार सोहळा श्रीसदस्यांना पहाता यावा, म्हणून धर्माधिकारी यांच्या संस्थेमार्फत आवाहन केले असावे! त्यामुळे सुमारे वीस लाख श्रीसदस्य प्रेमापोटी आले होते. यात वयस्कर पुरूष महिला संख्या अधिक होते.यात १३ जण मृत पावले. त्यांचा जीव घ्यावा, असा कोणाचाही हेतू नव्हता! कार्यक्रमाला येणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेवून तेथे योग्य काळजी घेणे, ही राज्य प्रशासनाची जबाबदारी होती! भर उन्हात उघड्यावर कार्यक्रम ठेवला गेला, त्यात उशीर झाल्याने त्यात तपमानात वाढ होत गेल्याने लोक उष्माघाताने मृत्यू पावले.काँग्रेस नेत्यांच्या निवडणुकीत प्रचाराच्या भर उन्हात सभा होत असत,तेंव्हा प्रत्येकाला ड्रायफ्रूटस् चे छोटेसे पाकीट दिले जायचे! मुख्यमंत्री शिंदे यांनी जागेची पहाणी केली होती.राज्याकडे पैश्याची कमतरता नव्हती, तर मग यावेळी निष्काळजीपणा का गेला ? प्रशासनाचे नियोजन नेमके कोठे चुकले ? खर तर! राज्य शासनाला न्यायालयीन चौकशी करावयाला निर्णय घ्यावयास हवा होता.विशेष म्हणजे यावर्षी भारतात उष्णतेची लाट येणार असा अंदाज हवामान खात्याने दिलेला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६ मार्च रोजी संभाव्य उष्णतेबाबत दिल्ली येथे उच्चस्तरीय बैठक घेतली होती. हवामानामुळे पिकांवर होणारे परिणाम, उष्णतेच्या लाटेत नागरिकांनी घ्यावयाची काळजी, यासाठी आचार संहिता तयार करून जनजागृती करण्याची मौसम व विज्ञान ( IMD ) विभागाला सूचना दिलेल्या होत्या. या सूचना महाराष्ट्र शासनाने गांर्भियाने घेतलेल्या नाहीत. त्याकडे दुर्लक्षच केले. या घटनेत 'राजाने चूक केली तर शिक्षा कोणाला करावयाची' ? असा प्रश्न निर्माण होतो. विरोधी पक्ष तर या दुर्घटनेला राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न करत आहे.चुका फक्त सत्ताधारी पक्षाकडून होतात, असे नाही, त्या सगळ्यांकडून होत असतात. पण म्हणतात ना! आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही, पण दुसऱ्यांच्या डोळ्यातील कुसळ दिसते, असे विरोधी पक्ष नेत्यांचे झाले आहे.राज्यात अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत! पण या घटनेत जणू शिंदे- फडणवीस या नेत्यांनी लोकांचा जीव घेतला, आहे, असा आरोप केला जातोय! हे चुकीचे आहे.पण राज्यात अश्या दुर्घटना होवू नयेत, यासाठी विरोधी पक्षांनी राज्य सरकारला विधायक सूचना केल्या आहेत काय ?राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, विरोधी पक्ष नेते अजित पवार,माजी मुख्यमंत्री आशोक चव्हाण यांनी घटनेची न्यायालयीन चौकशीची मागणी केली. काँग्रेस पक्षाच्या नेत्याला उशीरा जाग आली दिसतेय! या नेत्यांनी पण चौकशी कोणत्या मुद्दावर करावी, याचा उल्लेख त्यांच्या पत्रात दिसत नाही. केवळ विरोधी पक्षाने वरकरणी व राजकीय टीका म्हणून चौकशीचे मागणी केली आहे. इतकेच नव्हे, धर्माधिकारी यांचे नावाचे लेटर पॅडवर डॉ. धर्माधिकारी यांचे सहीचे बनावट पत्र सोशल मिडीयावर टाकले गेले. यात 'माझा व सदस्याचा शिंदे फडणवीस यांनी वापर केला असून तेंव्हा भाजपा व शिवसेनेला मतदान करू नका',असा आशयाचा मचकूराचे बनावट पत्र तयार करण्याचा खोडसाळपणा कोणी केला ? या बाबतची पोलिसात तक्रार नोंदविली गेली आहे. पोलिस तपासात हे राजकीय षंडयत्र उजेडात येईल. महाराष्ट्रातील पूर्वीच्या दुर्घटना पहाता. दि. २३ नोव्हेंबर १९९४ मध्ये गोवारी आदिवासी समाजाने मागणीसाठी नागपूर विधानसभेवर मोर्चा निघाला होता.त्यावेळी पोलिसांनी बळाचा वापर केला. त्यामुळे मोर्चात गोंधळ उडाला, त्यात ११४ गोवारी बांधव मृत्यू पावले. त्यावेळी शरद पवार मुख्यमंत्री होते. त्यांनी राजीनामा दिला का ?पण समाज कल्याण मंत्र्यानी राजीनामा घेतला गेला. पवारांनी न्यायमूर्ती एस.एस. दानी यांची चौकशी समिती नियुक्ती केली होती. त्या चौकशीत कोणाला ही दोषी धरले गेले नाही. तसेच पुणे जिल्ह्यात मावळला २०११ मध्ये आंदोलक शेतकरी पांगल्यानंतर पोलिसांनी गोळ्या झाडल्या.त्यात चार जण मृत पावले व त्यात एक महिला होती. तेंव्हा उपमुख्यमंत्री अजित पवार होते! या घटनेत कोणाला शिक्षा झाली काय ? उलट यात शेतकऱ्यावर खटले भरले गेले! खर तर! शेतकरी संघटनेच्या आंदोलन काळात काँग्रेसने राजवटीत शेतकऱ्यांवर गोळ्या झाडून मारले गेले. पण आता आम्हीच शेतकऱ्यांचे कैवारी आहोत!असे सांगत आहेत. नांदेड जिल्ह्यात हदगाव येथे एस टी.बसला अचानक आग लागली. त्यात सुमारे चाळीस प्रवाशी जळून खाक झाले! तेंव्हा नेते शंकरराव चव्हाण यांनी चौकशी आदेश दिले व बस जर उलटली तर प्रवाशांना बाहेर निघता यावे, म्हणून बसच्या टप्पाला 'अपघात खिडकी असावी,अशी सूचना केली होती. त्यांच्या सूचनेचे एस.टी. महामंडळाने पालन केलेले नाही. २००८ मध्ये काँग्रेसची सत्ता असताना पाकिस्तानचे अतिरेकी समुद्रमार्गाने मुंबईत आलेले होते! तेंव्हा केंद्र व राज्य शासनाला याची भनक सुध्दा लागलेली नव्हती. २६ नोव्हे. २००८ ला मुंबईवर मोठा हल्ला झाला, त्यात १९७ लोकांचा बळी गेले तर ८०० वर जखमी झाले होते. देशात अनेक शहरात दहशदवाद्यांनी बॉम्ब स्फोट करून हजारोंचा बळी घेतला.तेंव्हा केंद्र व राज्य सरकारचा गाफिलपणा नव्हता काय ? पुलवामाची घटना २०१९ ची निवडणूक जिंकण्यासाठी मोदीनी घडवून आणली गेली, असे म्हणताना लाज कशी वाटत नाही. गुजरातमध्ये मोरबी येथील १८८७ चा झुलता पुल २०२२ मध्ये कोसळून सुमारे १४३ जणांचा बळी गेला. कारण क्षमतेपेक्षा अधिक लोकांना प्रवेश दिला गेला. तसेच मध्यप्रदेश इंदोर येथे २०२३ राम नवमीच्या दिवशी विहीरीवरच्या स्लॅब शेकडो भाविक उभे राहिले. तोच पडला त्यात १३ भाविक मृत्यू पावले. या दोन्ही राज्यात भाजपाचे सरकार आहे.देशात मंदिरात दर्शना निमित्ताने लखो भाविक येतात, यात चेंगराचेंगरा होवून हजारो भाविक मृत्यू पावल्याची घटना आहेत,तरी केंद्र व राज्य सरकारला जाग येत नाही! नांदेड येथे पांडूरंग शास्त्री आठवले यांचा स्वाध्याय परिवाराचा सत्संगाचा मोठा कार्यक्रम झाला होता, त्यावेळी परिवाराचे सदस्य परतत असताना मोठा अपघात झाला यात २५ जण मृत्यू पावले. मृत पावलेले व्यक्ती या एकाच गावातील व परिवारातील होते. तेंव्हा राज्य शासन मदतीला धावून आले नव्हते. आठवले व धर्माधिकारी हे माणुसकी म्हणून तरी मृत परिवाराला सांत्वनासाठी भेटण्यासाठी गेले नाहीत,याची मात्र खंत वाटते. सातारा वाई येथे २००५ मध्ये मांढरदेवीच्या यात्रेत चेंगराचेंगरी होऊन ३६० भाविक मृत्यू पावले होते. रायगड जिल्ह्यात सावित्री नदीवरचा पुल कोसळल्याने दोन बसेस व इतर वाहने नदीत पडली. त्यात ४० लोक मृत्यू पावले. मुंबईत २०१७ मध्ये पादचारी एल्फिस्टन येथे पादचारी पुलावर चेंगरा चेंगरी होवून २३ जण मृत पावले. मराठवाड्यात जालना येथे एका धार्मिक सोहळ्यात मंडपाला आग लावून भाविक मृत पावले. परभणी येथे डॉ. आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीतील ट्रकला अचानक आग लागली. त्यात महिला व मुले मृत्यू पावले. या सर्व दुर्घटना आहेत. यात महाराष्ट्र सरकारकडून दुर्घटनेतील मदत देताना आर्थिक भेदभाव केला जातोय! प्रत्येक घटनेत आर्थिक मदत समान असली पाहिजे.सामान्य माणसाला न्याय देता आले पाहिजे. कंधार तालुक्यातील हळदा येथील वामन भालेराव हे शेतकरी नांदेड येथे राहतात. त्यांची दोन कर्ती मुले मरण पावली. ते २०१७ पासून त्यांचे कुटुंब शासनाकडे आर्थिक मदतीची, दयेची भीक मागत आहेत. पण नांदेडच्या उत्तर मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींना दया येत नाही. तेच त्यांना शासनाकडून सहकार्य देण्याचे टाळटाळ करत आहेत. त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी अधिकाराचे माहिती नाही. शासन सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबाची दखल घेत नसेल तर मग शिंदे- फडणवीस सरकार राज्यातील सर्व सामान्यांचे कसे ? सामान्य माणसाचा आवाज मुख्यमंत्र्याच्या कानापर्यंत जात नाही. राज्यात अनेक दुर्घटना होतात, तरीही केंद्र व राज्य सरकारला जाग येत नाही.राज्यात शासकीय, खासगी राजकीय, धार्मिक सार्वजनिक कार्यक्रमाला लाखोच्या संख्येने लोक जेंव्हा येतात. त्यासाठी नियमावली गरज आहे. तेंव्हा राज्य शासनाने सार्वजनिक जनता सुरक्षा सभा कायदा करावा व त्याची नियमावली तयार करावी व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तरच दुर्घटना टाळता येवू शकतात आणि लाखो लोकांचे प्राण वाचवू शकतो!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

आधुनिक केसरी

जगातील अनेक देशांवर ब्रिटिशांचे साम्राज्य होते. पण हळूहळू हे देश पारतंत्र्याच्या बंधनातून मुक्त झाले. हे देश जसजसे स्वतंत्र झाले, तसतशी त्यांच्या क्षमतेनुसार, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार त्यांनी प्रगती केली. अनेक अविकसित राष्ट्रांचे विकसित राष्ट्रात रूपांतर झाले. या प्रगतीत त्या त्या देशातील जनता आणि त्या जनतेला दिशा देणारे नेतृत्व यांचा मोठ्या प्रमाणावर हात होता. आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर १८ वर्षांनी स्वातंत्र्य आणखी एका देशाला स्वातंत्र्य मिळाले. आग्नेय आशियातला हा टिकलीएवढा देश. ना शेतीयोग्य जमीन, ना नैसर्गिक साधनसंपत्ती. क्षेत्रफळ म्हणाल तर भारतातील एखाद्या राज्याएवढे. केवळ ७१०चौ. किमी चे हे बेट. शिवाय त्याच्याजवळील ६३ बेटांचा समावेश या देशात होता. किमी. लोकसंख्या असेल साधारणपणे ५८ लक्ष. त्यातही विविध धर्म, विविध भाषिक, विविध वंशाचे लोक, गरिबी पाचवीला पुजलेली, अशिक्षित लोक, भ्रष्टाचाराची बजबजपुरी, अस्वच्छतेचे माहेरघर अशा समस्यांनी घेरलेला देश. शेजारील शक्तिमान देशांचे तगडे आव्हान, चीन नावाचा ड्रॅगन आ वासून टपून बसलेला आणि दहशतवादी हल्ले करणारा इंडोनेशिया सारखा देश. आता प्रश्न असा आहे की असा एखादा देश आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थकारणात, पर्यटनात, सौंदर्यात, स्वच्छतेत, आरोग्य, सुरक्षा, शिस्तपालनात जगातील प्रगत राष्ट्रांनाही मागे टाकेल अशी प्रगती करू शकतो का ? त्यातील एखादे शहर जगातील सर्वात सुंदर हरित शहरांपैकी एक बनू शकते का ? तर मंडळी या वर दिलेल्या सगळ्या प्रश्नांचे उत्तर होय असे आहे. अशी नेत्रदीपक प्रगती एका छोट्याशा देशाने करून त्याचा आदर्शच जगापुढे ठेवला आहे. होय, बरोबर आहे तुमचा अंदाज. या देशाचे नाव आहे सिंगापूर. हा देश एवढी घोडदौड करू शकला कारण त्याला मिळालेले अत्यंत कुशल, सक्षम आणि कणखर नेतृत्व. अशा एका व्यक्तीच्या हाती ही सत्ता आली की ज्याने या वादळात या भरकटलेल्या देशाच्या जहाजाला सुयोग्य दिशा दिली. एखाद्या देशाला असा नेता लाभणे म्हणजे त्या देशाचे भाग्यच ! असा नेता म्हणजे एखाद्या जहाजाच्या कुशल कप्तानसारखाच असतो.



## आनंदी पहाट

# अंतरात्म्याच्या शोधामुळे आत्मबोध होतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मिळेल त्यांत समाधानी राहावं असं म्हंटलं जातं, पटतं का आपल्याला? खरंच जे काही मिळतं त्यांत आपण खरंच समाधानी राहू शकतो का? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असं नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का? अंतरात्म्याला शांती मिळणं अत्यंत जरुरीचं असतं. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरं तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणं मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे? हे आपण स्वतःच शोधून काढायचं असतं. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते.

# पिंपळवृक्ष....

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-72

पिंपळवृक्ष म्हटलं की डेरेदार झाड डोळ्यासमोर येतं.. सुंदर हृदयाच्या आकाराची हिरवीगार,जाळीदार पानं असतात पिंपळाची. आणि काय आश्चर्य आहे पहा भिंतीच्या कपारीत, एखाद्या फटीत आणि खडकावर सुद्धा हे झाड उगवतं .किती प्रतिकूल परिस्थितीत हे रोपटं तग धरून असतं.पानांची सुद्धा किती किमया आहे बघा, ते जेव्हा वाळतं तेव्हा सुंदर अशी जाळी त्या पानांची तयार होते .कधीच नष्ट होत नाही. म्हणूनच म्हणतात की, "मैत्री असावी तर पिंपळाच्या पानासारखी". आपल्याला सुद्धा मुलांना असंच घडवायचं आहे, पिंपळाच्या रोपा सारखं. प्रतिकूल परिस्थितीत मुलांनी खचून न जाता उभं राहावं. संकटापासून दूर पळण्यापेक्षा त्याला वेळीच तोंड द्यावं. संकटाला घाबरून दूर जाऊ नये. पुन्हा पुन्हा त्याचा सामना करावा लागतो. त्यापेक्षा एकदा त्याला सामोरे जा. काय तो सोक्षमोक्ष लागेल .जसं की काही कारणास्तव कर्मचारी अधिकाऱ्याला भेटतच नाही. वारंवार निरोप पाठवून सुद्धा. कायम ऑक्सिजनवर राहण्यापेक्षा एकदा त्यांना भेटा. समोरासमोर चर्चा करा. गैरसमज बोलून, चर्चेतून दूर करा. भेटला नाही तर गैरसमज वाढत जातील. "महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती". मोठा असणारा राग भेटल्यामुळे वाहून जाईल. आणि लव्हाळा वाचेल. रोज रोज गृहपाठाचा कंटाळा न करता रोजच्या रोज पूर्ण केला तर गुरुजींचा ओरडा पडणार नाही. त्यांच्यासमोर जायला भीती वाटत नाही. तेव्हा सकारात्मक विचार करा. योग्य वेळी योग्य व्यक्ती समोर व्यक्त होणे आणि अयोग्य व्यक्तीसमोर मौन राहणं नेहमीच चांगलं आहे. त्यामुळे संकट दूर पळतात. नकारात्मक विचार खूप वेदना देतात. जे की शत्रू सुद्धा एवढ्या वेदना देत नसतील. नेहमी सकारात्मक राहावं.सकारात्मक बोलावं. सकारात्मक वागावं. पिंपळ वृक्ष मोठा झाला की त्याची सुंदरता आपल्याला दिसते. पण तो सहज मोठा होत नाही. तसेच माणसाचं आयुष्य सुंदर घडतं तेव्हा ते सहज घडत नाही. ते प्रार्थनेतून, कष्टातून, माणुसकीतून,त्यागातून, आणि कृतीतून घडत असतं....

# मेहनतीचे फळ

आधुनिक केसरी

एक गाव होते त्या गावांमध्ये एक शेतकरी माणूस राहत होता त्या माणसाला चार मुले होती परंतु त्याचे चारही मुले अगदी अळशी होती. एक जणी ही काम धंदा करत नव्हते शेतकऱ्यांच्या जीवावर त्यांचे आयुष्य सुखात चालले होते. पण एक दिवस काय झाले शेतकऱ्याची तब्येत अचानक खराब झाली व त्याला कळाले आता आपण मरण पावणार परंतु आपण मरण पावल्याने आपल्या मुलांचे काय होणार ? असा विचार तो करीत होता. एके दिवशी शेतकऱ्याची तब्येत अधिकच खराब झाली तेव्हा त्यांनी आपल्या चारही मुलाला जवळ बोलावले आणि सांगितले," मुलांनो तुमच्यातील एकही जण काही काम करत नाही मी निघालो होतो तुमच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून मी आपल्या शेतामध्ये एकदा गेलेली भरलेला हंडा पुरला आहे जो कोणी हा फंडा खोडून काढत त्याला ते सर्व धन मिळेल.

असे सांगून शेतकऱ्याने आपला शेवटचा श्वास घेतला. त्यानंतर शेतकऱ्याचे चारही मुले आपल्या शेतामध्ये जाऊन संपूर्ण शेत खोदून काढले परंतु त्यांना दागिन्यांनी भरलेला हंडा कुठेही मिळाला नाही. तेव्हा शेतकऱ्याचे चारही मुले खूप उदास झाली. ते दिवस होते पावसाळ्याचे.

आता खोदलेल्या शेताचे काय करायचे म्हणूनच शेतकऱ्यांच्या एका मुलाने शेतीमध्ये दाणे टाकले. पाऊस पडल्याने काही दिवसातच ते जाणे बघून आले व बघता बघता शेतामध्ये मौल्यवान असे धान्य डुलु लागले. देवा शेतकराच्या मुलांच्या लक्षात आले की, बाबांनी सांगितलेलला तो मौल्यवान दागिन्यांनी भरलेला हंडा म्हणजेच आपली शेती आहे."

अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांची चूक लक्षात आले व सर्व मुले मिळून शेती करू लागले व आनंदाने जगु लागली.

**तात्पर्य : मेहनतीचे फळ नक्कीच एकदा एक दिवशी मिळत असते.**

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**इति चन्द्रहासविरचितं श्रीनीलांबरीस्तोत्रम् चिन्तयतां सदा प्रश्नान् स्वेन तोलयतां नृणां। सुखं तेषां कुतः किं वै कथं कदा श्रुतं वद।।सतत प्रश्नांचा विचार करणा-या स्वतःची तुलना (इतरांसोबत) करणा-या लोकांना सुख कोठून कसले केव्हा खरोखर (प्राप्त झाल्याचे) तू ऐकलेस, ते सांग.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मानव उत्तम देह को, पाकर लक्ष्य न जान ।
हीन मुख्य उद्देश्य से, सो दुख जीवन मान
।।३७।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/३७**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

उत्तम मनुष्य देह मिळूनही ज्याने प्रभूभक्ती जाणली नाही तो मुख्य उद्देशहीन (जीवनाचे मुख्य उद्दिष्ट नसलेला) आहे, त्याचे जीवन दुःखमय आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# सूक्ष्म आशंका निरुपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

धर्मसाहित्याचा अभ्यास करत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रश्न पडतो की "ब्रम्ह जर निर्गुण आहे "तर हे चराचर विश्व कसे निर्माण झाले ? त्यासाठी आपण विवर्त म्हणजे काय हे समजून घेऊ. त्यासाठी मित्रांनो आपण एक आपल्या नेहमीच्या परिचयाचे ऊदा घेऊ म्हणजे आपल्याला समजणे सोपे जाईल. तिन्हीसांज झाली अंधार पडला आहे. एका खोलीमध्ये दोरी पडली आहे. एक माणूस येतो त्याने दार उघडून पाहिले तर त्याला ती दोरी न दिसता केवळ आंधळेपणाने साप आहे असे वाटले. त्यामुळे तो माणूस घाबरला,दिवा लावल्यावर त्याला दोरी दिसली. मुळात ती दोरीचं होती पण आपण आंधळे होतो. त्या आंधळ्या समजूतीने आपण सर्व जण त्या दोरीला साप साप म्हणून समजत होतो. त्याच प्रमाणे शुध्द परमात्मा सगळीकडे पसरलेला आहे पण अज्ञानाचा अंधार डोळ्यासमोर व मनात भरभरून ठासून भरलेलं आहे. आपल्या मनाची अज्ञानाची काळी प्रतिमा सतत डोळ्यासमोर असते म्हणून मन व इंद्रिय सतत वाईटाचाच विचार करतात. पण जेव्हा अज्ञानाचे झाकण बाजूला झाले की समोरचे खरे वाटू लागते. हा सापाचा होणारा भास म्हणजेचं विवर्त होय. मी आत्मा आहे हे विसरून मी देहच आहे अशी भावना होणे म्हणजेच विवर्त होय. परमार्थामध्ये केवळ बुध्दीच्या जोरावर परमात्मवस्तूचे स्वरूप निश्चित करता येत नाही. त्यासाठी आत्मज्ञानच आवश्यक असते.

# सर्वस्वी राहावे रामास अर्पण

आधुनिक केसरी

आता ऐका माझे वचन ।मनाने व्हावे रामार्पण ॥ माझे नातेगोते एक राम ।हा भाव ठेवून जावे रामास शरण ॥ अनन्य व्हावे भगवंती ।जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥ रामा आता करणे नाही उरले जाण ।तुला आलो मी अनन्य शरण ॥ सुखदुःखाचा दाता ।सत्य नाही दुजा आता ॥ जाणिवेने जैसे घ्यावे ।तैसे मनाने सुखदुःख भोगावे ॥ मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण ।तोपर्यंत नाही समाधान ॥ सर्वस्वी राहावे रामास अर्पण ।हाच उपाय सांगती साधुजन ॥ रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती ।त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥ प्रयत्नेविण राहो नये ।फळाची आशा ठेवू नये ।भगवंताला विसरू नये ।कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ॥ प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान ।तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ॥ अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥
वृत्ति राखावी अत्यंत शांत ।हेच संताचे मुख्य लक्षण जाण ॥ जे जे घडेल काही ।ते ते रामइच्छेने पाही ॥ असा करावा संसार ।परि असावे खबरदार ।त्राता राम जाणुनी चित्ती ।



निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले ।रामराय घरी आले ।आता व्हावे रामाचे आपण।व्यवहार प्रपंच करावा जतन ॥ न दुज्याचा दोष पाहावा ।त्याचा आपणापाशीच ठेवा ॥ देह आहे परतंत्र ।मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ॥ मनाने जो बांधला ।परतंत्र वाटेल त्याला ॥ शरण गेला रामचरणी ।त्याला नाही दुजी हानि ॥ अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ॥ बायकोमुले, लहान थोर ।यांनी न सोडावा रघुवीर ॥ काळ फार कठीण आला ।बुद्धिभेद त्वरित झाला ॥ आता सांभाळावे सर्वांनी आपण ।रामाविण न जाऊ द्यावा क्षण ।चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ॥ माझा राम जोडला हे जाणले ज्याने ।त्याला न उरले करणे ॥ राम ठेवील ज्या स्थितीत ।त्यात समाधान मानावे ॥ रामास जे करणे असेल ।ते तो करील ॥ सदा सर्वकाळ माझ्याशी वास ।हाच धरावा हव्यास ॥ त्याला न जावे लागे कोठे ।घरबसल्या राम भेटे ॥ जो करी रामपदांबुजचिंतन ।तयास नाही यमाचे बंधन ॥ संताची सेवा केली ।महद्भाग्य घरी आले ॥ एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ॥ तोच खरा धन्य धन्य ॥ संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास ॥

**आजचे बोधवचन आहे – अखंड राखावे अनुसंधान ।येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥श्रीराम समर्थ**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

ऐसा ठाव नाहीं कोठें ।देव उभाउभी भेटे ॥ध्रु.॥
आहेति सकळ ।तीर्थे काळें देती फळ ॥२॥
तुका म्हणे पेठ ।भूमिवरी हे वैकुंठ ॥३॥
तिर्थी धोंडा पाणी ।देव रोकडा सज्जनीं ॥१॥
मिळालिया संतसंग ।समर्पितां भलें अंग ॥ध्रु.॥
तिर्थी भाव फळे ।येथें आनाड तें वळे ॥२॥

रविवार, २३ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३० एप्रिल २०२३

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 23 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-229 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# जो सामान्य जनतेचा विचार करतो, त्याचा काँग्रेस द्वेष करते

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : बिदरमधील सभेत काँग्रेसवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**बिदर : कर्नाटकात १० मे रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडणार आहे. त्यापार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिदर येथील सभेला संबोधित केले. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरूवात बिदरमधून झाली, हे माझे सौभाग्य आहे. लोकांनी मोठ्या संख्येने सभेला येत, संपूर्ण देशाला संदेश दिला की, कर्नाटकात पुन्हा भाजपाचे सरकार येणार आहे. ही निवडणूक कर्नाटकाला देशातील एक नंबरचे राज्य बनवणारी आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.**



**पंतप्रधान मोदी विषारी सापासारखे :** काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींची तुलना 'विषारी सापा'शी केली होती. पंतप्रधान मोदी विषारी सापासारखे आहेत. विषारी सापाला हात लावल्यानंतर काय होऊ शकते, याची कल्पना सर्वांना आहे. स्पर्श केला तर जीवनीशी जाल, असे विधान मल्लिकार्जुन खरगे यांनी केले होते.

पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवरही हल्लाबोल केला आहे. काँग्रेसने मला ९१ वेळा शिव्या दिल्या. पण, जनतेने त्यांना प्रत्येकवेळी नाकारले आहे. जो सामान्य जनतेचा विचार करतो, त्याचा काँग्रेस द्वेष करते. मोठ्या महापुरूषांनाही काँग्रेसने शिव्या दिल्या आहेत. काँग्रेस शिव्या देते, पण, मी जनतेचे काम करत राहणार आहे. जनतेचे समर्थन मला असल्याने शिव्या मातीत मिसळून जातील. कर्नाटकची आणखी सेवा करायची आहे. त्यासाठी पूर्ण बहुमताचे सरकार पाहिजे, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले. कर्नाटकात महामार्गाचा विस्तार होत राहिला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात मेट्रो सुरू झाली पाहिजे. सर्वात जास्त 'वंदे भारत' रेल्वे चालल्या पाहिजेत प्रत्येक शेतात पाण्याची सुविधा पोहचली पाहिजे हे जनतेला हवे मागील पाच वर्षात कर्नाटकात सुरु असलेला विकास थांबला नाही पाहिजे, असे जनतेचे मत आहे. तुमचे स्वप्न पूर्ण करण्याचा ठेका भाजपाने घेतला आहे. कर्नाटकाला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी डबल इंजिनचे सरकार असण्याची आवश्यकता आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# खरगेंविरोधात आयोगाकडे तक्रार

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर 'विषारी' टीका केल्याने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याविरोधात भाजपने शुक्रवारी निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदविली. खरगे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आणि त्यांना कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारापासून प्रतिबंधित करण्याची मागणी भाजपने केली. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी सांगितले की, 'खरगे यांची टीप्पणी केवळ जीभ घसरली नसून काँग्रेसच्या द्वेषपूर्ण राजकारणाचा भाग आहे. त्यांनी असंतोष पसरवण्याचे आणि चिथावणी देण्याचे काम केले आहे.' भाजपने भादंविच्या कलम ४९९, ५०० आणि ५०४ अंतर्गत एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या नेत्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. काँग्रेसकडे मुद्द्यांचा अभाव आहे. मात्र पंतप्रधानांविरोधात जेवढे वाईट बोलाल, तेवढा त्यांना जनतेचा पाठिंबा मिळत जाईल. भाजप आमदार बसनगौडा पाटील यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचा उल्लेख 'विषकन्या' असा केला. काँग्रेसने यावर तीव्र आक्षेप घेतला असून या आमदाराची हकालपट्टी करण्याची मागणी केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, राज्यात सत्ता आल्यास प्रत्येक ग्रामपंचायतीस एक कोटी रुपये आणि कल्याण कर्नाटक प्रदेशासाठी ५,००० कोटी दिले जातील. जेवर्गी येथे जाहीर सभेला राहुल यांनी संबोधित केले.

# एटीएममध्ये पडलेल्या वृद्धेला पोलीस, माणुसकी समूहाचा मायेचा निवारा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** निराधार अवस्थेत फिरणाऱ्या ७० वर्षीय महिला ही बळीराम पाटील शाळेजवडी एटीएम मध्ये बेवारस अवस्थेत मागील दोन दिवसांपासून पडलेली होती. तिच्याकडे कुठलेही साहित्य नव्हतं आणि ती भुकेली होती तिचीही अवस्था बघून स्थानिक नागरिकांनी उप पोलीस निरीक्षक अनिता फासाटे यांना याची कल्पना दिली आणि त्यांनी माणुसकी समूहाचे सुमित पंडित यांना त्या महिलेबाबत कळविले प्रत्यक्ष समाजसेवक सुमित पंडित आणि पोलीस महिला पथकाने प्रत्यक्ष महिलेला बघितल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की महिला भुकीली आहे आणि तिच्या शरीरात कोणतेही प्राण उरलेलं नाही तसेच तिला घरातून बेदखल करण्यात आलेले आहे या महिलेची माहिती सुमित पंडित यांनी सिडको पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांना दिली औरंगाबाद महानगरपालिका आणि संत गाडगे महाराज शिक्षण सांस्कृतिक मंडळ संचलित शहरी बेगर निवारागृह मोतीन कारंजाचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी या वृद्ध महिलेची विचारपूस करून तिच्यावर झालेल्या अन्यायाबद्दल तिला बोलते केले ती महिला मुंबई येथे राहत असल्याचे तिने सांगितले या महिलेला कायमस्वरूपी मोफत निवारा आणि भोजन आणि औषधोपचार मिळावे म्हणून तिच्या पुनर्वसनासाठी पोलिसांच्या मदतीने तिच्या शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय तपासण्या पूर्ण करून रात्री उशिरा चिकलठाणा येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे शायरी बेगर निवारागृह येथे तिची रवानगी करण्यात आली या सर्व प्रक्रियेमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी पवार सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रद्धा वायदंडे व पोलीस निरीक्षक अनिता फसाटे पोलीस सानप,बसंती काकडे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गायकवाड बोधी बहुउद्देशीय समूहाच्या रंजना दंदे, माणुसकी समूहाच्या पूजा पंडित यांनी परिश्रम घेतले.




वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी पवार म्हणाले की ज्या आई-वडिलांनी आम्हाला लहानाची मोठे केले स्वत : दु :ख सहन करून आम्हाला सुखाची सावली दिली असे असताना अशा आई-वडिलांना एकटे सोडून देणे हे समाजातील भीषण वास्तव दर्शवत आहे दिवसेंदिवस असे निदर्शनास येत आहे की आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करण्याकडे मुलांचे दुर्लक्ष होत आहे आणि परिणामी त्यांना अशा हलाकाच्या परिस्थितीमध्ये आयुष्य जगावे लागत आहे तेव्हा नवीन पिढीने आपल्या संस्कृतीचा संस्काराचा आदर्श घेऊन आई-वडिलांची सेवा करावी.



# अवकाळी पावसामुळे बळीराजा हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरासह तालुक्यातील बहुतांश गावांत वादळी वारे ढगांचा गडगडाट, विजांच्या लखलखाटासह अवकाळी पावसाचा तडाखा बसला. यात रब्बी पिकांसह कांदा, कांदा बियाणे, सुर्यफूल, उन्हाळी बाजरी या पिकांसह आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. धामणगाव, टाकळी कोलते. परिसरात झाडे उन्मळून पडली. फुलंब्री शहरासह तालुक्यातील मुर्शिदाबाद वाडी, चिंचोली, गणोरी, किनगाव, शिरोडी, बाबरा, आळंद वडोदबाजार, पिरबावडा, धामणगाव, तळेगाव, टाकळी कोलतेसह सर्वच भागांत कमी अधिक प्रमाणात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पावसाने हजेरी लावली. काही भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस अधिक प्रमाणात होता. धामणगाव, चिंचोली बुद्रुक, गणोरी, शिरोडी बुद्रुक तसेच तालुक्यातील बहुतांश गावांना या अवकाळी पावसाने झोडपले. गणोरी येथे पंतप्रधान आवास योजनेच्या २० घरकुलांचे काम सुरूहोते. वाऱ्यामुळे या घरांच्या छताचे पत्रे उडून खाली पडले, तसेच अनेक भिंतीना तडे गेले.



# असाध्य ते साध्य करिता सायास...



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**स्वतः हातपाय हलविल्याशिवाय या जगात काही मिळत नाही, असं कुमारवयात आपण सर्वांनी ऐकलेलं आहे. काही मिळविण्याचे एक साधे सोपे सूत्र आहे, ज्याकडे आपण सर्वच अनावधानाने अथवा आळसाने दुर्लक्ष करतो. उद्या तुमच्या वाट्याला येणारे तुमचे नशीब दुसरे तिसरे काहीच नसून आजच्या कर्माचे संचित असते. आज आपण काय करतो यावर आपलं भविष्य अवलंबून असणार आहे. ज्याला भविष्य चांगलं घडवायचे आहे त्याने आज कर्म केले पाहिजे. दे रे हरी पलंगावरी असे कधी होत नाही. हा निसर्ग फक्त नियमाने चालतो. निसर्गनियमांचा अभ्यास करून त्यानुसार आपले वर्तन केल्यास पश्चाताप करण्याची वेळ येत नाही.**



स्वतः बोरीचे झाड लावून आंब्याची अपेक्षा करणे म्हणजे स्वतःचीच फसगत करून घेणे होय. व्यक्तिमत्त्व विकासाची शिकवणी लावून आयुष्यात यशस्वी होता आले असते तर जो व्यक्ती स्वतः अशी शिकवणी घेतो तो अगोदर त्याने त्याच्या उमेदीच्या काळात जे व्हायचे ठरवले होते, ते त्याने मिळवले असते; परंतु आपले अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यास काहीतरी दिव्य सांगतो आहोत अशा अविर्भावात समोरच्याचा वेळ वाया घालवणे कोणासाठीच हिताचे ठरणारे नाही. माऊली ज्ञानेश्वरीत वर्णन करतात, खूप मोठा तलाव आहे, पण त्यात पाणीच नाही किंवा चांगले मोठे झाड आहे पण ते वांझ आहे किंवा सर्व अवयव व्यवस्थित असणारे शरीर आहे पण त्यात प्राण नाही त्याप्रमाणे भले मोठे आयुष्य लाभले आणि ते कर्माविन असेच वाया जात असेल तर आपण व्यक्तीमत्व विकासाची कितीही शिकवणी लावली अथवा कितीही तत्त्वज्ञान ऐकले तरी काही फरक पडणार नाही. आजकाल व्हॉट्सअप महाविद्यालये आणि युट्यूब विश्वविद्यालयांची एवढी चलती आहे की प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञानापेक्षा त्यावरील आपले अवलंबित्व आपणास अधिकाधिक भ्रमित करण्यास पुरेसे आहे. बरे यावरील जि माहिती आहे ती आपण काही उद्देशपूर्वक ऐकतो असेही नाही. पूर्ण आयुष्यच निरुद्देश झाले असल्यामुळे असे होणे साहजिक आहे. ज्याला व्यवहारात काही मिळवायचे आहे, प्राप्त करायचे आहे त्याने आपले निश्चित असे ध्येय ठेवून क्रियाकलाप केला पाहिजे, ही पूर्वअट होय. शेतातील पिकांना पाणी देताना शेतकरी ते शेतात कसेही सोडून देत नाही. छोटी नाली करून कमी भाग भिजवत भिजवत पूर्ण शेत भिजवतो. आयुष्य समृद्ध करायचे तर आपले ध्येय निश्चित करून त्याचे काही टप्पे पाडावे लागतील आणि त्यावर आपणास काम करावे लागेल. तीनशे पासष्ठ पृष्ठांचा ग्रंथ लिहायचा असेल तर दिवसाकाठी किमान एक पृष्ठ लिहिलेच पाहिजे. एकदाच तीनशे पासष्ठ पृष्ठे लिहिणे शक्य नाही पण एक पृष्ठ मात्र निश्चितच आपण लिहू शकतो. हे सूत्र ज्याला कळाले तो यशस्वी होईल. तुम्हाला ज्या क्षेत्रात यश मिळवायचे त्यासाठी आपण काय करत आहोत, याचा अगोदर विचार केला पाहिजे. मिळवण्याची इच्छा तीव्र आहे, तसा संकल्प सुद्धा केला आणि त्यानुसार कामही चालू केले. चांगली गोष्ट आहे, परंतु कालांतराने आपणास आळस येऊ लागतो आणि आपण पदच्युत होतो. मार्गावरून भटकतो.



## क्षितिजापल्याड

संकल्प जेवढा महत्त्वाचा त्यापेक्षा अव्याहतपणे मार्गक्रमण महत्त्वाचे. चालण्याच्या सायासातूनच निश्चित स्थळी आपण पोहचू हे लक्षात घेतले पाहिजे. आजकाल गावोगाव आपण तरुणांचे जत्थेच्या जत्थे पाहत असतो. अर्धशिक्षित, सुशिक्षित या सर्वांच्या बोलण्याचे विषय काय असतात. शेती, वेठबिगारी, नोकरी, लैंगिकता इत्यादी. कोणाही एका शिक्षण पूर्ण झालेल्या युवकास सद्या काय चालू आहे असे आपण विचारले तर त्याचे उत्तर सर्वत्र सारखेच ऐकायला मिळते. ते म्हणजे स्पर्धा परीक्षेची तयारी. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन नोकरीला लागणे चांगले असले तरी या परीक्षा आपण समजतो तेवढ्या सोप्या नसतात. प्रचंड अभ्यास करावा लागतो आणि नेमकी आपली तीच पडती बाजू असते. बरे ही परीक्षा किती वर्षे द्यायची तर जोपर्यंत घरची मंडळी आता तुझं तू पहा, आम्हाला आता हा खर्च झेपत नाही, असे म्हणेपर्यंत. यासर्व उपद्व्यापामध्ये वयाची तिशी कधी पार झाली हे समजत देखील नाही. तरुणांनो, एक गोष्ट कायम लक्षात ठेवा. तुम्हाला ज्या क्षेत्रात जायचे आहे. ते तिशीपर्यंतच प्राप्त करा, अन्यतः पुढचे अख्खे आयुष्य लंबकाप्रमाणे दोलायमान होईल. ज्याची खरेच क्षमता आहे, कष्ट करायची तयारी आहे, ध्येयावर अढळ श्रद्धा आहे त्यांनीच अशा परीक्षा द्याव्यात. उगीचच आपला मित्र किंवा गावातला कोणी स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे म्हणून आपणही त्या वाटेला जाणे आणि वेळ व पैसा बरबाद करणे आपणास परवडणार नाही. लाथ मारीन तिथे पाणी काढण्याची वेळ व काळ मागेच संपले. आज सर्वत्र प्रचंड धावपळ आणि अनिश्चितता असताना आपणही त्याच पद्धतीने वर्तन करणे आपणास व आपल्या कुटूंबियांना परवडणारे नाही. मृगजळाच्या मागे धावून तहान भागणार नाही. आपुलिया हिता जो असे जागता धन्य माता पिता तयाचिया असं तुकोबांनी सांगून ठेवलेलं आहे. त्यामुळे आपले हित कशात आहे हे ओळखून त्याप्रमाणे आपले कर्म असले पाहिजे. करणी करे सो नर का नारायण हो जाये असे म्हटले जाते. किंवा जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर, असे जीवनाचे सार असताना आपण नेमके कसे वागत आहोत, याचा ज्याने त्याने विचार करावा. आपण तिरकस, द्विअर्थी आणि कठोर बोलायचे आणि समोरच्याकडून अपेक्षा मृदू, समंजस, लाघवी बोलण्याची ठेवायची. असे कधीच होत नसते. निसर्गात जसा प्रतिरोधाचा सिद्धांत विद्यमान आहे तसाच प्रतिक्रियेचा सिद्धांतही आहे. त्यामुळे विशेषतः तरुणांनी आपली भाषा सांभाळून वापरली पाहिजे. जे काही करायचे त्यात आपली प्रामाणिकता किती आणि वेळकाढूपणा किती याचाही विचार अवश्य करावा. केवळ अभ्यास किंवा केवळ प्रामाणिकता या गोष्टीला जगात शून्य किंमत असते. या दोन्ही गोष्टी एकत्र आणू शकलो तर भविष्य आपले आहे अन्यतः आपले भले प्रत्यक्ष परमेश्वर देखील करू शकणार नाही. उठा, विहित कर्म करा आणि यशस्वी व्हा.

# मुक्तचिंतनाची आखीव - रेखीव नक्षी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**एका ठराविक साच्यात न राहता नदीच्या प्रवाहासारखे प्रवाही, निखळ संचार ललितलेखनात पाहायला मिळतो. त्यात तांत्रिक, जुजबी माहिती न देता संवेदनशील मन आणि भावनिक स्पंदने यांना महत्त्व असते. आपल्या मनातील भावनांना मुक्तसंचार करता येतो , तो ललितलेखनात. आपल्याला आलेले अनुभव, भेटलेली माणसे, त्यांचे स्वभाव, विचार, निसर्ग, वेदना - संवेदना यांचा आलेख मनपटलावरुन शब्दरूपात उतरतो. ललितलेखन करताना लेखकाला स्व - अनुभवाचे प्रतिबिंब लेखणीत दिसते. जेव्हा एखादा प्रसंग घडतो त्या क्षणी आपण इतका विचार करत नाही, पण कालांतराने त्या घटनेवर आपण बारकाईने चिंतन करतो. का ? कसे ? याचा विचार करताना आपोआप उत्तर सापडत जातं.**

प्रत्येकाला मुक्तपणे जगायला आवडते. आपल्यावर कोणतेही बंधन नसावे, प्रत्येक गोष्टीचा मनसोक्त आनंद घेता यायला हवा, अशी प्रत्येकाची इच्छा असते. एखादी गोष्ट आपल्याला आवडीने करावीशी वाटते, त्या गोष्टीचे मनाचे समाधान होईपर्यंत आस्वाद घेणे, आनंद घेणे म्हणजे 'मनमुराद' ...या शब्दातून एक प्रकारे मोकळेपणा जाणवतो.

लेखिका सुजाता घाटगे यांच्या प्रगल्भ लेखणीतून साकारलेला 'मी मनमुराद' हा ललित लेखसंग्रह म्हणजे मुक्तचिंतनाचे भावरंग आहेत. सृजनसंवाद प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या संग्रहात एकूण ३२ लेख समाविष्ट असून विविध विषयांवर त्यांनी सुरेख चिंतन केले आहे. हे चिंतन म्हणजे स्वतःशी साधलेला मनमोकळा संवाद आहे.या संग्रहातील लेखांचे विषय हलके - फुलके असले तरी या लहान - लहान गोष्टींचे हळूहळू जीवनावर परिणाम होत असतात. त्याचे पडसाद उमटत असतात. पण वाचताना मनात ताण निर्माण होत नाही उलट मनात एक प्रकारची प्रसन्नता आणि नवीन काहीतरी हाती गवसल्याचा प्रामाणिक आनंद मात्र होतो. लेखिकेने आपली अभिव्यक्ती मनमुराद व्यक्त केली आहे. जे जसे भावले तसे शब्दात उतरवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मनात उठलेल्या विचारांचं काहूर शांत होतं, इतकी सकारात्मक निवेदनशैली आहे. छोटेखानी लेखांची रचना, आटोपशीर आणि तितकीच उदबोधक त्यामुळे वाचताना कुठेही वाचक रेंगाळत नाही. लेख वाचताना जाणवेल की, सर्वसामान्य वाचकाला सहज आकलन करता येईल, अशी लेखनशैली आहे. पण लेखिकेच्या लेखणीत लालित्य आहे, एखाद्या साध्या घटनेला त्या किती सुरेख शब्दालंकारांनी सजवतात. जणू शब्दसोहळा ! 'मी मनमुराद ' ललित लेखसंग्रहातील ' बहर' लेखात ऋतुनुसार बहरणाऱ्या झाडांबद्दल किती सुरेख विवेचन केले आहे. बहावा, गुलमोहर, सोनचाफा यांचं बहरणं किती वेगवेगळे अर्थ प्रतीत करत असते. माणसानेही असेच बहरायला हवे, या फुलांसारखे . तो क्षण जगता यायला हवा. वेळ आली की ती झाडे बहरुन येतातच. या बहर शब्दातून अभिप्रेत असणारे विविध अर्थ या लेखातून उलगडले आहेत. या लेखात लेखिका सांगतात, 'ह्या झाडांचं मोहरणं तरी कसं, रणरणत्या उन्हातलं. हळदी कुंकवाच्या करंड्यासारखं. किती सुंदर उपमा आहे ! वर रणरणतं ऊन आणि भर उन्हात बहरलेला गुलमोहर लेखिकेला हळदी - कुंकवासमान भासते.

झाडांची पाने सुकली की, खाली गळून पडतात,त्याची पाचोळा म्हणून गणती होते. त्या पाचोळयातून मानवी जीवनाची अवस्था संवेदनशीलतेने व्यक्त झाली आहे. झाड जेव्हा बहरलेलं असतं , छान दिसतं. जेव्हा तो या समुहापासून वेगळा होतो, त्याचीही वेदना असेल ना ! लेखिकेला त्यात एकटेपणाची भावना दिसली. या पाचोळयातून मानवी जीवनाची उदासी, दुःख मांडले आहे. ' सुकलेल्या पानांवरची नक्षी डोळ्यात भरते आणि जितक्रा आपण हात फिरवू तितकी आपली होतात ती पणे... त्या शिरा म्हणजे त्यांचा जीवनप्रवासच ना ! ' या ओळी मनाला अधिक भावतात. असा प्रत्यय पानापानावर अनुभवायला मिळेल. या झाडांप्रमाणे प्रत्येक क्षण आनंदाने जगता यायला पाहिजे. जीवनातील खरे सौंदर्य टिकवता आले पाहिजे. एखाद्या गोष्टीचा शेवट म्हणजे एक नवी सुरूवात असते, ही उमेद देणारा हा लेख आहे.

या ललितलेखांमध्ये लेखिकेने काही वर्णने विशद करण्यासाठी कवितेच्या ओळींचा समर्पक वापर केला आहे. प्रसंगी स्वतः लिहिलेल्या कवितेचा संदर्भ अगदी सुयोग्यरित्या केलेला आहे. सोबतच कवी ग्रेस, कवयित्री शांताबाई शेळके, बहिणाबाई बौधरी, गीतकार गुलजार यांच्या रचनेमुळे लेखाला परिपूर्णता लाभली आहे. मूलतः लेखिकेचे असलेले कवीमन या लेखांमधून काव्यरूपात झळकत राहते.

'भाव देखणे सुंदर' लेखातून मुक्या जीवांच्या डोळ्यातील तरल, निर्मळ भाव टिपताना लेखिका शब्दांविना व्यक्त होणारे भावतरंग , डोळ्यात निर्माण होणाऱ्या प्रतिमा यांचं भावपूर्ण वर्णन करत आहेत. जीवनात माणसाने परिपूर्ण होण्याकडे नाही तर आपला विकास, प्रगती कशी होईल, याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, मानसिक, भावनिक पातळीवर माणसाने मनात शुद्ध भाव जपला पाहिजे. नाहीतर ' मनी नाही भाव आणि देवा मला पाव' असे होईल. परिपूर्णतेचा प्रवास , त्याचा नेमका अर्थ काय ? आणि आपण कशा प्रकारे कृती करावी, यावर महत्वपूर्ण विवेचन करणारा ' भावपूर्ण ते परिपूर्ण' हा लेख आहे. या आणि अशा विविध विषयांनी बहरलेला हा ललितलेख संग्रह विचार करण्याची एक वेगळी दृष्टी प्रदान करतो. या अनुभवांच्या गोतावळयात वाचक गुंतत जातो. सहज सुंदर आयुष्य सहज घडत नसतं तर ते जाणीवपूर्वक घडवावं लागतं ते म्हणजे प्रार्थनेतून, माणुसकीतून, प्रेमातून, त्यागातून आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे कृतीतून घडत असतं.

जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त करून देण्यासाठी विचारांना कृतीची जोड़ द्यायला हवी आणि व्यक्तही व्हायला हवे, अगदी मनमुराद , लेखिकेसारखे...!

**( मी मनमुराद – ललित लेखसंग्रह / लेखिका : सुजाता घाटगे / प्रकाशक : सृजनसंवाद प्रकाशन / मूल्य : २०० रुपये )**




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# माजी आमदार नितीन पाटील यांनी विद्यमान आमदारांचा केला पत्ता कट

## कन्नड बाजार समिती निवडणुकीमध्ये शिंदे गटाचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यामध्ये औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार नितीन पाटील तसेच शिंदे गटाचे भरतसिंग राजपुत जिल्हा परीषद सदस्या संजना जाधव तालुका प्रमुख केतन काजे यांच्या नेतृत्वाखालील शिवशाही शेतकरी विकास पॅनल तयार करून छत्री या निशानीवर निवडणुक लढवली राजुरेश्वर मंगल कार्यालया येथे मत मोजणी घेण्यात आली या निवडणुकी मध्ये १८ पैकी १६ जागा जिंकुन भल्या भल्यांना चपराक दिली असुन ठाकरे गटाचे विदयमान आमदार उदयसिंग राजपुत यांचा चांगलाच पत्ता कट केल्याचे दिसुन आले आहे भाजपला ही एकच जागेवर समाधान मानावे लागले आहे. नितिन पाटील यांच्या शिव शाही पॅनलने मोठा विजय संपादीत केला असुन कन्नड तालुका कृषी बाजार समिती निवडणुक अनुषंगाने निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा कन्नड तालुक्याचे मा.आ.नितीन पाटील यांनी तालुकाभर सर्कल निहाय संपर्क दौरे करून शेतकरी सभासद यांच्याशी संवाद साधला .जिल्हा बँकेच्या माध्यमातून विविध कार्यकारी सोसायटी कायम मदत केली त्यांच्या सोबत संजना जाधव केतन काजे यांनी मेहनत घेऊन शिंदे गटाचा दबदबा तालुक्यात कायम ठेवला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक खरेदीविक्री संघ,नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक या नितीन पाटील यांच्या बाजूने पारडे जड राहील अशी ही जोरदार चर्चा सुरू आहेत. यावेळी माझी आमदार नितीन पाटील यांचं तालुक्याती मतदारांन कडुन अभिनंदन केले जात आहे.

# सोलापूर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध भागांत अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी या पावसामुळे नुकसान झाले आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातही वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस झाला. सोलापूर शहरासह अक्कलकोट, मोहोळ, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा या तालुक्यात पावसानं हजेरी लावली. कुठे शेती पिकांना फटका बसलाय तर कुठे घरांचे नुकसान झाले. तर अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळं झाडे उन्मळून पडली आहेत.




विजेच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने सोलापूर शहरात अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. यामुळे काही ठिकाणी वाहतूक व्यवस्था खोळंबली होती. अग्निशमन दलाचे जवळपास 20 जवान झाडे वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न करत होते. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. महावितरणच्या विद्युत यंत्रणाचे मोठे नुकसान झाले आहे. शहरात 20 ठिकाणी विजेचे खांब पडले आहेत तर जवळपास 70 ठिकाणी विजेच्या तारा तुटून पडल्या आहेत. त्यामुळे सोलापुरातल्या अनेक भागात विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. महावितरणने तात्काळ दुरुस्तीचे काम हाती घेऊन रात्री 11 वाजेपर्यंत 80 टक्के विद्युत पुरवठा सुरळीत केल्याचा दावा केला. ग्रामीण भागात झालेल्या पावसाने शेती पिकांचे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यात पाच दिवस पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. कालपासूनच सोलापूर शहरासोबतच ग्रामीण भागातील वातावरणात बदल झाला होता. तापमानाचा पारा खाली उतरला होता. गुरुवारी रात्रीच्या सुमारास ग्रामीण भागात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. शुक्रवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारी मात्र थोड्या प्रमाणात उन्हाची तीव्रता जाणवली. दुपारनंतर हवामानात बदल झाला अन् ढग दाटून आले. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास अचानक पावसाने सुरुवात केली अन् बघता बघता शहरातील सर्व वातावरण बदलले.

# राज्यात पुढील पाच दिवस अवकाळी पावसाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाराष्ट्रात भर उन्हाळ्यात अवकाळी पावसाने ठाण मांडले असून राज्यातील विविध भागात त्यामुळे शेतकऱ्यांचेच नाही तर सर्वसामान्य नागरिकांचेदेखील मोठे नुकसान केले आहे.
विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रासह कोकणाला या पावसाचा मोठा फटका बसला आहे. आता पुन्हा एकदा भारतीय हवामान खात्याने पुढील पाच दिवस राज्यातील विविध जिल्ह्यांना मूसळधार पावसाचा (ऑरेंज व यलो अलर्ट) इशारा दिला आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार मराठवाडा तसेच विदर्भातील जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील अहमदनगर जिल्ह्यासह छत्रपती संभाजी नगर, लातूर, जालना, बीडला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, नांदेड, लातूर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार या शहरांना पिवळा अलर्ट देण्यात आला आहे.



विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ आणि चंद्रपूर या चार जिल्ह्यांना २९ एप्रिलला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर, उत्तर महाराष्ट्रातील उर्वरित जिल्हे, विदर्भ आणि छत्रपती संभाजी नगर वगळता सर्व जिल्ह्यांना पिवळा अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात ३० एप्रिलला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. एक मे रोजी विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठीही 'पिवळा अलर्ट' जारी करण्यात आला आहे. कोकण वगळता इतर जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता असून दोन मे रोजी विदर्भ आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# जनतेशी तुटलेला संपर्क, पालकमंत्र्यांना पुढील काळातील निवडणुकीत भोवणार!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील पालकमंत्री यांच्या मतदारसंघातील वाशी व परंडा बाजार समिती निवडणुकीमध्ये शिवसेनेला मोठा हादरा बसला आहे. बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे आमदार व जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या मतदारसंघातील वाशी बाजार समितीमध्ये एकूण 18 जागेपैकी भाजप व बाळासाहेब यांची शिवसेना यांना सहा जागेवर समाधान मानावे लागले. महायुती उमेदवाराचा मोठ्या फरकाने पराभव करुन महाविकास आघाडीने 12 जागेवर दणदणीत विजय मिळवला आहे.
तर पालकमंत्र्यांचा बालेकिल्ला असणाऱ्या परंडा येथे महाविकास आघाडीने महायुतीला चांगलाच धक्का दिला. एकुण १८ जागेपैकी १३ जागा महाविकास आघाडीने जिंकल्या तर महा युतीला ५ च जागेवर समाधान मानावे लागले.
राज्यातील बाजार समितीच्या निवडणुकीकडे



सर्वच पक्षांचे लक्ष लागले होते.
मात्र धाराशिव जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी महाविकास आघाडीचा विजय झाल्यामुळे आनंदाचे वातावरण आहे. निकालानंतर पालकमंत्री यांच्या गटामध्ये चिंतेचे वातावरण आहे. बाजार समितीच्या झालेल्या निवडणुकांमध्ये पराभवाची कारणे शोधण्यासाठी पालकमंत्र्याकडून प्रयत्न होणार का?
सहकारी संस्था यांच्यावर कायमस्वरूपी असलेलं राष्ट्रवादी पक्षाचे प्राबल्य.
बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीचे माजी आमदार राहुल मोटे यांचा सक्रिय सहभाग. त्यासोबतच महाविकास आघाडीची एकजूट ठेवण्यात राहुल मोटे यांच्याकडून विशेष प्रयत्न झाले. तर वाशी व परंडा या दोन्ही ठिकाणी बाजार समिती निवडणूकित महायुतीमधील स्थानिक नेत्यांमध्ये मतदानाच्या दिवसापर्यंत एकोपा दिसून आला नाही. वाशी-भूम-परंडा मतदारसंघातील जनतेने अल्पावधीतच आपल्या कामाची चुणूक दाखवून देणाऱ्या तानाजी सावंत यांना भरघोस मतांनी निवडून दिले, मात्र आमदार झाल्यानंतर त्यांची सर्वसामान्य सोबतची तुटलेली नाळ, मतदार संघात जनते सोबत नसेलला संपर्क, साहेबाकडून सर्वसामान्यांचे फोन न उचलणे, मतदारसंघात कुठल्याही विकास कामाचा अजून तरी नारळ न फुटणे अशा अनेक कारणामुळेच ही पराभवाची पोहोच पावती दिली असल्याचे सर्वसामान्य जनतेतून बोलले जात आहे.

महाराष्ट्र Business Katta












# राजकीय पुढारी तुपाशी तर कामगार उपाशी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**कामगारवर्ग हा "जगाचा आधारस्तंभ" आहे,परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे.दरवर्षी १ मे जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो.आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दीसुन येतात. शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयनाअवस्था दिसून येते. आज विकसीत, विकसनशील,गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे.आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.**

भारताची लोकसंख्या १४२ कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते. म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा मोठा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा शिल्पकार मानल्या जातो. तर शेतकरी हा अन्नदाता मानल्या जातो. यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती, ताजमहाल, कुतुबमिनार, संसद भवन,मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज "शिल्पकारचे" हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते. कामगार हा जगाचा मोठा "आधारस्तंभ" आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे. आपण जर ईपीएस-९५च्या ७६ लाख निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत असते.यात त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उद्भवलेला आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दुःखी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले.आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते. भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे.कारण कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो.त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती,समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाला उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी.यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे.कारण ही दुःखदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजि राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ अरबो-खरबो रूपयांची संपत्ती दीसून येईल.म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचा अवाढव्य खर्च इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे.राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा.तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल. करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे.तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल.भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे.देशातील ७६ लाख ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी. एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल. परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात. कारण कामगार हा जगाचा "आधारस्तंभ"आहे. या आधारस्तंभाला टीकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे. कामगारांच्या प्रती सहानुभूती,सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल. देशाचा राजकीय पुढारी कृतीने कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.
जय हिंद!

तुकारामनीती
भाग -51

# सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथें ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

संत तुकोबाराय यांचा गाथा वाचतांना त्यातील अभंग विविध प्रकरणात विभागलेले आहेत. पांगुळ, आंधळा वगैरे शीर्षकाखालील अभंग वाचत होतो. त्यातील आंधळा प्रकरण वाचू लागलो. वाचतांना महाराजांच्या गाथ्यातील सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति जाली जन न दिसे तेथें । मी माजी हारपलें ठायीं जेथींचा तेथें । अदृश्य तें चि जालें कांहीं दृश्य जें होतें ॥१॥ सुखे मी निजलों गा शून्य सारूनि तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ॥ध्रु.॥ टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणाचा वोळसा । न मागें मी भीक आतां हा चि जाला भरवसा । वोळली सत्रावी गा तिणें पुरविली इच्छा ॥२॥ ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनि छंद । घेऊनि आला दान निजतत्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेविला भेद ॥३॥ शब्द हा बहुसार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मागें येतील त्यांसीं । मागोनि आली वाट सिद्धिओळीचि तैसी । तरले तरले गा आणीक ही विश्वासी ॥४॥ वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणिव नागवण नेदी लागो ठाव । म्हणोनि संग टाकी सेवीं अद्वैत भाव । तुका म्हणे हाचि संतीं मागें केला उपाव ॥५॥ (शा.अ.गाथा अ.क्र. ४२६)

हा अभंग वाचला आणि मी एकदम स्तब्धच झालो. एकदा वाचल्यानंतर हा अभंग काहीच कळला नाही. मग दोन-तीन वेळा वाचला आणि अभंग थोडा थोडा उकलायला लागला. तुकोबांना डोळे असून ते स्वतःला आंधळा का म्हणून घेतात? इथूनच अभंगाची आणि चिंतनाची खरी सुरुवात होते. अत्युच्च पातळीवर जाऊन एखादा लेखक-कवी एखादी कलाकृती निर्माण करतो तेंव्हा जीवनाचे अनंत कंगोरे घेऊन ती कृती बाहेर येत असते. प्रस्तुत अभंगात आंधळा हे रूपक असून इथे तुकोबांच्या जीवनातील एक वेगळ्या अंगाच्या अनुभूतीचे दर्शन होते.

वारकरी संप्रदाय आणि वारकरी संत केवळ भजन-कीर्तन-वारी करणारे किंवा नुसते टाळकुटे नव्हते आणि नाहीत सुद्धा याची पुरेपूर खात्री या अभंगद्वारा झाल्याशिवाय रहात नाही. वारकरी भजन, भक्ती, ज्ञान, वैराग्य इत्यादी विषयाचा अंगीकार तर करतातच परंतु वारकरी हे योगाचार्य सुद्धा आहेत याची वारंवार खात्री होत असते. आद्य वारकरी संत नामदेवराय संतश्रेष्ठ ज्ञानोबाराय यांची महती सांगतांना लिहितात,

**ज्ञानराज माझी योग्यांची माउली ।जेणें निगमवल्लि प्रगट केली ॥अध्यात्म विद्येचें दाविलेंसें रुप ।चैतन्याचा दीप उजळिला ॥**

हा अभंग वाचल्यानंतर संत ज्ञानदेवांचा अधिकार भक्ती, ज्ञान आणि योग क्षेत्रात किती मोठा होता( ? ) हे सहजतेने दृगोचर होते. अगदी हाच वसा-वारसा सतराव्या शतकांत सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले तुकोबाराय पुढे चालवतात. यामुळेच तुकोबाराय वारकरी संप्रदायाच्या कलशस्थानी शोभायमान आहेत! 'आंधळा' प्रकरणातील वरील अभंग आजसुद्धा अत्यंत महत्वपूर्ण असून त्याद्वारे संत तुकोबाराय हे महान योगी होते हे लक्षात येते. भक्तीचे सोप्यात सोपे मार्ग तर तुकोबा सांगतातच; परंतु त्यांची अनुभूती त्याहीपेक्षा वेगळी आहे हे या अभंगातून लक्षात येते. 'सहज मी आंधळा गा' म्हणजे तुकोबाराय भंडारा-भामनाथाच्या डोंगरावर ब्रह्ममुहूर्तावर, एकांतात योग-प्राणायाम-ध्यान करत होते याची ही सर्वोत्तम अनुभूती आहे. माऊली हरिपाठात 'योग-याग विधी येणे नोव्हे सिद्धी' असे जरी म्हणत असले तरी आत्मानुभूतीसाठी योग-प्राणायामाला अन्य पर्याय नाही हे ही तेवढेच महत्वपूर्ण आहे. मी आंधळा आहे. जे डोळ्याने दिसते त्याच्यापलीकडचे मला आत्तापर्यंत दिसत नव्हते. आत्तामात्र माझी वृत्ती निवृत्ती झाली असून मला जे दिसते ते काहीही दिसत नाही. एवढेच काय माझ्यासाठी मी स्वतः सुद्धा हरवलो असून मज सर्व काही अदृश्य झाले आहे. भगवान बुद्धांनी आणि महर्षी पतंजलींनी प्रतिपादन केलेल्या अष्टांग मार्गातील ही सर्वोच्च समाधी अवस्था आहे, किंबहुना तुकोबाराय त्याहीपलीकडे गेले आहेत. त्यांची उन्मनी, तुर्या अवस्था झाली आहे. आता ते सुखाने निद्राधीन झाले असून शून्याच्या पलीकडे पोहचले आहेत. चित्त-मन-बुद्धी-शरीर सर्वकाही भृकुटीच्या ठिकाणी केंद्रित झाले असून त्रिकुट शिखरावर म्हणजेच इडा-पिंगला-शुषुम्ना या तिन्ही नाडीचा भृकुटीच्या ठिकाणी त्रिवेणी संगम झाला असून तेथून त्यांच्यावर जीवनातील सर्वोच्च आनंदाची वृष्टी होत आहे. आत्मानंदाचे अलौकिक दान फुकट पदरांत पडते आहे. एवढे सर्वोच्च दान प्राप्त झाल्यामुळे महाराजांनी इतर कुणाला काही-बाही मागण्याचे पात्र-झोळी टाकून दिली. आपल्या भोवतालचा कोल्हाळ म्हणजेच झालेला संसार-जीवन-विचार, सुःख-दुःख, आप-पर भाव आदीं



बाबींचा भौतिक व्यवहार-गोंधळ-बाजार संपविला. उन्मनी प्राप्त तुकोबांना कुणाकडून काहींच दान-भिक नको आहे. आत्मानुभूती उच्चतम अवस्थेमुळे महाराजांना सतरावी अवस्था म्हणजे शरीरातील व्योमचक्रातील चंद्रामृतरुपी जीवनकला प्राप्त झाली आहे. योगातील ही सर्वोच्च अवस्था आहे. महाराजांची अवस्था इथे सुःख-दुःखातीत झाली आहे. त्यानंतरचे अभंगातील 'ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद ।अरूप जागविला दाता घेऊनि छंद' हे चरण महाराजांची कुंडलिनी जागृत अवस्थेची अनुभूती आहे. ज्ञानेश्वरीतील

**तैशी ते कुंडलिनी, मोटकी औट वळणी। अधोमुख सर्पिणी, निजैली असे ॥२२३ ॥तेथ अध वरौतें आकुंचे, ऊर्ध्व तळौतें खांचे। तया खेंवामाजि चक्राचे, पदर उरती ॥२३७ ॥**

सहाव्या अध्यायातील २२३ ते २३८ ओव्या कुंडलिनी आणि तिच्या जागृत अवस्थेचा इतिवृतांत देतात. हीकुंडलिनी शरीरात मुलाधार चक्रात गहन निद्रेत असते. मुलाधारचक्रात वास करणाऱ्या निद्रिस्त कुंडलिनीला जागृत करणे हे योग्याचे अंतिम ध्येय! ही कुंडलिनी जप, तप, ध्यान, कीर्तन, भक्ती, ज्ञान, कर्म, मुद्रा, बंध, शक्तिचालन, प्राणायाम, शक्तिपात आदि प्रकारांनी जागृत होते. या अवस्थेत महाराजांनी "सोहम्" शब्दांचा नाद करून महाराजांना निजतत्व म्हणजेच आत्मतत्व आणि निजबोध म्हणजे स्वत्वबोध प्राप्त झाला आहे. याशिवाय महाराज स्वस्वरूपी मिळाले असून त्यांना बाहेरच्या संसारिक व्यवहाराचे काहीही देणे-घेणे राहिले नाही. भेदा-भेदावस्था, द्वैताद्वैताच्या पलीकडे महाराज पोहोचले आहेत. ते आत्मानंदात तल्लीन झाले आहेत. त्यांना पूर्णतः भौतिक-संसारिक अंधत्व आले आहे.

या अभंगातील ४-५ क्रमांकाचे चरण हे ही सर्वोच्च अनुभूती व्यक्त होण्याच्या कारणासाठी आले आहेत. 'आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने' या शब्दानुभूतीप्रमाणे इथेही महाराज शब्दांना अनन्यसाधारण महत्व देतात. मानवाला शब्दरूपी जीवनाचे महत्तम सारतत्व प्राप्त झाले असून, शब्दच हे तमाम मानवांसाठी सर्वोच्च उपकार आहेत. त्यामुळेच मागून येणारांसाठी म्हणजेच आपल्या सर्वांसाठी हा अनुभव शब्दांनी इथे देतो आहे असे महाराज सांगतात. आपण सर्वांनी प्रस्तुत आत्मतत्वबोधाची अनुभूती भजन-कीर्तन-यम-नियम-आसन-योग-प्राणायाम-ध्यान-धारणा-समाधी आदिपैकी जे जमेल त्या साधनाच्या माध्यमातून सिद्ध-बुद्ध झालेली, चालत आलेली ही महततत्वाची वाट पुढेही अशीच चालत न्यावी लागेल, जेणेकरून या वाटेने आणखी मागून येणारे अनेक जण संसार सागर म्हणजेच भव सागर सहजतेने तरून जातील. हे महत्वपूर्ण वर्म आपण आपल्या जीवनात घट्ट धरून ठेवावे. जाणीव-नेणिवेच्या पलीकडे जाऊन आत्मतत्वाचा बोध आपण सर्वांनी घ्यावा. त्यामुळे आपण सार्वांनीच क्षणिक, संसारिक, नाशिवंत, विकारांचा संग-सोबत टाकून द्यावी आणि अद्वैत भाव धरावा. हे मी माझे पदरचे संगत नसून माझ्या अगोदरच्या अनेक योगी-जपी-तपी-ऋषी-मुनि-संतांनी सांगितले असून आपणही त्याच मार्गाने जावे. स्वस्वरूप, निजबोध, आत्मतत्व, आत्मानंदानुभूती करून घ्यावी आणि 'सुखाने निद्रा' घ्यावी असे महाराज या अभंगद्वारा सांगतात.

तुकोबांचा हा अभंग अत्यंत महत्वपूर्ण असून आपण सर्वांनीच यातून बोध घ्यावा. सांप्रतकाळी माणसाने आपल्यासमोर अनंत प्रश्न, समस्या आणि व्याधी निर्माण करून ठेवल्या आहेत. भौतिकतेच्या आकर्षणातून कुणीही बाहेर यायला तयार नाही. एक काळ साधने कमी होती, परंतु माणसं सुखी-आनंदी-समाधानी-एकोप्याने नांदायची. अलीकडच्या २० वर्षात सर्व काही झपाट्याने बदलले. सगळे काही विखुरले गेले. साधनांची रेलचेल झाली, अन्न-वस्त्र-निवाऱ्याची उत्तम सुविधा झाली, परंतु दुसरीकडे याचा विपरीत परिणाम झाला. कुटुंबे विभक्त झाली, आनंदी-निरोगी माणूस दुःखी-कष्टी-रोगग्रस्त झाला. अस्तित्वात नसलेले नवनवीन भयंकर रोग आले. मुबलकता असतांना माणसं आनंदच हरवून बसली. समाजकारण-राजकारणच काय; दुर्दैवाने अध्यात्म क्षेत्रसुद्धा याला अपवाद राहिले नाही! निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या सामाजिक-राजकीय चळवळी लुप्त झाल्या. अध्यात्मिक क्षेत्रांत ऋषी-मुनि-साधक-संतांनी महत्प्रयासाने विनामूल्य वाटलेली महान तत्वे-ज्ञान-भक्ती-वैराग्याच्या दानाचा प्रचार-प्रसारक (हमाल) मंडळींनीच व्यापार सुरु केला. इथेच सगळं पाणी मुरलं. सोनेच गंजल्यामुळे लोखंड अक्षरशः नष्टप्राय व्हायला आले!

तेंव्हा महानुभाव बंधू-भगिनींनो, आता सर्वांनी वेळीच सावध होण्याची महत्वपूर्ण वेळ आली आहे. संतांच्या मार्गाचे अनुक्रमण करतांना आपल्या जीवनात त्यांनी सांगितलेली मुलतत्वे रुजविण्याचा प्रयत्नपूर्वक प्रयत्न करावा लागेल. तसे झाल्यास माणसामाणसांमधील दरी कमी होऊन होत असलेला असहिष्णू, कट्टरतेचा प्रचार-प्रसार थांबेल. माणूस टिकला तरच धर्म टिकेल या न्यायाने; माणूस प्रथम आणि धर्म नंतर ही भावना समाजमनात रुजवावी लागेल. असे झाले म्हणजे पृथ्वीतलावरील तमाम सृष्टी, प्राणी, मानव आनंदाने नांदेल. कुठेही युद्ध असणार नाही. सगळीकडे शुद्ध बुद्ध-पतंजली-ज्ञानोबाराय-तुकोबारायांनी प्रतिपादन केलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब होऊन 'सर्वे संतू निरामयः' ही सर्वोच्च अवस्था निर्माण होईल! असे होणे म्हणजेच आत्तापर्यंत मार्ग दावून गेलेल्या महापुरुषांच्या आचार-विचार-जीवनाचे, तद्वतच या "तुकाराम नीती"चे सार्थक होईल! जय तुकोबाराय!

# ना.धों. महानोर यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**निसर्ग कवी ,ग्रामीण कवी व ज्यांच्या कवितेला रानातल्या मातीचा गंध येतो. ते कविवर्य ना. धों महानोर यांचे पूर्ण नाव नामदेव धोंडो महानोर, जन्म १६ सप्टेंबर १९९१ औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड येथे झाला. अनेक पुस्तके व पुरस्कारांचे मानकरी,औदुंबर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असलेल्या महानोर यांचा ' तिची कहाणी 'हा काव्यसंग्रह वाचत असताना एक पुरुष असून सुद्धा स्त्रियांच्या जीवनाचे हळुवार पैलू त्यांनी शब्दबद्ध केल्याचे दिसते. या कवितेत स्त्री व तिचे भावविश्व कवीने रेखाटले आहे. माहेर हा स्त्रीच्या जिव्हाळ्याचा विषय परंतु कौटुंबिक अत्याचार, कोवळ्या वयात अनेक बाळंतपणे, घटस्पोटीता व अकाली वैधव्य आलेल्या स्त्रियांसाठी माहेर कसे असते याचेही वर्णन कवीने केले आहे. या कविता गद्य सदृश्य आहेत.**

वंशाला दिवा हवा म्हणून अनेक बाळंतपणं जेंव्हा एखाद्या स्त्रीवर लादले जातात तेंव्हा तिला बाळंतपणासाठी माहेरी आल्यानंतर तिच्यासाठी माहेर कसं असतं ? हे कवी पुढील ओळीतून सांगतात.

ऐन पंचविशित म्हातारपण सोसताना... तिचं भरल्या संसारात मन जळून जाताना... कुठे शब्दही बोलण्याचा तिला अधिकार नाही प्रत्येक गर्भारपणात माहेरच्या आठवणी ती जळून जाई...

माहेर जरी असलं तरीही तिथे पहिल्या एक दोन बाळंतपणाचे कोड कौतुक केलं जातं, परंतु मुलगा हवा म्हणून जर सात -आठ वेळा बाळंतपण होत असतील तर माहेरातही त्या बाळंतपणाचे कौतुक नसतं. तिला तिथेही अवहेलना सोसावी लागते. सासरचे लोकही मुलगा नाही म्हणून तिला शिव्या शाप देतात. माहेरचेही तिच्या बाळंतपणाला कंटाळतात. एखादा व्यसनी नवरा जेव्हा स्त्रीला खूप मारझोड करतो, त्रास देतो व माहेरी ही कोणी उरलेलं नसतं तेंव्हा तिच्या मनाची अवस्था काय असते ती पुढील ओळीतून कवीने व्यक्त केली आहे. माहेरी कोणीही उरलेलं नाही

माझे मायबाप तुम्हीच. बापहो तुम्हीच सांगा मी कोणत्या रस्त्यावर राहू ? घरदार असून घर पाठीशी लागलेलं कुठल्या काळातलं पाप माझ्या नशिबी आलेलं... माहेरच हक्काचं कुणी नसल्यामुळे ती स्त्री गावातील लोकांपुढे हंबरडा फोडून मी कुठे राहू ? हा प्रश्न विचारते तिच्या अंग अंगावर नवऱ्याने मारलेल्या खुणा त्याचे व्रण दिसतात. त्याचेही वर्णन कवीने केले आहे. पुढे लग्न होऊन सासरी गेल्यानंतर बऱ्याच वर्षांनी माहेरी आलेल्या स्त्रीच्या मनाची अवस्था कवीने व्यक्त केली आहे. लग्न होऊन जाताना... पुन्हा माहेरी येताना गणमन भवरी, उध्वस्त गढीच्या शेजारी. इतक्या वर्सांनी... वळू नयेत पाय किती वर्ष लोटली तरीही.... डोळ्यांवर पिवळी कावीळ अजूनही पसरलेली ' गरिबाघरची लेक' या कवितेत कवी म्हणतात.

माहेरच्या गरिबीत लगटून राहिलेलं. तिच्या शब्दांचं मुकेपण... भयभीत तिला कधी सांगताच आलं नाही गरिबाघरची लेक जेंव्हा मोठ्याच्या घरी सून म्हणून जाते. तेंव्हा तिचा वारंवार अपमान केला



जातो. माहेरच्या लोकांचा उद्धार केला जातो. परंतु माहेरी गरिबी असल्यामुळे ती हे सारे मुकाटपणे सहन करते. तिच्या भावना तिला कोणालाच सांगता येत नाहीत. कोवळ्या वयात वैधव्याचे दुःख जिच्या नशिबी येते. तिच्या विषयीचे वर्णन कवीने पुढील ओळीत केले आहे. कुटुंबातल्या माणसांची रडारड केली. तिची समजूत घातली. भरल्या डोळ्यांनी. भरल्या डोळ्यांनी. तिला परोपरी विनवलं. सासरला राहण्यासाठी. माहेरी न जाण्यासाठी. अठरा वर्षाच्या दिरासोबत पुन्हा लग्न करण्यासाठी. वटलेल्या संसारातून निघून गेलेल्या त्याच्या आठवणी डोळ्यात. पंधरा वर्षांपूर्वी काडीमोड झालेल्या स्त्रीसाठी माहेर कसे आहे ?हे पुढील ओळींमध्ये कवी व्यक्त करतात. पंधरा वर्षांपूर्वीच तिचा काडीमोड झालेला. आता नजीकच्या खेड्यात एकटीच राहते. कोणीच न्याय निवाडा केला नाही गावात... माहेरी ती दिवस-रात्र... काबाडकष्ट करते झोपड्यात.

बऱ्याच वर्षानंतर माहेरी आलेल्या स्त्रीचे वर्णन करताना कवी म्हणतात, ती सुखरूप तिच्या संसारात. दूरच्या प्रदेशात.
दुसऱ्यांदा माहेरी आलेली चाळीस वर्षात.
बदलून गेलेला गावचा चेहरा तिला ओळखताही येत नाही
तिच्या सत्तर वर्षाच्या डोळ्यांनी माहेरचं गणगोतही तिला नीट ओळखता आलं नाही. _सगळं बदलून गेलेलं.

बऱ्याच वर्षांनी माहेरी आल्यावर माहेरी झालेले बदल पाहून तिला तिचे गणगोत ही नीट ओळखता येत नाही. गोकुळासारखं नांदणारे माहेरचे जुनं घर व शेणानं सारवलेलं तुळशी वृंदावन
आता सारं काही बदललेलं दिसतं. माहेरातल्या अनेक आठवणी विषयी कवी म्हणतात, तिचं लदबदलं माहेरपण हजार गोष्टींचं. माहेरच्या अनेक आठवणीने जणू तिच्या अंगावर दरवळता रुणझुणता माहेराचा वारा येतो. आपल्या आईच्या अनेक आठवणी कवी सांगताना दिसतात. गरीब परिस्थितीमुळे आईला स्वतःसाठी कधी नवीन चोळी लुगडं घेता आलं नाही. हे सांगताना कवी म्हणतात,
तुझ्या चोळी लुगड्याला गाठी बांधल्या कितीक
नव घालताना आम्हां साऱ्या जगाचं कौतिक

आईने सारे दुःख मुकपणाने सोसले तिच्याविषयी कवी म्हणतात,

**कुठे शिकली गं माये, दुःख सोसण्याच्या वेणा**
**साऱ्यांसाठी हासण्याचा पुन्हा खोटाच बहाणा.**

कधी चिडलेल्या आईने आपल्याला खूप मारलं परंतु नंतर तिलाच आपली माया आली. तिचा जीव कासावीस झाला हे कवी पुढील ओळीतून कवी सांगतात,

**किती बदडले मला वळ अजून पाठीला**
**पुन्हा लपेटून तुझा जीव कासावीस झाला.**
**सारे झोपले तरीहि राती चुलीला पोतरा**
**निजताना गोंजारून पदरानं घाली वारा.**

सासरी गेलेल्या लेकींच्या आठवणी सांगणाऱ्या आईच्या भावना कवितेतून कवीने व्यक्त केल्या आहेत.

**लेकी गेल्या दूर देशी जशा चिमण्या आकाशी**
**त्यांचं नांदणारं घर तरी येते माहेराशी**

आपल्या दूर गेलेल्या आईशी हितगुज करताना कवी म्हणतात,

**किती दिस आले गेले मीहि थकलो गं आई**
**माझ्या दुःखाचे गाठोडे तुला सांगणार नाही**

आईच्या शेवटच्या क्षणी आईला आपल्याला काही बोलायचे होते व आपल्यालाही आईशी काही बोलायचे होते ते तसेच राहून गेले या भावना ही कविने व्यक्त केल्या आहेत.

**निघताना दूर देशी अखेरच्या भेटीगाठी**
**तुझे पानावले डोळे लपेटून ओटीपोटी**
**किती सांगायचे होते शब्द थांबले ओठाशी**
**साऱ्या चिडी पाखरांचे घर तुझ्या खाटीपाशी**

आईच्या लुगड्याच्या गोधडीचा स्पर्श कवीला खूप हवाहवासा वाटतो. ते म्हणतात,

**तुझ्या जुन्या लुगड्याच्या गोधडीचा परिमळ**
**आणि देव्हाऱ्यासारखं तुझं आयुष्य निर्मळ**
**तुझी शेतीबाडी, झाडी लक्ष पाखरांचा थवा**
**जिवाभावाच्या नात्याचा माझा खरा गोतावळा.**

आई निघून गेली तिच्या अनेक आठवणी कवीने कवितेतून व्यक्त केल्या आहेत. त्यांना जिवाभावाच्या नात्यांचा गोतावळा हवा आहे. अशाप्रकारे आपल्या 'तिची कहाणी' या संग्रहात कवीने प्रत्येक स्त्रीसाठी माहेर कसे आहे याचे वर्णन केलेले आहे. त्यांची ही कविता म्हणजे स्त्री जीवनाचे त्यांनी केलेले सूक्ष्म निरीक्षणच आहे.


# निकाल

आधुनिक केसरी

**फुलांनी बाग फुलावी त्याप्रमाणे छत्रपती विद्यालयाचे मैदान मुलांनी फुलून गेले होते. अजूनही काही विद्यार्थ्यांचे घोळक्या घोळक्याने आगमन होत होते.काही विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालकही येताना दिसत होते. विद्यार्थी-पालक यांच्या चेहऱ्यावरील उत्सुकता शिगेला पोहोचली होती कारण थोड्याच वेळात विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या परिश्रमाचे फळ मिळणार होते. शाळेच्या वार्षिक निकालासाठी गावचे सरपंच,उपसरपंच हे सुद्धा उपस्थित झाले होते. शालेय नियोजनाप्रमाणे ठीक दहा वाजता शाळेच्या मुख्याध्यापकांनी लवकरच निकाल जाहीर केला जाईल असे घोषित केले आणि सर्वांची उत्कंठा दाटून आली. गावचे सरपंच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विराजमान झाले.**

सरस्वती पूजनानंतर सर्वप्रथम इयत्ता पाचवीचे वर्गशिक्षक निकाल वाचण्यासाठी पुढे सरसावले.पाचवीमधून सर्वप्रथम आलेली आहे कु. प्रगती काळे असे उच्चारतात टाळ्यांचा पाऊस पडला.तिला शाळेकडून गोष्टीच्या पुस्तकांचा संच,प्रमाणपत्र व गुणपत्रक देण्यात आले.तेवढ्यात सरपंच उभे राहिले व त्यांनी जाहीर केले की वर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला 201 रुपये द्वितीय येणाऱ्याला 101 रुपये व तृतीय येणाऱ्याला 51 रुपये ते स्वतःतर्फे देणार आहेत.त्यांच्या घोषणेनंतर पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला.त्यांनी प्रगतीला दोनशे रुपयाची पाकीट बहाल केले.याप्रमाणे एकामागून एक शिक्षक येऊन आपापल्या इयत्तांचे निकाल जाहीर करत होते.गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वाटप केले जात होते. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलत होते.परीक्षेच्या निकालानंतर शाळेच्या पर्यवेक्षकांनी शाळेच्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण केले. सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा या विविध स्पर्धांमधील यशस्वी स्पर्धकांना भरघोस पारितोषिके वाटली गेली. छत्रपती विद्यालय हे तालुक्यातील उपक्रमशील विद्यालय असल्याने तसेच विद्यार्थ्यांची प्रगती पाहून सरपंच, उपसरपंच यांनी शाळेलाही मदतीच्या आश्वासन आपल्या भाषणातून दिले. मुख्याध्यापकांनीही आपल्या भाषणातून गुणवान विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्वांनी चांगला अभ्यास करावा असे आवाहन केले.यानंतर सर्वांना गुणपत्रके वाटली केली आणि वार्षिक निकालाचा कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले.

विद्यार्थी आपल्या मित्रांशी गप्पा मारत,मिळालेल्या गुणांची चर्चा करत,उन्हाळ्यातील सुट्टीचे नियोजन सांगत गटागटाने बाहेर पडत होते.सरपंच,उपसरपंच हे मुख्याध्यापकांचा निरोप घेऊन त्यांच्या कार्यासाठी निघून गेले. मैदानावर आता तुरळक पाच-सहा विद्यार्थी उभे होते आणि तेही घराच्या वाटेला लागले. तेवढ्यात जाधव सरांनी त्या विद्यार्थ्यांपैकी सुनीलला हाक मारली सुनीलने ऐकून न ऐकल्यासारखे केले व जड अंतकरणाने पुढे पुढे चालत राहिला.शेवटी न राहवून सर धावत सुनीलकडे गेले.त्याचा हात हातात घेतला त्याच्या पाठीवर हात फिरवला.त्याने आतापर्यंत रोखून धरलेले अश्रू धारा होऊन वाहू लागले.जाधव सरांनी त्याला शाळेतील बागेच्या एका बेंचकडे नेले.तोवर त्याचे मित्र निघून गेले होते. जाधव सरांनी त्याला प्रेमाने विचारले,"सुनील रडायला काय झाले ?"आता मात्र सुनीलचे अवसानच गळाले आणि तो हुंदके देऊ लागला.सर पुन्हा पुन्हा त्याची चौकशी करत होते.सुनील मात्र हुंदके देण्याशिवाय काहीही करत नव्हता.अखेर सर म्हणाले निकाल जाहीर झाल्यापासून मी पाहतोय तुझा चेहरा रडवेला झाला होता. सुनील,"तुला बक्षीस मिळाले नाही म्हणून रडतोय की काय ?अरे तू नापास तर नाही ना झालास ?बघु तुझे गुणपत्रक,अरे वा! तू प्रथम श्रेणीत पास झाला आहेस.तुझे अभिनंदन!" सुनील,नको सर. काय नको सर.मी अभिनंदनला पात्र नाही.मी काही कामाचा नाही. "अरे



असे काय म्हणतो ? मी काही कामाचा नाही. असे कोण म्हणतो ?" इती जाधव सर. त्यांनी बॉटलमधील पाणी काढून सुनीलला पाजले व म्हणाले तू आधी पाणी पी.शांत हो.मग बोलू. सुनीलने पाणी पिले त्याचे उसाचे आता थांबले होते.सरांनी पुन्हा विचारले, "तू काही कामाचा नाहीस असे कोण म्हणतो ?" सुनील उद्गारला सगळेच म्हणतात सगळे म्हणतात म्हणून तुलाही असेच वाटते का की तू काही कामाचा नाहीस. निरुपयोगी आहेस.हो सर मलाही असे वाटते की मी निरुपयोगी आहे.आता मात्र सरांना धक्का बसला की मुलाच्या मनामध्ये न्यूनगंड पक्का झाला आहे.तरी सरांनी समजावले तुला असे का वाटते ? की तू निरुपयोगी आहेस. सुनील उत्तरला सर मी एवढा अभ्यास करूनही नंबर मिळू शकलो नाही. अरे सुनील शाळेत नंबर मिळणारेच उपयोगी असतात असे तुला म्हणायचे आहे का ? यावेळी नाही तर पुढच्या वेळी येईल त्यात काय एवढे ? नाही सर मी दरवर्षी हेच स्वप्न पाहतो पण पाचवीपासून नवीनपर्यंत कधीही हे होऊ शकले नाही. पुढच्या वर्षी तर बोर्डाची परीक्षा आहे तेथे तर माझा नंबर येणेच नाही,सुनीलने स्पष्टीकरण दिले. असू दे. तू चांगला अभ्यास करतोय प्रयत्न करतोय ते तर ठीक आहे ना! अभ्यासात जर काही तुझ्यापुढे असतील पण इतर गोष्टीत तुही त्यांच्या पुढे असतील ना! सुनीलने यावर उत्तर दिले सर मी कशातच पुढे नाही.आपल्या वर्गातील ती माधुरी किती सुंदर अक्षर आहे तिचे! सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत पहिला नंबर मिळविला. तो राहुल किती छान भाषण करतो. ती नेहा किती सुंदर चित्र काढते.तो संजय किती छान निबंध लिहून प्रथम आला .मला तरी यातील काहीच जमले नाही. आता मात्र सुनीलपुढे काय बोलावे हे जाधव सरांनाही सुचत नव्हते. तरी पण ते म्हणाले,"परीक्षा,चित्रकला,निबंध,वक्तव्य,सुंदर हस्ताक्षर हे सर्व गुण एकाच विद्यार्थ्यामध्ये आहेत का ?"सुनील,"नाही" मग एकाच वेळी तू सर्वांशी तुझी तुलना कशी करतोस ? पण सर त्यातील एकही गुण माझ्यामध्ये नाही ना! सुनील लगेच उद्गारला.सुनील जणू काही वादविवाद स्पर्धेमध्ये मुद्दे मांडल्याप्रमाणे सरांशी बोलत होता. सरांनी बोलता बोलता त्याला शिक्षक कक्षात आणले.तेथे अल्पोपहाराचा कार्यक्रम चालला होता. सरांनी सुनीलला नाष्टा करायला सांगितले. तेवढ्यात देशमुख सरांनी म्हटले अहो जाधव सर तुमचा नाश्ता वाट बघतोय.एवढ्या वेळ तुम्ही काय करत होता आणि हा विद्यार्थी तुमचाच ना ? एवढा वेळ कसा काय थांबला ? जाधव सरांनी थोडक्यात सुनीलची कथा सांगितली.त्याला जास्त टेन्शन घ्यायचं नाही असा मोघम सल्ला देऊन ते निघून गेले.तेवढ्यात शिपाई रामभाऊने जाधव सरांना नाष्टा आणून दिला व म्हणाले,"अरे सुनील तू इथे ?थांब तुलाही नाष्टा देतो." रामभाऊंनी सुनीलला नाष्टा दिला आणि म्हणाले बरं का जाधव सर सुनीलने मागच्या रविवारी खूप मोठे काम केले. जाधव सरांनी विचारले,"अरे वा असे कुठले मोठे काम केले याने ?" रामभाऊ म्हणाले,"अहो माझ्या पत्नीबरोबर मुलगी शारदाही गेली होती कपडे धुण्यासाठी नदीवर. तेथे ती पाण्याची खेळत होती आमची ही कपडे धुण्यात मग्न. शारदा पाण्यात पुढे पुढे गेली अन गटांगळ्या खाऊ लागली. आवाज करू लागली.तुमचा सुनील तिथे होता आज त्याने क्षणाचाही विलंब न करता पाण्यात उडी मारली व शारदाला सुखरूप बाहेर काढले.मोठे उपकार आहेत आमच्यावर.हे ऐकून सुनीलला हायसे वाटले.सरांनी त्याच्या पाठीवर थाप मारली. सर्व शिक्षकांना बोलून सर्वांसमक्ष सुनीलच्या कर्तबगारीबद्दल सुनीलचे कौतुक केले व माझ्याकडून सुनीलला एकशे रुपये बक्षीस म्हणून त्याला बक्षीस दिले.सर्व गुरुजींनी टाळ्या वाजवल्या.या छोटेखानी सत्काराने सुनीलच्या चेहऱ्यावर हास्यछटा उमटली. त्यानंतर सुनील आनंदाने घरी निघून गेला. सुनील निघून गेला तरी त्याचा विचार सरांच्या डोक्यातून बाहेर पडला नव्हता. सुनीलच्या न्यूनगंडरुपी रोगावर वेळीच इलाज केला नाही तर फार भयंकर समस्या उद्भवू शकते याची जाणीव त्यांना होती. रामभाऊ हे गावातीलच असल्याने सरांनी त्यांच्याकडून सुनीलच्या घरची इत्तंभूत माहिती घेतली. त्यानंतर त्यांना कळले की सुनीलचे आई-वडील इतरांबरोबर त्याची तुलना करतात.तुला सर्व सुखसोयी आहेत मग तुझा का नंबर येत नाही ?असे धमकावतात. वेळप्रसंगी मारही देतात.हे ऐकूण सरांना फार वाईट वाटले.त्यांच्या पालकांचे प्रबोधन करणे फार गरजेचे आहे याची जाणीव सरांना झाली.सरांनी त्याच्या पोहण्याचीही आणखी माहिती विचारली.तेव्हा रामभाऊ म्हणाले की,"माझी ही सांगत होती की झटपट सूर मारून क्षणार्धात मुलगी बाहेर काढले." सरांना सुनीलचा मोठा गुण सापडला होता. आज त्यांनी त्याच्या न्यूनगंडावर तात्पुरती मलमपट्टी केली होती मात्र ते एवढ्यावर थांबणारे नव्हते. जाधव सर सुनीलच्या घरी गेले. सुनील बाहेर गेला होता. त्यांनी पालकांचे प्रबोधन केले. त्यांना सांगितले की सर्व मुलांचा बुद्धांक सारखा नसतो.मुले काही यंत्र नाहीत की पाहिजे ती टक्केवारी पाहिजे तो नंबर मिळेल. त्यांनी जर असाच अट्टहास केला तर सुनील आत्महत्येच्या मार्गालाही वळू शकतो.हा धोका लक्षात आणून देताच त्यांना त्यांची चूक उमगली. त्यांनी जाधव सरांची माफी मागितली.सर म्हणाले माझी माफी मागण्यापेक्षा त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्याच्या पोहण्याच्या कलेला प्रोत्साहन देणे व शास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व सरांनी सांगितले.त्यांनाही सरांचा विचार पटला परंतु आर्थिक अडचण समोर आली. सरांनी त्यावरही तोडगा काढला.म्हणाले तुमच्या सुनीलला उन्हाळ्याच्या सुट्टीत एक महिना माझ्या गावाकडे अमरावतीला ठेवा त्याला पोहण्याची धडे मी देतो. अमरावतीला हनुमान व्यायाम प्रसारक मंडळामध्ये पोहण्याचे शास्त्रीय शिक्षण मिळेल. हे सरांना चांगले ठाऊक होते. त्यावर सुनीलची आई म्हणाली सर अमरावतीला माझी मावसबहीण राहते तो तिच्याकडे राहू शकेल. तुम्ही फक्त फीचे तेवढे बघा. सरांना आनंद झाला. चार-पाच दिवसानंतर सुनीलचे आई-वडील त्याला घेऊन सरांकडे आले. सरांनी त्याचा प्रवेश घेतला. योगायोगाने सुनीलच्या मावशीचे घरही थोड्याच अंतरावर होते. सुनील रोज आनंदाने पोहण्याचा सराव करत होता मधून मधून सरही त्याचा सराव पाहायचे.त्याला प्रोत्साहन द्यायचे.सुनील आता पोहण्यात तरबेज होऊ लागला त्याच्या वयोगटापेक्षा मोठ्या वयोगटाच्या मुलांनाही तो मागे टाकत होता. आपणही काही करू शकतो हा विश्वास त्याला मिळाला होता. हे सर्व चलचित्रप्रमाणे सरांच्या डोळ्यासमोरून धावत होते.सरांनी पुन्हा एकदा पेपरमधील बातमी व चित्र आपल्या डोळ्यासमोर धरले व तेवढ्यात फोन खणखणला. हॅलो सर मी सुनील शिंदे बोलतोय बातमी वाचली का ?सरांचा उर अभिमानाने भरून आला.सरांनी त्याचे अभिनंदन केले त्याला म्हणाले,"आज तू आंतरमहाविद्यालयाच्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेस.असेच प्रयत्न कर.परमेश्वरावर श्रद्धा ठेव. तुझे भविष्य उज्वल आहे. तुला अखंड आशीर्वाद"असे म्हणत फोन ठेवला. तेवढ्यात नकळत दोन आनंदाश्रु सरांच्या गालापर्यंत निघून आले होते.त्यांना आपल्या पाच वर्षांपूर्वीच्या कष्टाचे फळ मिळाले होते.जणूकाही त्यांचा निकाल आज लागला होता.

संजय अरुणराव बोरसे
संपर्क 9404031721
जि.प.प्राथ. शाळा केंद्र-भूगाव, ता. मुळशी, जि.पुणे

# गणेश सरकटे तू चाल पुढं.....



संजय व्यापारी
संपर्क क्र. 7743918559

आधुनिक केसरी

**बबन पांड्या, तू चाल पुढं या झी मराठीवरील सध्या सुरु असलेल्या लोकप्रिय सिरीयल मधील बबन म्हणजेच गणेश सरकटे सध्या त्याच्या वेगवेगळ्या रोलमूळे चांगलाच प्रकाशझोतात येत आहे त्याच्याशी केलेल्या बातचीत मधून त्याची थोडीशी ओळख... मराठवाड्यातील मातीत म्हणजे जालना तेथे जन्मलेला गणेश याचे बारावी पर्यंतचे शिक्षण जालना येथेच झाले. नंतर सर्व फॅमिली नाशिक येथे शिफ्ट झाली त्यामुळे पुढिल शिक्षण नाशिक येथे झाले.**







स्वातंत्र्यवीर सावरकर, चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके, प्रसिद्ध नाटककार, साहित्यिक कवी वसंत कानेटकर कुसुमाग्रज अशा दिग्गजांची कर्मभुमी असलेल्या नाशिकच्या मातीत मला पुढे शिकायला मिळाले हे माझे खूप मोठे भाग्य आहे, मला नाटकाची आवड लहानपणापासूनच होती पण व्यावसायीक नाटक काय असते ते मला इथे समजले व यातच करियर करायचे हे पुढे मी ठरवीले, माझी सुरुवात इथूनच झाली व मी व्यावसायीक नाटकातून काम करायला लागलो.

मला सिरीयल्स मधून काम मिळू लागले, माझ्या अस्स सासर सुरेख बाई या सीरियलचे 1000 पेक्षा जास्त भाग झाले, यानंतर लक्ष्मी सदैव मंगलम, सारे तुझ्याचसाठी, मी तुझीच रे, ई टीव्हीवर माझे मन तुझे झाले तर दुरदर्शनवर आजचे दावेदार उद्याचे सुपरस्टार, तुझ्यात जीव रंगला व सध्या तू चाल पुढं ही मालिका झी टीव्हीवर सुरु आहे.

मध्यमवर्गीय फैमिली मधील गणेशला लहानपणा पासूनच चित्रपटाबद्दल आकर्षण होते, त्याने शाळेत असतानाच नाटक, गणपती मेळाव्यातून डान्स, नाटक अशा संस्कृतीक कार्यक्रमामधे भाग घेवून अनेक पुरस्कार मिळविली. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, महेश कोठारे यांचे लहानपणी दुरदर्शनवर मराठी चित्रपट बघून मी त्यांचा फॅन झालो त्यातल्या त्यात माझा आवडता होरो म्हणजे लक्षामामा म्हणजेच लक्ष्मीकांत बेर्डे. आयुष्यात मला त्यांचा रोल करायला मिळाला तर ते मी माझे भाग्य समजतो असे गणेशनी सांगीतले, या क्षेत्रातील सर्वात मोठा फायदा म्हणजे इथे आपण नाटकाच्या माध्यमातून अनेक भुमिका जगत असतो ते सामान्य आयुष्यात कोणालाही शक्य नसते, एकाच वेळेस वेगवेगळ्या भुमिका करणे खूप अवघड असते पण आपण स्वतःला त्या भूमिकेत ओतून दिले तर हे शक्य होते असे गणेश म्हणाला.



मी कायम हसून बोलतो, माझा नेहमी मजाकी मूड असतो हे सर्वांना दिसते पण खरे तर माझा स्वभाव खूप हळवा आहे, मी अगदी मनापासून विचार करतो हे फक्त माझ्या घरच्यांना व माझ्या मित्रांनाही माहित आहे.

मला समाजसेवा करायला खूप आवडते, मी जर अभिनेता नसतो तर मी नक्कीच नेता झालो असतो व सर्वांच्या समस्या सोडविण्यात आनंद मानला असता.

मला लहानपणापासूनच वाचनाची आवड आहे, रिकाम्या वेळात मी वाचन करतो, वाचन करित असताना जे जे नवीन सुचते ते लिहून काढतो, याबरोबरच नाटक पहाणे, फिरायला जाणे मला आवडते, वेळ मिळाला तर वेब सिरीज आणि फिल्म बघतो. नवनवीन आव्हानात्मक काम करायला मला खूप आवडते, माझ्या सिरियल्स पाहून येणा-या प्रतिक्रिया मी खूप पॉजिटिव घेतो व त्या सुचनांप्रमाणे माझ्यात सुधारणा करतो.

लहानपणापासून ज्यांना पडद्यावर पहात आलोय त्यांच्या बरोबर आज मला काम करायला मिळते हा माझ्यासाठी सर्वात आनंदाचा क्षण आहे, यासाठी मी देवाचे खूप खूप आभार मानतो.

कपड्यांच्या बद्दल जर विचाराल तर सध्या जे ट्रेंड चालू आहे तो पेहराव करायला मला आवडते. मला आईच्या हातचे जेवण व त्यात सर्वात ज्यास्त पुरणपोळी खूप आवडते.

नुकताच माझा रोल असलेला जैतर हा मराठी चित्रपट या महिन्यात रिलिज झाला व मराठी प्रेक्षकांना हा आवडत आहे, तुम्हीही जवळच्या सिनेमागृहात जावून हा चित्रपट नक्कीच पहा व मला प्रतिक्रिया कळवा.

मला अजून या क्षेत्रात खूपकाही शिकायचे आहे, आत्तातर माझी खरी सुरुवात आहे अजून खूप मोठा पल्ला पार करायचा आहे व यासाठी



तुमच्या शुभेच्छा, आशीर्वादाची गरज आहे, त्या मला मिळतील ही मी अपेक्षा व्यक्त करतो व लवकरच नवीन मालिका, चित्रपटातून भेटूयातच....

# सामाजिक समस्यांना वाचा फोडणारा लेख संग्रह



रामदास राजेगांवकर
मो.नं. ९४२०२३३०३३

आधुनिक केसरी

**आज समाजाला भेडसावणाऱ्या अनेक समस्या आहेत, अनेक प्रश्न आहेत. परंतु खंत एकच आहे, ती म्हणजे त्याकडे डोळसपणे कुणी पहात नाही. कुणी पाहतातही परंतु ते फारसं काही करू शकत नाहीत. काहींचं मन पिळवटून निघते , काही फक्त हळहळ व्यक्त करतात . कारण की त्यांना काही मर्यादा असतात त्यामुळे फारसं काही करू शकत नाहीत. फार तर ते प्रसार माध्यमातून त्या समस्येवर प्रकाश टाकू शकतात. त्यातीलच एक नाव म्हणजे, लेखक दिलीप देशपांडे. त्यांनीही समाजात असलेले अनेक प्रश्न तथा समस्या जवळून पाहिलेल्या आहेत.**

जसे की, व्यक्ती, व्यक्तीमधील संवाद कमी झालेला आहे . ज्येष्ठ तथा वृद्ध व्यक्तींची होणारी आबाळ. महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन. प्लास्टिकचा भरमसाठ वापर व त्याचे दुष्परिणाम. जिल्हा बँकेच्या समस्या. शेतकऱ्यांच्या समस्या. या व अशा अनेक प्रकारच्या , समस्या पाहून त्यांचा ही जीव अगदी तळमळत होता. पण फारसे काही करू शकत नसल्यामुळे, वृत्तपत्रातून त्या समस्येला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. अशा समस्यांवर अनेक लेख लिहून ते लेख, दै. सामना, दै. आधुनिक केसरी, दैनिक देशदूत, दैनिक विदर्भ मतदार, दैनिक देशोन्नती, दैनिक विश्वविजेता, दै. लोकमत, दैनिक जनशक्ती, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दैनिक लोकमंथन, साहित्य चपराक, कला मंच ,दै. रिपब्लिकन गार्ड, आपलं मन ,दै. युती चक्र, अचूक वार्ता, बाळकडू ,अक्षराज ,नांदेड एकजूट , या व अशा अनेक नामांकित वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केले. ते लेख वाचकांना खूपच भावले असे अनेक वाचकांनी कळविले आहे. आणि त्यांच्याच आग्रहावरून ते लेख ग्रंथरूपात आणण्याचे निश्चित केले आणि सारांश हा ग्रंथ निर्माण झाला.

ग्रंथाच्या अगदी सुरवातीलाच लेखक श्री. दिलीप देशपांडे यांनी, मी गेलो असे मानू नका भक्तीत अंतर करू नका हा, गजानन महाराज, शेगांव जि. बुलडाणा . यांची माहिती असलेला लेख मांडलेला आहे. हा लेख वाचून वाचक सहजच म्हणेल की, या लेखामध्ये , लेखकाने कोणत्या सामाजिक समस्या किंवा प्रश्न मांडले आहेत ? हल्ली आपण बघतो की, लग्न कार्य असो की, कुणाच्या वाढदिवसाचे भोजन असो, किंवा इतर कोणत्याही समारंभाचे भोजन असो. भोजन आटोपल्यानंतर त्या भोजनाच्या पानांमध्ये किती तरी अन्न वाया गेलेलं दिसते. हेच अन्न पिकविण्यासाठी आपल्या शेतकऱ्यांना किती कष्ट होतात हे फक्त त्यालाच माहीत. अन्न पिकविता -पिकविता प्रसंगी त्याचेवर आत्मघात करण्याचीही वेळ येते . हे खाऊन नासाडी करणाराला काय कळणार ? आणि हेच आपणास सांगण्यासाठी लेखकाने , गजानन महाराजांच्या चरित्रामधिल तो प्रसंग मुद्दामच येथे मांडला आहे. "२३ फेब्रुवारी १८७८ ,शके १८०० , रोजी देविदास पातुरकर यांच्या घराच्या बाहेर उष्ट्या पत्रावळी टाकल्या होत्या. या पत्रावळीवरिल अन्नाचे कण , गजानन महाराज वेचून खात होते. संतमहात्म्यांना अशा कृतीतून हेच सूचवायचे असते की, बाबांनो अन्न हे फार अनमोल असते ! त्याची अशी नासाडी करणे योग्य नाही.

ग्रंथामधील दुसरा लेख आहे, 'अवघे गरजे पंढरपूर..' . हा लेख वाचतांनाही वाचकाची थोडी गफलत होण्याची शक्यता वाटते. हा पंढरपुरच्या विठ्ठलावर आधारित लेख आहे. या मध्ये कोणत्या समस्या मांडलेल्या आहेत ? असे वाटणे स्वाभाविक आहे. कारण की, हा धार्मिक बाबींवर आधारित लेख आहे. परंतु या मध्येही काही सामाजिक समस्यांचा उलगडा केलेला आहे तो लेख वाचल्यानंतरच लक्षात येईल. जसे की, हल्ली समाजामध्ये उचनिचता, जातीभेद पाळला जातो. तसेच काही सामाजिक संस्कार सुद्धा अस्तगत होत आहेत. परंतु पंढरीची वारी ज्यांनी जवळून पाहिली आहे, किंवा ज्यांनी वारी विषयी वाचलेलं आहे. त्यांना तर या उलटच अनुभव आला असेल अशी मला खात्री आहे. कारण की, वारीमध्ये सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होतात. ते एकमेकांना माऊली म्हणूनच संबोधतात. आणि एवढेच नाही तर, वयाने लहान असो किंवा मोठे असो सर्व वारकरी एकमेकांचे चरणस्पर्श करतात. यामधून आपण काय शिकायला पाहिजे ? हेच लेखकाला सूचवायचे आहे. 'बळीराजाने नाही केला पेरा, तर काय खाल धतुरा ? लेखकाने ,या लेखात शेतकऱ्यांच्या व्यथा तथा समस्या मांडलेल्या आहेत. आपला देश कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशाची अर्धी अधिक अर्थव्यवस्था ही कृषिवर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीला जिवंत राहण्यासाठी जे अन्न लागते ते अन्न शेतकरीच पिकवितो. इतर लोक जिवंत राहावे म्हणून तो अन्न पिकवितो परंतु तो जिवंत राहावा यासाठी कुणीही , काहीही करतांना दिसत नाही. त्याची सारखी हेळसांड होत आहे, प्रसंगी तो आत्मघात सुद्धा करतो. जर त्याने अन्न धान्य नाही पिकविले तर आपण जिवंत राहणारच नाही. हे सर्व टाळण्यासाठी सर्व स्तरांतून शेतकरी हिताचे प्रयत्न व्हावेत ,असे लेखकाला सूचवायचे आहे. संवाद हरवला आहे" या लेखामध्ये लेखक श्री. दिलीप देशपांडे यांनी , फारच भयावह अशी समस्या मांडलेली आहे. फार मोठी चिंता व्यक्त केली आहे. हे युग म्हणजे विज्ञान युग आहे. विज्ञान हे मानवाला एक वरदानच ठरलेले आहे. म्हणतात ना! "अति तेथे माती " म्हणजे कोणत्याही गोष्टीला मर्यादा असतात. मर्यादा ओलांडली तर त्याचे विपरीत परिणाम दिसून येतात. साधी गोष्ट आहे, आपल्याला जिवंत राहण्यासाठी अन्न हे अमृता समान आहे. परंतु त्याच अन्नाचे सेवन जर मर्यादे पेक्षा जास्त झाले तर त्याचे विष व्हायला वेळ लागत नाही. तसेच विज्ञानाच्या बाबतीत सुद्धा तोच नियम लागू आहे. अति वापरामुळे ते तारक ऐवजी मारक होऊ शकते. विज्ञानाने आपणास कंप्युटर, लॅपटॉप,




मोबाईल फोन , या सारखे अनेक प्रकारची उपकरणे किंवा यंत्रे दिलेली आहेत. ही सर्व यंत्रे मानवाला वरदानच आहेत. परंतु मानवाने मो.फोन सारख्या यंत्राचा अतिरेकी वापर सुरू केला आहे. परिणामी दुरच्या व्यक्तीशी संपर्क होत आहे परंतु जवळच्या व्यक्तींमधला संवाद कमी झाला आहे. म्हणजेच माणसे एकमेकांपासून दूर जात आहेत. ही बाब समाजाच्या दृष्टीने फारच हानिकारक आहे. मो.फोनच्या अतिरिक्त वापरामुळे होणारे दुष्परिणाम तर आता सर्व परिचित झालेले आहेत. विद्यार्थ्यांवर ही त्याचे परिणाम झालेले आहेत. वाचन क्षमता कमी झाली, ते आत्मकेंद्रित होत आहेत. हे टाळण्यासाठीच लेखकाने लेख प्रपंच केला आहे.

या सारख्या अनेक समस्या मांडलेले लेख जसे की, ह्या शेताने लळा लावीला...( रानकवी ना. धों. महानोर. ) , आलो इथे रिकामा भरून जात आहे.( आरती प्रभूंना आठवतांना ) , लोककलांचा कैवारी- प्रतिभावंत कवी अशोकजी परांजपे. , जिल्हा बँकां डबघाईला का आल्या ....? , जिल्हा बँकांचे विलीनीकरणांचा अवघड प्रश्न. , केवळ ग्राहक नको , सुजाण ग्राहक व्हा ! , अभियानात लोकसहभाग महत्त्वाचा. , वाचनालये साहित्य संवादांची केंद्रे व्हावीत . , पुस्तकांच्या सहवासातील दिवस. , मराठीचा सन्मान व्हायला हवा. , "संवाद" हरवला आहे. , ज्येष्ठांना हवी सन्मानाची संध्याकाळ., तर सार्थक होईल महिला दिनाचे. , दिन दिवस आणि डेज ची औपचारिकता. , पत्रकारीतेचा बदलता प्रवाह. (दर्पण दिनानिमित्त..) , वृत्त माध्यमांचे मनोरंजनीकरण . (साहित्य संमेलनात परिसंवाद ) , प्लास्टिक वापरावर कडक निर्बंध हवे. , म्हणजेच काय ? थोडी.. थोडी... पिया करो ! असे एकूण २१ लेख या ग्रंथाचे वैभव आहे.

सदर ग्रंथ शॉपीजन यांनी प्रकाशित केलेला आहे. आणि ठळक व सर्वांनाच वाचन करता येईल अशा अक्षरांमध्ये तसेच मुद्रणदोष रहित बनविला आहे.. ग्रंथाचे मुखपृष्ठ समर्पक तथा आकर्षक असे बनलेले आहे. या ग्रंथाला, योग्य न्याय मिळवून देणारी व ग्रंथाची ओळख करून देणारी प्रस्तावना लाभलेली आहे, ज्येष्ठ लेखक, कवी, समीक्षक श्री. प्रसाद दत्त पाठक , डोंबिवली यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली आहे.. लेखक श्री. दिलीप देशपांडे यांनी, विविध प्रकारच्या सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकणारे लेख यात आहेत. हा ग्रंथ. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी वाचावा व त्यातून काहीतरी बोध घेऊन आपल्या कृतित ईष्ट बदल करावा, याच अपेक्षेने ह्या ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. त्यांची ही अपेक्षा पूर्ण होवो हीच आशा व्यक्त करतो. आणि त्यांच्या पुढील लेखन प्रवासाला हार्दिक शुभेच्छा देतो.

# उन्हाळ्याची सुटी - एक संजीवनी



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागला की बायकोचा फिरायला चला हा आग्रह असतो पण बऱ्याच नवरोबांची ठरलेली नकारघंटा वाजत असते. घरातल्या लोकांसाठी राबता राबता व्यस्ततेमुळे उंबरठ्याच्याही बाहेर जायला न मिळाल्याने बायकांना घरातल्या घरात गुदमरल्या सारखं होतंच म्हणूनही बायका बाहेर फिरायला घेऊन चला असा आग्रह करतात, ते मनात असलं तरी पण व्यवसाय, नोकरीचा व्याप सांभाळून बरेचदा अनेक पुरुषांना ते जमत नाही अर्थातच याची खंतही त्यांच्या मनात असतेच.**

कधी कधी तर लग्न झाल्यापासूनचा पत्नीचा कुठेतरी बाहेर जायचा आग्रह असतो पण बरेचदा व्यवसाय, नोकरी व इतर गोष्टीचं रहाटगाडगं सांभाळून फिरायला निवांत वेळ काढेपर्यंत संसारवेलीवर फुलंही उमलतात. तरीही गावाबाहेर निघणे जमत नाही. उन्हाळ्याच्या किंवा दिवाळीच्या सुट्या अशा भटकंती किंवा टूरसाठी हक्काच्या वाटत असल्या तरी काहीतरी अडचण येऊन फिरायला जायचं दर वेळी लांबणीवर पडते. आपली अल्प ईच्छाही तशीच अपूर्ण राहत असली तरी ती तगमग मनातल्या मनात ठेवून बायका निमूटपणे सगळं नेहमीसारखं नियमित करत राहतात. संसारवेलीवर फुले उमलल्यावर का होईना सहपरिवार बाहेर फिरायला जाणेही त्या संसाराच्या नवोन्मेशाला संजीवनी ठरते. आपल्या जोडीदाराचा, मुलांचा आनंद महत्वाचा वाटायला लागतो, त्या क्षणी खऱ्या अर्थाने जीवनात प्रेमाचे रंग भरायला सुरुवात होते. चला तर मग, यंदाच्या उन्हाळ्यात वेळेच्या व्यवस्थापनाचे गणित नीट बसवा आणि पहा आनंदाचा गाव तुमची वाट पाहत आहे की नाही ते? फिरायला जायला, आपल्या कुटूंबाला आनंद द्यायला मुबलक पैसा नव्हे तर पुरेसा उत्साह लागतो. मरगड झटकून टाका अन शांत, निवांत आनंद देणारे क्षण सोबत घालवा. थंड हवेचे ठिकाण, चौपाटी, अगदी तिर्थक्षेत्र सुद्धा हे जादुई काम सहजपणे घडवून आणते. चिल्यापिल्यांसह केलेली ही सैर येणाऱ्या बऱ्याच महिन्यांसाठीच नव्हे तर वर्षांसाठी चैतन्यदायी ठरेल हे मात्र नक्की. आपल्या चिमूकल्यांचा हात हातात घट्ट धरून पाऊलांशी पाऊलं जोडत, बायकोसोबत सोबत लांबच लांब चालत जा मग बघा सहचरिणीला स्वर्ग दोन बोटं उरल्याची जाणीव होईल. या सहलीत आपल्या स्वभावातील रुक्षपन आणि वयोमानानुसार आलेली प्रगल्भता जरा वेळ बाजूला ठेऊन काही गोष्टी करा मग आणखीनच दुधात साखरच. आपल्या कुटुंबासह पडणारी आपली पावलं मग घुटमळू द्या. बायकोने काहीतरी खाऊ या का? म्हणायच्या अगोदरच आजूबाजूला असलेल्या चुरमुरे, शेंगांच्या, पाणीपुरी किंवा भेळच्या स्टॉलवरसुद्धा आस्वाद घ्या. आपली आवड बाजूला सारून आपल्या अर्धांगिनीच्या मनातुन असलेली ईच्छा हेरून ते उत्फुर्तपणे घ्या.नाहीच काही सुचलं तर थोडे चणे-फुटाणे, खारे शेंगदाणे घ्या, अगदी दोघांसाठी. ते चघळत चघळत पुढच्या वाटेवर अगदी दूरवर मंदपणे चालत जा. कुठे मऊ वाळूत तर कुठे अगदी पांढऱ्या मातीच्या फफूट्यावर चालता चालता पावलं मागे सोडत जातील पाऊलखुणा! त्यातल्या काहीशा वाऱ्याच्या झुळकेने विरूनही जातील पुन्हा



त्याच मातीत अगदी बायकोच्या आणि चिल्यापिल्यांच्या रुसण्या फुगण्यासारख्या! बऱ्याच वेळा तुम्ही खारे शेंगदाणे खाल्ले असतीलही पण त्या वेळच्या त्या पुरचुंडीतील शेंगदाणे वेचून खाण्यात खूप मजा वाटते की नाही ते पहा. नंतरही तुमची कातरवेळ तशीच जुळत राहावी असं वाटतंच राहील आणि अगदी त्या पुडीतल्या शेंगदाण्यासारखे आयुष्याच्या आठवणीतले वेचक क्षण चघळत रहावेसे वाटतील. ती चव मेंदूत तरळतच राहील कायमस्वरूपी. तुम्ही उन्हाळ्याच्या सुट्ट्यांच्या निमित्ताने केलेली ही सहल संजीवनीच देऊन जाईल आपल्या कुटुंबाला आणि संसारालासुद्धा. समुद्रकिनारी जाऊन मुलांबरोबर फिरला असाल किल्ले तयार केले असतील तर खेळताना मुलांच्या चेहऱ्यावरची ती आनंदाची चकाकी तशीच कायम ठेवावी हे वाटत राहील. पतीपत्नी उभयतांनी एकांतात घालवलेल्या वेळेपेक्षाही हे तुम्ही तुमच्या बछडयांबरोबर एकत्र घालवलेले कौटुंबिक क्षण अगदी कायम असेच रहावे असं मनात आले नाही तर नवलच. निघाताय ना मग?

# खरा सेवेकरी सेवेचं मार्केटिंग ब्रँडिंग होऊ देत नाही

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

सेवा ही लोकांना दिसावी लोकांनी आपल्याला समाजसेवक समजाव अथवा त्या माध्यमातून आपल्याला काही मिळाव या उद्देशाने नसते. सेवेचा भाव हा स्वच्छ, प्रांजळ, अगदी निस्वार्थ हेतुने कोणत्याही प्रकारची लालसा न बाळगता उदात्त हेतूने प्रेरित होऊन केलेलं लोक हितार्थ कार्य म्हणजे सेवा असते. निसर्गाच्या सान्निध्यात रचनेत आपलं जिथं शक्य तिथे योगदान देवुन सेवेकरी होता येतं सेवा ही अनेक प्रकारची असली तरी सेवेचा मुख्य उद्देश हा लोक कल्याणच असतो. स्व कल्याण स्वहित हा भाव दुर दुर पर्यंत नसतो. सेवा हि मनात लाभ ठेवून नाही तर उदात्त हेतूने समर्पित भावनेने प्रेरित होऊन करण्याचं माध्यम आहे. या मध्ये मात्रा महत्वाची नाही तर भाव महत्वाचा असल्याने जितकी शक्य होईल तितकीच सेवा आपल्या उपलब्ध वेळेनुसार लोककल्याण व्हावं यासाठी समर्पित असण म्हणजे खरा सेवाभाव पण याच सेवाभावाच सध्या बाजारीकरण होत असुन मुळ सेवेचा उदेश बाजुला राहुन सेवेचा गवगवा बोलबाला सगळ्याच क्षेत्रात प्रचंड मोठ्या प्रमाणात बोलबाला आहे. सेवा ही साधारणतः दोन प्रकारची असते एक निस्वार्थ ज्या मध्ये लालसा, लाभ,मोह,उदेश हेतु नसतो. हिच खरी सेवा असते. तर दुसरी सेवा हि मनात उदेश हेतु उदिष्ट ठेवून केलेल कार्य असतं आपण त्याला सेवा समजतं असलो तरीही ती खरी सेवा नसते. आपल इप्सित साध्य करण्याच ते माध्यम असु शकत फार फार आपण त्याला सेवा हे गोंडस नाव देऊ शकतो. लोकशाही असल्याने त्याला कोणाचा आक्षेप असण्याचे काही कारण नाही. पण खरा सेवेकरी असं पाऊल टाकणार नाही. वरकरणी सेवावृत्तीचे पांघरूण घेऊन सेवेचं मार्केटिंग ब्रँडींग करणार नाही. त्या बदल्यात काही मिळत का हा वारंवार प्रयत्न सुद्धा करणार नाही. कारण तो निस्वार्थ सेवेकरी असतो तो आपल्या सेवेच मार्केटिंग होऊ देत नाही. सेवा बाजुला ठेवून सेवेच्या नावाखाली स्वतःला सिद्ध करण हा दुसरा प्रकार या प्रकारच्या सेवेत लाभ हेतू उद्दीष्ट असल्याने हे समाज कार्य नाही तर त्या नावाखाली त्याच मार्केटिंग आहे. कारण सेवेचा भाव हा निस्वार्थ असतो. सेवा असते,स्वतःच आयुष्य जनहितार्थ वाहुन घेणं हे सहज सोपं नसतं आणि हेच कठिण काम करताना त्याच मार्केटिंग होणार नाही याची दक्षता घेणं हि तितकच अवघड असतं. पण सध्या सेवेच्या नावाखाली मार्केटिंगाचा महापुर आलाय सेवा नावालाच उरली आहे. हे दुर्दैवी असुन समाजहितकार नाही. मुळात मेवा मिळण्यासाठी नसते. सेवा सेवाभावी वृत्ती जोपासण अथवा जन सामान्यांची निस्वार्थ सेवा करण हा उत्तम मार्ग आहे. पण सेवा करताना हि सेवा बोलबाला करण्यासाठी अथवा सेवेचं मार्केटिंग करण्यासाठी मुळींच नाही आणि हिच बाब सध्याचे सेवेकरी समजुन घेण्यासाठी तयार नाहीत म्हणून सेवा होण्या ऐवजी सेवेचा ब्रँडींग मार्केटिंग जोरदार होतंय पण मुख्य सेवा अथवा सेवा भाव हवाहवाई राहतो. निस्वार्थ हाच सेवेचा पाया असतो. पण हाच पाया गायब असेल तर मग सेवा हि सेवा न रहाता मार्केटिंगचा ब्रँड ठरते. निरपेक्ष भावनेने केलेलं कोणतही कार्य हे प्रचार प्रसिद्धी नावलौकिक होण्यासाठी अथवा लाभ उठविण्यासाठी नसतच मुळी समाज सेवा हा आत्मानंद व आत्मिक समाधान मिळण्यासाठी असतं. पण याचा सोईस्कर विसर पडल्याने आजकाल सेवेच्या नावाखाली मार्केटिंगाचा महापुर आलाय. जबाबदारी कर्तव्य अथवा छंद म्हणून समाजकार्य मध्ये योगदान देण्यात काही गैर नाही पण आपण दिलेल योगदान हे कोणत्याही प्रकारचा लाभ उठविण्यासाठी नसेल तर आपण त्याच ब्रँडींग मार्केटिंग करत नाही. आणि तसं करणं हे मानवतेच लक्षण पण नाही. खरी सेवा कोणत्याही प्रकारचा स्वार्थ मोह मनात न बाळगता लाभाचा हेतु लालसा न बाळगता समर्पित भावनेने प्रेरित होऊन शक्य तितक्या प्रमाणात योगदान देण हिच खरी सेवा ठरते. आज वणवा आहे ती खऱ्या सेवेची म्हणून खरी सेवा हिच काळाची गरज आहे.

# आदर्शगृहाच्या प्रतिकृतीस सुवर्णपदक!




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दादासाहेबांच्या जन्मशताब्दीपासून भारत सरकारने दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यास सुरुवात केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार आहे. याचे स्वरूप दहा लाख रुपये आणि सुवर्णकमळ असे आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलावंत-तंत्रज्ञाला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारतीय टपाल खात्यानेही दादासाहेबांच्या सन्मानार्थ त्यांचे छायाचित्र असलेल्या टपाल तिकिटाचे अनावरण केले. मुंबई येथील चित्रनगरी- फिल्मसिटी आता दादासाहेब फाळके चित्रनगरी या नावाने ओळखली जाते. दिग्दर्शक परेश मोकाशी यांनी हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटातून दादासाहेबांचे कार्यकर्तृत्व प्रेक्षकांसमोर आणले.**

दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक आहेत. ते भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथाकार आणि चित्रपट महर्षी म्हणूनही ओळखले जातात. त्यांचे पूर्णनाव धुंडिराज गोविंद फाळके असे होते, पण ते दादासाहेब या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० एप्रिल १८७० रोजी महाराष्ट्राच्या नासिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील गोविंदशास्त्री उर्फ दाजीशास्त्री व मातोश्री द्वारकाबाई होत. दाजीशास्त्री स्वतः संस्कृत भाषेचे विद्वान आणि त्र्यंबकेश्वर मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे दादासाहेबांचे बालपण धार्मिक वातावरणात व्यतीत झाले. दादासाहेब १२ वर्षांचे असताना दाजीशास्त्रींनी मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेज येथे संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. त्यामुळे फाळके कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले. दादासाहेबांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या कला शिकण्याची आवड होती. त्यामुळे मुंबईच्या मराठा हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर सन १८८५मध्ये त्यांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्स येथून एक वर्षाचा चित्रकलेचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. मग बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कलाभवनातून त्यांनी तैल रंगचित्रण, जल रंगचित्रण, वास्तुकला आणि नमुना प्रतिरूपण- मॉडेलिंग यामध्ये प्रावीण्य मिळवले. याचबरोबर त्यांनी छायाचित्रण, प्रकाश शिलामुद्रण- फोटोलिथोग्राफी या व्यावसायिक कलांचेही शिक्षण घेतले. त्यात विविध प्रयोगही केले. अहमदाबाद येथील सन १८९२मधील औद्योगिक प्रदर्शनात त्यांच्या आदर्शगृहाच्या प्रतिकृतीला सुवर्णपदक मिळाले. त्यांनी गुजरातमधील गोध्रा येथे व्यावसायिक छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला. पण तेथे त्यांचा जम बसला नाही. ते सन१९०० साली बडोद्याला परतले. मात्र त्यांच्यातला हरहुन्नरी माणूस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी एका जर्मन जादूगाराकडून जादूची कला शिकून प्रोफेसर केल्फा या नावाने जादूचे प्रयोग दाखवायला सुरुवात केली. हे प्रयोग त्यांनी एका लघुपटात चित्रितही केले.

दादासाहेबांचा पहिला विवाह सन १८८६मध्ये झाला. पण त्यांच्या पत्नीचे व मुलाचे गुजरातमध्ये प्लेगच्या साथीने सन १९०० साली देहावसान झाले. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांचा विवाह सरस्वतीबाई- पूर्वाश्रमीच्या गिरिजा करंदीकर यांच्याशी झाला. सात मुले व दोन मुली असा त्यांचा परिवार बहरला. सरस्वतीबाईंनी चित्रपट निर्मितीच्या सर्वच क्षेत्रांत दादासाहेबांना मोलाची मदत करत आयुष्यभर साथ दिली. दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीच्या तंत्राचा अथक परिश्रम करून अभ्यास केला. परिणामस्वरूप १९११-१२च्या काळात अंधत्वही आले होते. पण चिकाटीने त्यांनी त्यावर मात केली. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत चित्रपट निर्मिती करताना सामाजिक अडचणींसोबतच आर्थिक अडचणींनाही त्यांना सामोरे जावे लागले. चित्रपटात काम करण्यासाठी स्त्री कलावंतच काय, पुरुष कलावंतही तयार होत



नसत. अशावेळी गरज पडल्यास ते स्वतः किंवा कुटुंबियांपैकी कोणीतरी ते उभे करीत. सुरुवातीच्या त्यांच्या चित्रपटातील स्त्री पात्रांच्या भूमिकाही त्यांनी पुरुषांकडूनच करून घेतल्या. त्यांना अनेक कला अवगत असल्यामुळे त्याचा उपयोग त्यांनी चित्रपटनिर्मिती करताना केला. त्यामुळे ते चित्रपट तांत्रिकदृष्ट्या उत्तम असत. त्याकाळी परदेशातही चित्रपट निर्मिती करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. पण त्या मोहाला बळी न पडता त्यांनी भारतातच चित्रपट निर्मिती केली. आपल्या देदीप्यमान कारकीर्दीत त्यांनी एकूण ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची निर्मिती केली. दादासाहेबांनी सन १९०३ साली भारतीय पुरातत्त्व खात्यात प्रारूपकार आणि छायाचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. या फिरतीच्या नोकरीमुळे त्यांना भारतातील अनेक वास्तुशिल्पे पाहता आली. परंतु स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या वंगभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. चळवळीला साथ देत त्यांनी ही सरकारी नोकरी सोडून दिली. त्यांनी लोणावळ्याला फाळके एनग्रेव्हिंग अँड प्रिंटिंग प्रेस- वर्क्स ही संस्था सुरू केली. पुढे ती दादरला हलविली. तिचे रूपांतर लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्समध्ये झाले. सन १९०९मध्ये ते जर्मनीहून तीनरंगी मुद्रणप्रक्रियेचे अद्ययावत तांत्रिक शिक्षण घेऊन भारतात परतले व ही संस्था त्यांनी भरभराटीस आणली. मात्र दहा वर्षांत व्यवसायातील भागीदारांबरोबर बेबनाव झाल्यामुळे ते वेगळे झाले. यामुळे दादासाहेब उद्विग्न होते. याच दरम्यान त्यांनी मुंबईमध्ये लाईफ ऑफ जिझस ख्राईस्ट- ख्रिस्ताचे जीवन हा मूक चित्रपट पाहिला आणि त्यांच्या आयुष्यातले ध्यासपर्व सुरू झाले. स्वदेशी चित्रपट बनवायचा या विचाराने त्यांना झपाटून टाकले. भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथे आवश्यक यंत्रसामग्री आणि कच्चा माल मागविण्यासाठी नोंदणीही केली. ते भारतात परतले. तेथील वास्तव्यात प्रसिद्ध चित्रपट निर्माते सेसिल हेपवर्थ यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सर्व सामग्री मे महिन्यामध्ये हाताशी आल्यावर प्रयोगादाखल जून-जुलैमध्ये रोपट्याची वाढ हा एका मिनिटाचा लघुपट तयार करून काही निवडक व्यक्तींना दाखवला. त्याचा योग्य परिणाम वाटल्याने पत्नीचे दागदागिने गहाण ठेवून भांडवल उभे केले. लवकरच मुंबई- दादर येथे फाळके चित्रपट निर्मितिगृहाची स्थापना केली. सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट सन १९१३ साली प्रदर्शित झाला. राजा हरिश्चंद्रच्या यशाने खऱ्या अर्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा एक व्यवसाय म्हणून पाया रचला गेला. या चित्रपटाकरिता लेखक, छायालेखक, रंग वेशभूषाकार, कलादिग्दर्शक, संकलनकार, रसायनकार आदी सर्व भूमिका दादासाहेबांनी पार पाडल्या. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर व सत्यवान सावित्री या चित्रपटांची निर्मिती केली. यांनाही चांगले व्यावसायिक यश लाभले. त्यांनी सन १९१४मध्ये पुन्हा इंग्लंडला प्रयाण केले. या वास्तव्यात त्यांनी निर्मिती केलेले चित्रपटही तेथील निर्मात्यांना दाखवले. या चित्रपटांतील तांत्रिक अंगांचे परदेशातही खूप कौतुक झाले. भारतीय चित्रपट व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईतील महोत्सवात कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून फाळके यांना पाच हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. आर्थिक विवंचनेतच वयाच्या ७४व्या वर्षी दि.१६ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचे नासिक येथे निधन झाले.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# भिमाचा किल्ला कमकुवत केला

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अर्थातच आंबेडकरवादी समाजासाठी आनंदाचा दिवस. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार मानणारा समाज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहाने वाजत गाजत साजरी करत असतो. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा अर्थ अजूनही बऱ्याच लोकांना कळालं नाही हे खरचं आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समस्त मानव जातीच्या कल्याणाचे काम करून प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी आयुष्यभर झटत राहिले. आपल्या ज्ञानाचा, आपल्या पैशाचा, वापर फक्त आणि फक्त आहे महिला, शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी व सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी फायदा करून दिला.**

परंतु याची जाणीव बऱ्याच लोकांना नाही. अर्थात भिम जयंती साजरी करतात त्या सर्वांनाच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कळाले असे मुळीच नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे काही सामाजिक क्रांती करून या ठिकाणी समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण केली. ती व्यवस्था एवढी मजबूत आणि भक्कम आहे की लहानातल्या लहान समुदायाचा सुद्धा मोठा विकास होऊ शकतो. परंतु बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या मेहनतीचा एक एक रुपया समाजासाठी खर्च करून जो किल्ला उभा केला होता तोच किल्ला आज कमकुवत झालेला दिसत आहे. किल्ला कमकुवत कुणी केला आणि कसा केला खूप मोठा चिंतन व मंथनाचा विषय आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समजणे एवढे सहज व सोपे नाही. आणि म्हणून जयंती साजरी करणारे ढोल ताशे डीजे तालावर नाचणारे खरंच आंबेडकरवादी आहेत असे म्हणणे सुद्धा योग्य नाही. कारण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरा करण्यामागचा नेमका उद्देश काय आहे ? हे समजून घेतल्याशिवाय आपण कोणालाही आंबेडकरवादी समजू शकत नाही. जर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तत्कालीन महार आणि आजचे बौद्ध आहेत म्हणूनच जयंती साजरी करत असतील तर ही खूप मोठी शोकांतिका आहे. कारण बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ जातीमध्ये बंद करून त्यांच्या नावाने नाचणे हा आंबेडकरवाद नव्हे. जयंती साजरी होताना वैचारिक आणि सर्वसमावेशक जयंती साजरी करणे आवश्यक आहे. जयंतीच्या वेळी अनेक ठिकाणी अनेकांचे कार्यक्रम होतात आणि बऱ्याच भाषणांमधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची मांडणी ही मर्यादित केली जाते. भाषणाच्या सुरुवातीलाच दलितांचे अस्पृश्यांचे उद्धारक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. बाबासाहेबांनी म्हणजे देशाला संविधान दिले त्या संविधानाबद्दल चुकीचा समज समाजामध्ये पसरवला जातो. संविधान आमच्या च बापाने आणि आमच्याच साठी लिहिले, असा चुकिचा संदेश देऊन समाजाची सुद्धां दिशाभूल केली जाते. जर जयंती कार्यक्रमांमध्येच असे होत असेल तर किल्ल्याचा पाया कमकुवत करण्यामध्ये जयंती साजरा करणाऱ्यांचा मोठा वाटा आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा किल्ला अर्थात कार्य काहीतरी काय आणि ती कशी कमकुवत झाले आणि त्यावरती काय उपाय आहेत या गोष्टीचे चिंतन आणि मंथन जर जयंती कार्यक्रमातून दूर होत नसेल, तर जयंती कार्यक्रम साजरी करून काहीही फायदा नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला शिक्षणाचा हक्क बहाल केला भारतीय संविधान लागू होण्याअगोदर भारतीय समाजाला शिक्षणाचा कोणताही अधिकार नव्हता. आणि म्हणूनच समाजामध्ये अज्ञान अंधविश्वास पाखंड भोंदूगिरी याला जास्त महत्त्व होते. परंतु बाबासाहेबांनी शिक्षणाला महत्त्व दिले, शिक्षणासोबतच बाबासाहेबांनी आरक्षण, नोकरी, सामाजिक न्याय, हक्क- अधिकार, आणि सामाजिक संरक्षण बहाल करून ही समाज व्यवस्था निर्माण केली. परंतु बाबासाहेबांनी निर्माण केलेली हिच समाज व्यवस्थेला वेगवेगळ्या प्रकारचे तुरुंग लावून उध्वस्त केले जात आहे. आणि उद्ध्वस्त होत असलेल्या समाज व्यवस्थेची जाणीव न ठेवता, बहुतांश लोक नाचण्यात वेळ वाया घालत आहेत. शिक्षण मानवासाठी अत्यावश्यक आहे परंतु हेच शिक्षण पद्धतशीरपणे बंद करून सरकारने शिक्षणाला सुरूंग लावला आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून शिक्षणाचे बाजारीकरण केले. संविधानाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळायला पाहिजेत हे सांगितलेले असताना सुद्धा, याच देशांमध्ये पहिल्या वर्गाच्या अगोदर पासून हजारो लाखो रुपये शिक्षणावर खर्च करावे लागतात. बऱ्याच लोकांना आज शिक्षण घेणे हे परवडणारे नाही. शासकीय शाळा बंद करून खाजगीकरणांमध्ये शिक्षणाचा व्यापार सुरू केल्यामुळे शिक्षण आज हळूहळू लोप पावत चाललेले आहे. शिक्षणामुळे तर्क विज्ञानवाद मानवतावाद व सामाजिक इमानदारी जागृत होऊन समाजाचे कल्याण होते. आणि म्हणूनच यांनी पहिला प्रहार केला तो शिक्षणाचे खाजगीकरण करून बाजारीकरण केले. म्हणजेच गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेला शिक्षण घेणे परवडणारे नाही. दुसरी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आरक्षण. आरक्षण हा गरीबी हटाव चा कार्यक्रम होत नाही. हजारो वर्षांपासून ज्या समाजाला हक्क अधिकार आणि संधी पासून वंचित ठेवले अशा सर्व समाजाला बाबासाहेबांनी आरक्षण निर्माण करून दिले. आरक्षण फक्त महार किंवा बौद्धांना आहे असे म्हणणाऱ्यांनी अगोदर आपली अक्कल व गुणवत्तेची तपासणी करणे आवश्यक आहे. आरक्षणाच्या माध्यमातून हजारो वर्षापासून दूर ठेवलेल्या समाजाला सत्ता संपत्तीमध्ये प्रतिनिधीत्व मिळायला सुरुवात झाली. आणि हजारो वर्षापासून ज्यांच्या हातात सत्ता आणि संपत्ती एकवटलेली होती त्यांच्यासोबत समाज राहायला लागला. सत्ताधाऱ्यांना पचत नसल्याने ज्या ज्या क्षेत्रांमध्ये आरक्षण लागू केले होते तेथे सर्व क्षेत्र खाजगीकरणाच्या नावाखाली खाजगी लोकांच्या हाती दिले. खाजगीकरणांमध्ये आरक्षण नाही. थोडक्यात काय तर शिक्षण पूर्ण झाल्याच्या नंतर सर्वांना रोजगार संधी उपलब्ध करून देऊन त्यांना कायम स्वरूपाची नोकरी देणे सरकारचे काम असताना, आता मात्र लाखो रुपये शिक्षणावरती खर्च करूनही सरकारी नोकरी मिळणार नाही. याचाच अर्थ शिक्षणावरती खर्च करण्यासाठी कोणीही तयार होणार नाही. कारण शिक्षण घेतल्यानंतरही खाजगी कंपन्यांमध्येच काम करावे लागणार हे निश्चित. सरकारी क्षेत्राचे खाजगीकरण केल्याने आरक्षणाचा विषयच मिटवून टाकला. परंतु आरक्षणावरचा वाद मात्र अजूनही पेटत ठेवत आहेत. कारण याच भरोशावर त्यांना मतपेटी तयार करता येते. वास्तविक आरक्षण शिल्लक राहिलेले नाही तरीसुद्धा आरक्षणाच्या नावाखाली सामाजिक वातावरण दूषित करून समाजामध्ये वैचारिक फुट काढण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. आरक्षण आणि नोकरी बंद करून सरकारने सुशिक्षित तरुणांचे भविष्य अंधकार मय केलेले आहे. नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचं काय उद्देश असेल तर तो सर्वात महत्त्वाचा हा उद्देश खाजगीकरणांमध्ये कायमस्वरूपी नोकरीची हमी पगारवाढ व इतर कल्याणकारी योजनेचा फायदा नसतो. उलट काम करणाऱ्यांना पैसा कमी आणि कंपनींना पैसा जास्त देऊन समाजाला आर्थिक दुर्बल बनवणे, उद्योगपत्यांना आर्थिक बळकट करणे, हा या मागचा उद्देश आहे. चौथा आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामाजिक न्याय. सामाजिक न्यायाचा अर्थ कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतात व व्यक्तीची जात धर्म लिंग जन्मस्थान किंवा इतर कोणताही भेद न करता त्याच्यावर झालेल्या अन्यायाचा विचार करून त्याला न्याय देणे. परंतु आज न्याय बघितला तर त्याची जात, धर्म, राजकीय नातेसंबंध, आर्थिक नाते संबंध बघून न्याय दिला जातो. खालच्या जातीतील किंवा अल्पसंख्यांक किंवा राजकीय संबंध नसलेल्या लोकांना न्याय मिळवणे तारेवरची कसरत झालेली आहे. त्यांच्यासोबत राजकीय संबंध पैसा, जात अशा गोष्टी आहेत त्यांना न्याय सहज आणि सोप्या पद्धतीने मिळतो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना एका लाईन मध्ये उभे केलेले असताना अशा पद्धतीने न्याय मिळत असेल तर सामाजिक न्यायाला सुरुंग लावनेच होईल. आपण अनेक प्रकरणे बघितले ज्या ठिकाणी अन्याय अत्याचार होऊन सुद्धा त्या घटकाला न्याय मिळाला नाही. याचे अलीकडचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे कोरेगाव भीमा, येथे एवढी मोठी जीव घेणी दहशत पसरवणारे घटना घडली. तरीही घटना घडवणाऱ्यांना शिक्षा तर झाली नाही. उलट शासन प्रशासनातील लोक घटना घडवून आणणाऱ्याला नतमस्तक होतात. तर सामाजिक न्याय आहे तरी कुठ ? आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे.जर समजून नाही घेतले तर येणारा काळ खूप घातक असणार आहे. नंतरचा मुद्दा येतो तो म्हणजे हक्क अधिकाराचा. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक प्रकारचे हक्क अधिकार भारतीय समाजाला बहाल केलीत. परंतु सविधाना ने विविध अधिकार दिले आहेत तेच आज मात्र संकटात आहेत. लोकांना त्याचा वापर करता येत नाही. संविधानानुसार बोलण्याचा मत व्यक्त करण्याचा, सरकारच्या विरुद्ध बोलण्याचा, ताकद निर्माण करण्याचा दबाव गट निर्माण करण्याचा अधिकार संविधानाने दिलेला असताना आजची



परिस्थिती बघितली तर सरकारच्या विरोधात बोलता येत नाही, याचाच अर्थ संविधानाने दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्य याचा अधिकार दाबण्याचा प्रयत्न केला जातो. वरिल फक्त उदाहरण आहे बाकी इतर हक्क अधिकारांमध्ये हीच गोष्ट लागू होते. हक्क अधिकार न मिळवून देता ते कसे दाबता येतील यावरती जोर दिलेला आहे. भारतीय नागरिकांना आरोग्याची सुविधा मिळणे, सरकारकडून मोफत मिळणे हा भारतीय नागरिकांचा हक्क आहे. परंतु आज सरकारी दवाखान्यांची परिस्थिती काय आहे याची कल्पना सर्व जनतेला आहे. आणि जर खाजगी दवाखान्यामध्ये जायचं असेल तर त्या ठिकाणी किती पैसा लागतो याचीही सुद्धा जाणीव सर्वसामान्य लोकांना आहे. आरोग्याची सुविधा सरकारने देण्याचा अधिकार व नागरिकांचा हक्क आहे, तर हा या हक्काची अंमलबजावणी होत नाही. असे अनेक हक्क आहेत जसे स्वच्छ पाणी प्यायला देणे, स्वच्छता असणे ,हे हक्क आहेत परंतु हे आपल्याला मिळत नाहीत. आणि म्हणून बाबासाहेबांनी निर्माण केलेलं सर्व काही अलबेल आहे असं म्हणणे म्हणजे मूर्खपणाचे होय. नंतरचे सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा तो नंबर सामाजिक समता. सामाजिक समता हा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे . सामाजिक समता यामध्ये फारसे काही अंतर नसले तरीही दोन्ही खूप महत्त्वाचे आहेत. कोणताही व्यक्ती लहान व कोणताही व्यक्ती मोठा नाही. कायद्याने प्रत्येक व्यक्तीची किंमत ही सारखीच ठरवून दिलेली आहे. असे असताना सुद्धा जर आपण बघितले तर सामाजिक समता संविधानामध्ये असले तरीही समाजामध्ये सामाजिक समता दिसून येत नाही. समाजामध्ये जात, धर्म, आर्थिक बळकटी, राजकीय हितसंबंध यामध्ये सुद्धा अनेक लोकांची वजन ठरवले जाते. आणि म्हणून सामाजिक समतेला सुरू केला जातो. सामाजिक समता म्हणजे काय तर एखाद्याकडे एखादी गोष्ट नसेल तर ती गोष्ट त्याला देणे म्हणजे सामाजिक समता. होय परंतु आज सामाजिक समतेचा अर्थ पूर्णपणे बदलून टाकलेला आहे त्यांना दिला मग आम्हाला का नाही अशा द्वेष भावनेतून सामाजिक समते कडे बघून सामाजिक समतेच्या नावाखालीच सामाजिक विषमता जगवली जात आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन यावरती चर्चा करणे आवश्यक आहे. थोडक्यात काय तर एखाद्याला शिक्षण घ्यायचे असेल आणि त्याच्याकडे शेती नसेल कमाईचे इतर कोणते साधने नसतील आणि आर्थिक परिस्थिती कमकुवत असेल तर अशांना शासनाने आर्थिक मदत करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे म्हणजे सामाजिक समता होय. परंतु असे करताना ज्याच्याकडे शेती आहे इतर कमाईचे स्त्रोत आहेत तो स्वखर्चाने शिक्षण घेऊ शकतो हे असताना देखील याला दिले म्हणून त्याला देणे ही सामाजिक समतेचे नव्हे तर विषमतेचे लक्षण आहे. कारण याच्याकडे नसताना याला दिले तर याची थोडीशी परिस्थिती सुधारेल परंतु ज्याच्याकडे आहे त्याला पुन्हा दिल्यानंतर त्याची परिस्थिती अजून सुधारेल. दोघांचीही परिस्थिती आपल्याला सुधारलेली दिसेल. परंतु सामाजिक समतेचा विचार केला तर मोठा हा मोठा झालेला असेल आणि लहान हा लहानच असेल. ही गोष्ट सामाजिक संस्थेमध्ये समाविष्ट आहे याची जाणीव अनेक लोकांना नाही. म्हणून हे सामाजिक समता देखील नष्ट करण्याचा प्रयत्न येथे संविधान विरोधी व स्वार्थी राजकारण्यांनी केलेला आहे. थोडक्यात काय तर बाबासाहेबांचा जो किल्ला मजबूत होता त्या किल्ल्याला मजबूत असण्यामागे संरक्षण होते ते म्हणजे संविधानाचे. या लोकांनी संविधानाची संरक्षण असलेल्या किल्ल्याला सुरुंग लावून निकामी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि असे संविधानाने निर्माण केलेला किल्या कमकुवत होत असताना, आम्ही फक्त बोलायचे म्हणून आमचे संविधान मजबूत आहे. भिमाचा किल्ला अजूनही मजबूत आहे, त्यालाच काही होऊ शकत, नाही अशा अविर्भावात राहून जर जगत असून तर ती आमची अंधश्रद्धा आहे. संविधान नाव बदलले नाही तरीही संविधानात अनेक बदल करून लोक कल्याणकारी असलेले संविधान लोकांचे कल्याण करण्यापासून थांबवले आहे. याची जाणीव असणे आवश्यक आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेताना अनेक लोकांच्या शरीरात स्फूर्ती ऊर्जा अजून काही काही संचारते, संविधानाला कोणी हात लावू शकत नाही, संविधान कोणी बदलू शकत नाही, भीमाचा किल्ला मजबूत आहे. म्हणून आम्ही सुरक्षित आहोत. एक गोष्ट लक्षात ठेवावी तुम्हाला नाचण्याची परवानगी देतील, परंतु बोलण्याची परवानगी नाकारली जाईल, म्हणून या भ्रमात राहू नये हे संविधान आजही सुरक्षित आहे. भिमाचा किल्ला आजही मजबूत आहे. साधी एक गोष्ट जरी लक्षात घेतली तर आपल्या लक्षात येईल की खरंच संविधानाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होते का किंवा संविधान या ठिकाणी लागू आहे का ? भारताचे संविधान कलम क्रमांक एक नुसार भारताचे नाव इंडिया अर्थात भारत असे आहे. परंतु खुलेआम अनेक लोक भारताला भारत,इंडिया नाहीतर हिंदुस्तान हिंदुस्तान करत असतात. देशाला हिंदुस्तान बोलून देशाचा सन्मान, संविधानाचा सन्मान आहे का ? मग ज्या ठिकाणी कलम क्रमांक एक लागू नाही, त्या ठिकाणी संविधानाचे इतर कलमे लागू असतील असे म्हणणे किती मूर्खपणाचे असेल. याचा विचार करावा भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष शब्द आहे. धर्मनिरपेक्षेचा अर्थ देशामध्ये कोणताही धर्म कायद्यानुसार मोठा नसेल, किंवा लहान नसेल. कोणत्याही व्यक्तीची ओळख ही धर्मानुसार नसेल, असे असताना सुद्धा काही लोक देशाला हिंदू राष्ट्र आणि देशाचा धर्म हिंदू धर्म म्हणून बोलतात. त्यावेळेस धर्मनिरपेक्ष याला काय अर्थ असतो ? आणि दुसरीकडे धर्माचे राजकारण करायचे अशी कुटनिती देशामध्ये निर्माण झालेली आहे. आणि ही कुटनीती निर्माण होताना आणि फक्त आणि आम्हाला फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आल्यानंतरच भारतीय संविधान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कार्य हे जर दिसत असेल तर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा किल्ला कमकुवत करण्यामध्ये आमचा सुद्धा तेवढाच हात आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ विचार कार्य हे निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ती फक्त जयंती किंवा महापरिनिर्वानापूर्ती मर्यादित नाही. आणि जे लोक हे दोनच दिवस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची आठवण करून त्यांचे विचार सांगत असतील तर, ते विचार व कार्य याचं काम आहे. आम्हाला जर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा किल्ला मजबूत व सुरक्षित ठेवायचा असेल तर किमान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जातीचे आहेत म्हणून माणनाऱ्या, विचाराचे आहेत म्हणून माणणाऱ्या लोकांनी जर एकत्र आले एक शक्ती निर्माण केली, आणि संविधानाची बाजू मांडून धरली तर आपण एक सुरक्षा कवच निर्माण करू शकु. संविधानाने मानव जातीचे कल्याण व मानव जातीला संरक्षण बहाल केलेले आहे. परंतु येथे संविधानाचे सुरक्षित नाही अशी व्यवस्था इथल्या स्वार्थी लोभी व विषमतेवर विश्वास असलेल्या लोकांना निर्माण केलेली आहे. म्हणून आपल्याला खरंच असे वाटत असेल भारताचे संविधान व बाबासाहेबांनी श्रमातून मेहनतीतून आणि आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून जो काही समाजाचा किल्ला उभा केला तो किल्ला मजबूत आणि संरक्षित असायला पाहिजेत, तर सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे राजकीय नेत्यांच्या भूलथापांना न भुलता समाजाने समाजाची ताकद दाखवणे आवश्यक आहे. आणि याच ताकतीच्या भरोशावर याच एकीच्या भरोशावर आपण हक्क अधिकार व संविधान याचे संरक्षण करू शकेल. परंतु गरज आहे पुन्हा एकदा एकत्र येण्याची. ही वेळ हेवे दावे , पद प्रतिष्ठा स्वार्थ , लोभ या गोष्टी बाजूला सारून केवळ आणि केवळ बाबासाहेबांचा अनुयायी आणि संविधानाचा लाभार्थी या नात्याने बाबासाहेबांच्या विचार व कार्यांचे तसेच संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी माझी आहे, याची जाणीव ठेवून सर्वांनी एक झाले तरच देशाचे संविधान सुरक्षित होईल व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्याचे सार्थक होईल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले चार मुलं, पत्नी यांना गमावले तरीही समजावून त्यांनी दुर्लक्ष केले नाही. एवढे सहन करून सुद्धा त्यांनी समाजासाठी लढण्याचा निश्चय थोडाही कमी केला नाही. म्हणून सुखाने आनंदाने राहत, जगत आहोत. हक्क अधिकाऱ्यांच्या गोष्टी करत आहोत. परंतु सध्या परिस्थिती बघता येणाऱ्या पिढीलाही आपल्याच सारखे जीवन जगायचे असेल तर आपल्यालाही थोडंसं कुटुंब थोडासा पैसा, थोडासा वेळ, यांचा त्याग करून संविधानासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्यासाठी रस्त्यावर उतरण्यात, कधी दबाव गट निर्माण करण्याची आवश्यक आहे. बाबासाहेबांनी आम्हाला मोठमोठे पदावर बसण्याचे संधी निर्माण करून दिली. आता मोठ्या पदांवर बसलेल्या लोकांना संधी आहे येणाऱ्या पिढीसाठी आपण आपले हक्क व अधिकार संरक्षित करून, येणाऱ्या पिढीचे भविष्य उज्वल करण्यासाठी हातभार लावावा. कारण कोणतेही गत्यंतर नाही. म्हणून जयंती निमित्त का होईना सर्वांनी एकत्र येऊन समाजासाठी संविधानासाठी लढण्याची प्रतिज्ञा करावी. तरच खऱ्या अर्थाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्यागाचे, कार्याचे सार्थक होईल.

---

आधुनिक केसरी

# स्त्री जीवन



दिपा सदाशिव चिंचकर
संपर्क 9284900969

विचार केला तर खूप काही आणि नाही केला तर काहीच नाही. मुलगी जन्माला येते तेव्हा काही खुश तर काही खूप नाराज असतात. काहीच्या घरात तिला खूप सन्मानाची आपलेपणाची वागणूक दिली जाते तिच्या जन्माच स्वागत केल्या जात. तर काहीच्या घरात बापाच्या डोक्याला ताप आणि डोक्यावरच कर्ज मानल जात. जसजशी ती मोठी होत जाते तिच्यावर बंधने लादली जातात, बंधने ही फक्त समाजाशीच नसतात तर ती संस्कार, परंपरा आणि निसर्गाची असतात, तिच्यातले सुप्त गुण दाखवण्यासाठी ती सतत धडपडत असते तिला सिद्ध करण्यासाठी, प्रयत्न करत असते पण सरड्याची धाव कुंपणापर्यंत. हळूहळू ती वयात येते स्वप्न बघणं, नटनं, छान दिसणं हे गुण निसर्गानेच तिच्यात दिलेले असतात. पण तीचं नशीब शेवटी दुस-यांच्याच हातात असते. लग्न होत साथीदार चांगला मिळाला तर स्वर्ग....! नाहीतर नरक यातना जिवंतपणी तिला भोगाव्या लागतात. सगळ्यांच्या अपेक्षा सगळ्यांची जबाबदारी तिच्या नाजूक खांद्यावर टाकली जाते, सून घरात आली म्हणजे free फ्री कामवाली बाई मिळाली तिने सगळ व्यवस्थितरित्या केलं पाहिजे तिच्याकडून थोडीशी जरी चूक झाली तरी मोठा गुन्हा झाल्यासारखा तिला बोलले जाते. ती कोणत्याही जबाबदारीत कमी पडली तर तुझ्या आई वडिलांना फोन करेन ही धमकी तिला ठरवलेली असतेच या सगळ्या विरोधात जर तिने आवाज उठवला तरी पक्ष्याचे पंख कसे छाटून त्याला जखमी केले जात तसच काहींच्या घरात स्त्रीबरोबर वागल जातं.. नव-याने कसही वागलं तरी चालतं... का तर त्याला टेन्शन असत पण बाईला टेंशनच नसत, ती कुठे बाहेर जाऊन थोडीच काम करते घरात बसूनच तर असते तिने भांडण केली तर बॅग भर आणि माहेरी जा तुझ्या....! असं बोलल जातं. पण तिनं आपलं अर्ध आयुष्य या घरासाठी दिलेलं असतं. नवरा बाहेर काम करत असताना मुलांना घराला आणि येणाऱ्या जाणाऱ्या सगळ्या समस्यांना ती एकटी तोंड देत असते, घरातच तिला रोजचच जीवन चार भिंतीतच रहाव लागत. इतक सगळ करूनही ते घर तिच्या हक्कच नसत.शेवटी सांगावस वाटत कितीही समाज सुधारला तरी आत्तापर्यंत काहींच्या घरात, स्त्रीला विचारात समान न्याय नाहीच मिळाला खरंच नाही मिळाला. इतिहासामध्ये अनेक महापुरुष स्त्रियांच्या हक्कासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी लढले आणि कार्य देखील केले पण अजूनही काही प्रमाणात स्त्रियांचे जीवन हे - 'चूल आणि मुल' एवढेच आहे....



# चंद्रावर संसार थाटण्यासाठी चीनची लगीनघाई



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**कवींच्या कल्पना विश्वास आणि मुलांच्या परीकथांमध्ये चंद्राला विशेष स्थान आहे. चंद्रावर सातत्याने संशोधन सुरु आहे. यामुळे दीर्घकालीन चंद्र संशोधनासाठी येथे लूनर बेस उभारणे गरजेचे आहे. चंद्रावर राहण्याचे मानवाचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. कारण येत्या पाच वर्षात चीन चंद्रावर घर बांधणार आहे. विशेष म्हणजे यासाठी चंद्रावरची माती वापरुन विटा बनवल्या जाणार आहेत. चंद्रावर लूनर बेस बनवण्याची चीनची योजना आहे.**


चंद्राच्या मातीपासून विटा बनवण्यासाठी एक टीम चायनीज सुपर मेसन्स नावाचा रोबोट तयार करत आहे. चंद्रावर पाणी नाही. तसेत येथे गुरुत्वाकर्षण देखील काम करत नाही. चंद्रावर वारंवार भूकंप आणि भयंकर वैश्विक किरणोत्सर्ग होत असतात. अशा परिस्थितीत चंद्रावर लूनर बेस विकसीत करताना संशोधकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. चीन अशा विशिष्ट मोहिमेवर काम करत आहे, जी यशस्वी ठरल्यास हा देश अंतराळ संशोधनात अग्रस्थानी असेल. येत्या दशकात चीनची अंतराळ संशोधनातील कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण असेल. सध्याचे युग विज्ञान-तंत्रज्ञानाचे आहे. तंत्रज्ञानाच्या जोरावर अनेक देशांनी विविध क्षेत्रांत प्रगती केली आहे.

याच तंत्रज्ञानाच्या जोरावर काही देश पृथ्वीवरच नव्हे तर चंद्रावरही घरे बांधण्याचा विचार करत आहेत. चंद्रावर नवीन वस्ती निर्माण करण्यासाठी शास्त्रज्ञ अथक परिश्रम घेत आहेत. यासाठी अनेक देश वेगवेगळ्या मोहिमा आखत आहेत. ५० वर्षांपूर्वी मानवाने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले आहे. आता आपल्या आर्टेमिस मिशन अंतर्गत पुन्हा एकदा मानवाला चंद्रावर पाठवण्यासाठी नासाने जोरदार तयारी सुरु केली आहे. तर चीनकडून चंद्रमोहिम आखली जात आहे. चंद्रावर संशोधनासाठी या देशांच्या जागा देखील निश्चित करण्यात आल्या आहेत. चंद्रावरील मानवी तळ कसा असेल याची कल्पना कितीही केली असली तरी वस्तुस्थिती मात्र अगदी पायाभूत आहे. चंद्रापर्यंत प्रवास अत्यंत खार्चिक आहे. यासाठी जे यानं लागेल त्याचं वजन जितकं जास्त तितकं त्याला लागणारं इंधनही जास्त आणि खर्चही जास्त असं हे गणित आहे. त्यामुळे इथं कायम राहता येण्यासारखं ठिकाण बनवणं जास्त योग्य ठरणार आहे. चंद्रावर कधीकाळी झालेल्या ज्वालामुखींच्या उद्रेकातील लाव्हा ट्यूब्जचा वापर राहण्यासाठी आणि चंद्राच्या भूपृष्ठाखाली दडलेल्या बर्फाच्या पाण्यापर्यंत पोहोचण्यासाठी करणं योग्य ठरणार आहे. चंद्रावरील बेसाल्टीक वाळू ही पृथ्वीवरील ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या वाळूसारखीच आहे, तिचाही उपयोग होऊ शकतो. चीनने ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडणाऱ्या राखेतून विटा बनवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. थ्रीडी प्रिंटिंगच्या मदतीनं या विटा बनवण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

या विटांतून इग्लूसारखा निवारा बनवता येईल.

या थ्रीडी प्रिंटिंगसाठी सौर ऊर्जा लागेल, त्यासाठी सूर्य किरणं पकडता यावीत यासाठी मोठी लेन्स लागणार आहे. लेन्सची संख्या वाढवून ही गती वाढवता येईल. तसेच या विटा एकत्र करून त्यातून स्ट्रक्चर बनवण्यासाठी आंतराळवीर किंवा रोबो लागतील. पण तरीही एक स्ट्रक्चर बनवण्यासाठी लागणारा वेळ मोठा असणार आहे कारण एक वीट बनवण्यासाठीच पाच तासांचा वेळ लागणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून चीन चंद्रावर अनेक मोहिमा यशस्वीपणे राबवित आहे. यापूर्वी चीनने २०१३ मध्ये चंद्रावर यान लँड केले होते. चीनने २०२० मध्येही एक चंद्रयान मोहीम राबवली होती. चांग ई-५ या मोहिमेच्या माध्यमातून सर्वप्रथम चंद्रावरून परीक्षणासाठी माती आणली होती. हे सर्व यान मानवविरहित यान होते. चीनची चंद्रावर प्रवासी माणसे पाठवण्याची ही चंद्रमोहीम अनेक टप्प्यातून



जाणार आहे. यासाठी चीनने चांग ई- ६, चांग ई-७ आणि चांग ई-८, मोहिमेचे टप्पे निश्चित केले आहेत. ही मोहीम २०३० पर्यंत राबवण्यात येणार आहे. यात चांग ई-८ ही मोहीम चीनची विशेष मोहिम असणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून चंद्रावर जाऊन माणसे राहू शकतील का, तिथे माणसासाठी अनुकूल वातावरण आहे का आणि तेथील जमिनीखाली खनिजे आहेत का याची माहिती गोळा केली जाणार आहे. चंद्रावर दीर्घकाळ राहण्यासाठी चंद्रावर काही स्पेस स्टेशन बनवण्याचा विचार चीन करत आहे. त्यासाठी तेथील वातावरणाचा विचार करून हे स्पेस स्टेशन बनवले जाणार असल्याचे समजते. तरीही चंद्रावर तळ स्थापन करणे आणि ते हस्तगत करणे यात खूप फरक आहे. तज्ज्ञांच्या मते, चीन किंवा इतर कोणत्याही राष्ट्राला चंद्रावर ताबा मिळवणे अशक्य आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय कायदे, तांत्रिक क्षमता आणि आर्थिक मर्यादा यांचा विचार करणे आवश्यक आहे. १९६७ मध्ये अंमलात आलेल्या अवकाश करारात खगोलीय गोष्टींवर कोणत्याही देशाचा अधिकार नाही असे स्पष्ट झाले

आहे . चीनसह तब्बल १३४ देशांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. या कराराचा कलम ३ राष्ट्रांना सार्वभौमत्व किंवा व्यवसायाच्या घोषणेद्वारे वैयक्तिक माध्यमांसाठी चंद्रावर आणि इतर खगोलीय पिंडांवर दावा करण्यास मनाई करते. चंद्रावर वातावरण नाही. त्यामुळे चंद्रावर वस्ती करताना माणसापुढे अनेक आव्हाने आहेत. चंद्रावर ऑक्सिजन मिळवणं हे एक आव्हान असणार आहे. चंद्राच्या खडकावर जे थर आहेत, त्यातून ऑक्सिजन मिळवता येईल. चंद्रावर तापमान उणे १२७ ते उणे १७३ सेल्सिअस आहे. तिथं गुरुत्वाकर्षण आणि किरणोत्सर्ग अत्यंत कमी आहे. चंद्रावर उर्जा मिळवण्यात ही अडचणी आहेत. पृथ्वीवरील २९ दिवस म्हणजे चंद्रावरील एक दिवस होय. म्हणजे सौरऊर्जेचा वापर करायचा झाला तर चंद्रावर २ आठवडे रात्र आणि २ आठवडे दिवस

असेल. चंद्रावर राहायचं झालं तर जे तंत्रज्ञान बनवायचं आहे, त्यात या परिस्थितीचा विचार करावा लागणार आहे. यापूर्वीही अनेकदा चंद्रावर माणूस राहू शकतो, अशा प्रकारच्या बातम्या आल्या आहेत. या दिशेने अभ्यास सुरू आहे. त्यामुळे भविष्यात चंद्रावर माणूस राहू शकेल, अशी शक्यता आहे. सद्यस्थितीत तरी दीर्घकाळ राहण्यासाठी चंद्र काही स्वागतार्ह जागा नाही.



## कोकोनट सरबत



**आवश्यक साहित्य :**
१ किलो साखर, ४०० मिली. पाणी, १/२ लहान चमचा सायट्रिक ॲसिड, १/४ लहान चमचा रासबेरी रेड रंग १/२ चमचा रोझ इसेंस,

**कृती :** प्रथम १ किलो साखरेमध्ये ४०० मिली. पाणी टाकून त्यात १/२ चमचा सायट्रिक ॲसिड घालावे. सर्व एकतर करून गॅसवर एक उकळी येईपर्यंत टेह्वावे. गार झाल्यावर त्यात रंग व इसेंस टाकावा व गाळून बातलीत भरावे. सरबत देताना पाव भाग त्यात केलेले लिक्विड आणि पाऊण भाग पाणी किंवा दूध घालावे.

## रवाकॉर्न बॉल्स

आधुनिक केसरी

लय भारी **सुगरण**



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

**साहित्य :** 1 वाटी रवा, अर्धी वाटी उकडलेले कॉर्न, 3 ते 4 हिरव्या मिरच्या, अर्धा इंच आले, 4 -5 लसूण पाकळ्या, अर्धा चमचा धनेजिरे पूड, चाट मसाला, कोथिम्बिर, मीठ, तेल. **कृती :** प्रथम गॅसवर दीड ते पावणे दोन वाट्या पाणी गरम करण्यासाठी ठेवावे. मग त्यात रवा घालून 15 ते 20 मिनिटे झाकून ठेवावे.थोडे थंड झाले की रवा मस्त फुगलेला असेल . आता कॉर्न जरा जाडसर वाटून त्यात आले ,लसूण, हिरवी मिरची बारीक करून घालावी . नंतर त्या मिश्रणात बारीक चिरून कोथिंबीर , धणे -जीरे पूड व मीठ घालावे. गॅसवर कढईत बॉल्स तळण्यासाठी तेल घालावे.तेल चांगले गरम झाले की त्यातील अर्धा डाव पिठात घालून लहान लहान बॉल्स करून मध्यम आचेवर क्रिस्पी होईपर्यंत तळून चाळणीत काढून मग ते सर्व्हिंग डिश मध्ये काढून चाट मसाला भुरभुरून टोमॅटो केचप बरोबर गरम गरम सर्व्ह करावेत. **वैशिष्ट्य :** हे क्रिस्पी बॉल्स खायला खूपच टेस्टी लागतात. खमंग व चटपटीत असल्यामुळे सर्वांना आवडतात. सुट्ट्यांमध्ये मुलांना मधल्यावेळी खायला करण्याचा मोठ्ठा प्रश्न छान सुटतो.



## ठंडाठंडाकूलकूल काकडीचेसरबत

आधुनिक केसरी

लय भारी **सुगरण**



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आपण काकडी, काकडीची कोशिंबीर, लोणचं, थालिपीठ, खिचडीमध्ये वापर केला आहे. पाण्याचा अंश सर्वाधिक असलेली काकडी म्हणजे भर उन्हात शरीराला थंडावा देणारी गोष्ट.

गारेगार गोड काकडी मीठ आणि थोडंस तिखट लावून कराकरा खायला जी मजा येते ती इतर कशातच नाही. कार्बोहायड्रेटस आणि कॅलरीजचे कमी प्रमाण यामुळे काकडी खाल्ल्याने आपले वजन कमी होण्यास मदत होते. काकडीमध्ये असणारे पोटॅशियम, फायबर, प्रोटीन, व्हिटॅमिन सी, व्हीटॅमिन, मॅग्नेशियम, पोटॅशियम, मॅंगनीज हे घटक चांगल्या प्रमाणात असतात. ( Summer Special ) त्यामुळे काकडी खाणे आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असते. ( गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती ) आपण काकडीच्या फोडी किंवा कोशिंबीर, लोणचं थालिपीठ खिचडीमध्ये नेहमी उपयोगात आणतो. नेहमीच आपण तीच तीच सरबत ट्राय करतो. आज काकडीचे सरबत. मी ट्राय करायचं ठरवलं.... घरी सगळ्यांना खुप आवडलं. **पाहूया सरबताची रेसिपी .-** काकडीचे गारेगार सरबत काकडीच्या फोडी खाणे किंवा कोशिंबीर याशिवाय काकडीचे सरबत तुम्ही कधी ट्राय केलंय ? याच सरबताची रेसिपी आज आपण पाहणार आहोत. काकडीचे सरबत

**साहित्य -** काकडी - १ , पुदिन्याची पूड ( optional ), लिंबाचा रस, काळं मीठ - अर्धा चमचा, बर्फाचे खडे - ३ ते ४, पाणी अर्धा ग्लास, धणे, जिऱ्याची पूड, पिठीसाखर, कोथिंबीरीच्या काड्या, पुदिन्याची पाने. कृती - मिक्सरच्या भांड्यामध्ये काकडीचे काप, कोथिंबीरीच्या काड्या, पुदिन्याची पाने, काळं मीठ, साखर धण्याची पूड, जिऱ्याची पूड, पिठीसाखर घालून आणि थोडं पाणी घालून बारीक फिरवून घ्या. वाटलेले मिश्रण गाळणीने गाळून त्यात पाणी, बर्फ, चवीनुसार लिंबू पिळून आवडत असल्यास सब्जाबी भिजवून घाला. थंडगार काकडीचे सरबत तयार. करून बघा आणि कळवा नक्कीच.





## ऑफ सीझन शेतकरी मजूरांचा



आता झाले बंद
कारखाने इकडे ।
निघाले ऊसतोड
मजूर गावाकडे ।।
नाही फिटलं मुकादमाचं ऋण।
कसा करू आखाजीचा सण।।
साखर तयार झाली यंदा कमी।
निर्यात बंदीचा
हुकुमीउपाय नामी।।
साखरेला आली बाजारात तेजी।
ब्राझीलने मारली
साखरेत बाजी।।
एफआरपीचे हप्ते
करती सहकारी।
खाजगीकडे दरासाठी
मारामारी।। हवामान वाल्यांनी
केले भाकीत।
अहो पाऊस येईल
काठी टेकीत ।।
पुढच्या वर्षी आहे
पावसाळा कमी।
ऊसाची लागण होते
यंदा कमी ।।
खोडवा पिकात नाही
मिळत टनेज।
होत नाही शेतकऱ्यांची
गोळाबेरीज।।
जर बनवाल इथेनॉल तर देऊ
ऊस। नाही इथेनॉल तर नाही
देणार ऊस ।।

रचनाकार : आहेर वा.र. नाशिक.
९९५८७८२९८२

## आठवण

धरणात जशी पाण्याची साठवण
तशी मनात आठवण
आठवणींच्या उभ्या आडव्या धाग्यांचे
आयुष्याला कोंदण

आठवण बालपणाची मस्त हुंदडण्याची
सवंगड्यांस माळावर स्वैर विहरण्याची
पुस्तकांतील चित्रांमध्ये भान हरवण्याची
अशाच एका आडवळणावर तहान हरण्याची


आईच्या वात्सल्याची अन पित्याच्या प्रेमाची
बंधू भगिनी आप्तांच्या स्नेहलबंधाची
आठवण आयुष्यावर काळजी धरलेल्या काळाची
आठवण पहिल्यांदाच पाहिलेल्या
निळ्या निळ्या डोळ्यांची

आठवण दूर गेलेल्या आणि जवळ असलेल्यांची
सोबत असूनही कधीच आपले नसलेल्यांची
डोळ्यांमधील हळूवार अश्रू पुसणाऱ्यांची
आठवण चढ उतारांची सुख दुःखाच्या गोष्टींची

आठवण रांगोळीसम असंख्य ठिपक्यांची
आयुष्याच्या सांजवेळी माणूसपण जपण्याची
मनात आठवणींचा वसत असतो गाव
त्या गावाची सफर करायला लागते मनाचीच नाव

प्रा.डॉ. संगीत दोंदे





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
राष्ट्रधर्माचे चैतन्यमय प्रतीक होते
'राष्ट्रसंत' नाव यथार्थ असणारे
संत परंपरेतील महान संत होते
अमरावती जिल्ह्यातील यावली गावात
चंद्रमौळी झोपडीत वादळात जन्मले
माता मंजुळा पिता बंडोजी
जन्मनाव 'माणिक' संतांनी ठेवले
बालपणीच अवगत केल्या
राष्ट्रसंतांनी योग संगीतकला
संतआडकोजींच्या गुरूकृपेने
माणिक 'तुकड्यादास' झाला
किशोरवयीन वयात राष्ट्रसंतांनी
अरण्यात केली तपसाधना
हटयोग, राजयोग, प्रेमयोग शिकूनी
'देवबाबा' म्हणून केली कार्यसाधना
रुद्रयाग यज्ञ करुनी सालबर्डीला
स्वातंत्र्यसंग्रामात उतरले चिमूर-आष्टीला
जेल भोगूनी केला विश्वशांती सप्ताह
श्रीगुरुदेव सेवा मंडळ स्थापले वरखेडला
युगग्रंथ ग्रामगीता रुचूनी
ग्रामविकासाचा पाया रचला
सैनिकांना प्रोत्साहन देऊन सीमेवर
महानिर्वाणदिनी जनतेला
'आर्त संदेश' दिला...

- सुनिल माथने
(ग्रामगीताचार्य),अकोला.
मो.9403282970

## माझं गाव-आराई

खुप भारी माझं गाव।
आरम तिरी त्याचा ठाव॥
ममता पेरलेली तिथे ठायी ठायी।
स्वर्गाहुनी असे सुंदर, नाव त्याचं आराई॥धृ॥

गावाची हो माझ्या काळी काळी माती।
मातीहुन सुंदर हिरवी हिरवी शेती॥
माती अनं शेतीची जैसी जिगरदोस्ती।
माणसांची तैसी इथे घट्ट घट्ट नाती॥ 1॥

माझ्या गावाची माणसं।
जशी मक्याची कणसं॥
बोलणं त्यांचं जरी असे न्यारं न्यारं।
मन प्रत्येकाची मात्र जणू प्रेमाचा सागर॥ 2॥

माय अहिराणी असे इथली शान।
तिच्या शिव्यांमध्येहीं भेटे, मजला अमृताची खाण॥
माझ्या गावाची कीर्ती, भिडली चहूदिशा पार।
त्याच्या दगडधोंड्यात देखील मायेची किनार॥ 3॥

मातीची इथल्या पुण्याई महान।
कुणी डॉक्टर -इंजिनियर, कुणी शेतकरी
-बिझनेसम्यान॥
गाव माझं असे संस्कारांची वखार।
इथली तरणीबांड पोरं जणू तलवारीची धार॥4॥

शेजारी बागलाण अनं सोबतीस मेळवन।
पाडानथळ, झुगली, खळवाडी आणि काटवन॥
किती नवीन नावांची असे जुगलबंदी।
गावामध्ये मात्र माझ्या, आनंदाची नांदी॥5॥

राजकारण इथला असे विषय जिव्हाळ्याचा।
सण उत्सवांचा नाद काय वर्णावा वेगळा॥
गावाकडे जाण्यासाठी होई मन माझं आतुरं।
आराई आमचं भासे मला, जणू काशी पंढरपूर॥6॥

मनिष आहिरे
आराई सटाणा नाशिक
7588069679

## झाड फक्त देत जातं

एकदा लावलं झाड की ,
ते फक्त देत जातं
आनंदाचं गाणंच जणू
आपल्या अंगणी गात राहतं

इवलसं असतं तेंव्हा
वाढववं लागतं मायेनं
एक दिवस सुखावून जातो
आपण त्याच्या छायेनं

श्रावणातल्या सरींनी
झाड जेंव्हा चिंब होतं
फुलांनी अन् फळांनी
रूप त्याचं बहरून येतं

आंबट गोड चवीची फळं
ऋतूनुसार झाड देतं
कधी होते पानझड
तर कधी नवतीने नटून जातं

मातीशी असलेलं त्याचं
नातं झाड तोडत नाही
मुसळधार पावसातही
मातीला ते कधी सोडत नाही

माती जपते झाडाला
अन् झाड जपते मातीला
काय आणि किती वर्णावं ?
या दोघांच्या प्रीतीला

ऊन, वारा, पावसातही
झाड सदैव उभच राहतं
मोडून पडलं जरी कधी
खोडा मधूनच पालवत जातं

झाडं, वेली जणू काही
लावण्याची खाण आहे
त्यांच्यामुळेच टिकून या
सजीव सृष्टीचा प्राण आहे

एक तरी झाड लावून
त्याला मोठं करूया
ओटीच जणू या धरतीची
आनंदाने भरुया
आनंदाने भरुया.....

-सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे, परभणी.

## महाराष्ट्र ...!



या मराठमोळ्या देशा
तुला मानाचा मुजरा
किर्तिवंत राष्ट्राकडे
आहे साऱ्यांच्या नजरा

हा सह्याद्री-सातपुडा
गातो तुझेच पोवाडे
गड-किल्ल्यातून इथे
पवित्र दर्शन घडे

कृष्णा, भिमा-गोदावरी
शेतीला जीवन देई
ज्ञाना, एकनाथ-तुका
भक्तीतून शक्ती होई

शूरविरांनी ही इथे
प्राणांची लावून बाजी
या राष्ट्रासाठी लढले
मावळे आणि शिवाजी

क्रांतीसाठीच गर्जले
फुले, शाहू-भिमराव,
या राष्ट्राचे मोठे केले
इतिहासामध्ये नाव

सुंदर वस्तु करणाऱ्या
कुशल कारागिरांचे,
शेतामध्ये राबणाऱ्या
हे राष्ट्र शेतकऱ्यांचे.

गुणीजनांची भूमी ही
पाहुनी होतीया दंग,
महाराष्ट्राच्या भेटीला
धावून येई पांडूरंग...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## शरीर थकाया लागलं या

आयुष्याची वाट निघाली सरतीला
पाठीवरचे ओझे लागले गळतीला
तोल जातोया धरणीला
वय लागलं आता परतीला
शरीर आता, थकाया.., थकाया..,
थकाया लागलं या
ओली चमडी ती
सुखाया.. सुखाया लागलीया
हाड ती काडावानी मुडाया आलीया
जीव हा वाऱ्या वादळातल्या
छत्रीवानी उडतोया
शरीर आता,
थकाया.., थकाया.., थकाया लागलं
या आता आधार, काठीचा या
जीवाला अंधार ही आहे सोबतीला
घोर नाही आता जीवाचा
शरीर आता, थकाया .., थकाया ..,
थकाया लागलं या
सोंगे किती जरी घेतले जवानीचे
वय बांधलया उतरनीच्या दावनीला
उगवता सुर्य जाणारच मावळतीला
तरणीबांड होणार जर्जरलेला
शरीर आता,
थकाया .., थकाया .., थकाया
लागलं या सरणावरती मडं होऊन
शरीर आता पडलं या
लाकडांनाही फुलं म्हणून अख्या
धडावर रचलं या
जळावा देह क्षणात म्हणून
काड्याकुड्याच्या सोबतीला गोवऱ्या
नि कापूरवड्याही घातलं या
शरीर आता, थकाया .., थकाया ..,
थकाया लागलं या

- लक्ष्मण वाल्डे कन्नड
मो.नं-8888606068



## उभ्या जगाचा पोशिंदा

करा विचार थोडासा शेतकऱ्याचा रे आज
उभ्या जगाचा पोशिंदा इथं मरतोय रोज..
उभं करपलं पीक झालं भकास शिवार
बाप रुसुनी चालला जगा कोणाचा आधार..
राजा गेला जीवानिशी पोरं बायको घेऊन
घे रे बोध सरकारा चिट्ठी जातांना लिहून..
तुझ्या व्यवस्थेचा झालो मीच पहिला रे बळी
आता नको पुन्हा येथे कोण्या दुसऱ्याची पाळी..
मी गेलोय रागारागा घर झाले निराधार
असा कसा येतो राग होतो जीवावर उदार..
पडे पाऊस घोषणांचा जळताना रे सरण
त्या पावसाने सांग किती वाचले मरण..
आज येते गारपीट कधी येते अवकाळी
पांढऱ्या सोन्यावरी पडे नित्यनेम बोंडअळी..
इथं नाही रे भरोसा पीक घरात येण्याचा
आल्यावरी ते घरात मातीमोल भाव त्याचा..
अरे दिला मी निरोप जाता जाता शासनास
नका फास घेण्या लावू राबणाऱ्या रे हातास..
तुटे तीळ तीळ जीव तळमळे आत्मा वर
लाखालाखाने येतांना भाऊबंद माझे वर..
ज्ञाना करी विनवणी पुन्हा सरकारा तूला
नको सोडू वाऱ्यावर जग पोशिंद्या बापाला..


ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो.९४०३३८४८८९



## आगगाडी

झुक झुक झुक
आली आगगाडी
सर्व प्रवाशांना
दूर गावी सोडी
गर्दी झाली बघा
आगगाडीत खूप
शिट्टी वाजता
सारे चिडीचूप
अतिवेगाने धावे
आमची आगगाडी
डोंगर, नदी, नाले
नि पळती हिरवी झाडी
नागमोडी वळणाचा
पार केला घाट
डुलत डुलत धावे
काय तिचा थाट
अंधार बोगदा आला
घाबरू नका कुणी
भरधाव वेगाने
धावते आमची राणी

- रवींद्र व्ही.
चालीकवार,
जि. यवतमाळ
मो.9011559106



## पाठीशी कृष्ण हवा

मौनानं होतं एवढं रामायण
हे माहीत असतं तर
शब्दांच्याच स्वाधीन झाले असते,
पण शब्दांनी नेली असती मिरवणूक
भलत्याच दिशेला.
शब्द म्हणजे अंध कौरव,
ओठात एक, पोटात भलतंच.
मौनाचं रामायण सहन करता येतं
सीता होऊन,
पण शब्दांचं महाभारत सोसायला
पाठीशी कृष्ण हवा.

नि

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत मुलींच्या संघाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये बावणे पांगरी येथील ऋषी महाराज आदर्श विद्यालयातील १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.विजयी संघास मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी,जालना टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव अंबादास गीते,टेनिस क्रिकेट संघटनेचे सर्व सदस्य, संस्था अध्यक्ष सुभाष बोडखे, सचिव प्रवीण बोडखे,प्राचार्य जाधव, क्रीडा शिक्षक राठोड आदी जणांनी विजेत्या संघातील मुलींचे अभिनंदन केले आहे. विजयी संघामध्ये साक्षी शिरसाठ (कर्णधार),पूजा मुटकुळे (उपकर्णधार), ऋतुजा चव्हाण, अंजली चिंचपुरे,आरती महाडिक, हर्षदा मोरे, स्नेहल हिवाळे,पायल हिवाळे, शुभांगी मुटकुळे, अंजली क्षीरसागर, प्रतिभा क्षीरसागर, धनश्री कदम या मुलींचा समावेश होता. यशस्वी मुलींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# स्व.विठाबाई नारायणगावकर आर्थिक विकास महामंडळ स्थापण्याची मागणी

## अजित पवार यांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राची लोककला, लोकसंस्कृती असलेल्या तमाशाकलेला लोकमान्यता, राजमान्यता मिळवून देणाऱ्या लोककलावंतांना वृद्धापकाळात सन्मानाने चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या निवास, भोजन, औषधोपचाराची सोय व्हावी, लोककलावंतांसाठी वृध्दाश्रम असावेत, त्यांना अल्पव्याजाने कर्ज मिळावे, मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी, शासकीय योजनांचा लाभ मिळावा, यासाठी तमाशासम्राज्ञी स्व. विठाबाई नारायणगावकर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधीमंडळ अधिवेशनातील चर्चेवेळी सरकारकडे तमाशासह सर्व लोककलावंतांसाठी महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली होती. परंतु सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने अजित पवार यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या मागणीचा पुनरुच्चार केला आहे.

तमाशा ही महाराष्ट्राची लोककला, लोकसंस्कृती आहे. राज्यातील मागास, अतिमागास समाजातील कलावंतांच्या पिढ्यांनी त्यांच्या त्याग, समर्पणातून ही कला जिवंत ठेवली, वाढवली, समृद्ध केली. तमाशा कलेला लोकमान्यता, राजमान्यता मिळवून दिली. या तमाशा कलावंतांसह राज्यातील समस्त लोककलावंतांच्या मान-सन्मानाकडे, हक्कांकडे, विकासाकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे असेही अजित पवार यांनी पत्रात म्हटले आहे. तमाशा कलेला समृद्ध, लोकप्रिय करण्याच्या कार्यात तमाशासम्राज्ञी स्व. विठाबाई नारायणगावकर आणि त्यांच्या कुटुंबियांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या ज्येष्ठ बंधूंना राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. तमाशा कलेची आयुष्यभर सेवा करणाऱ्या स्व. विठाबाईंचे अखेरचे दिवस हलाखीत गेले. बहुतांश लोककलावंतांच्या वाट्याला हेच दुःख येते, त्यांच्या आयुष्याचा शेवट हलाखीत जातो. हे टाळण्यासाठी लोककलावंतांसाठी वृध्दापकाळात राहण्याची, जेवण्याची, औषधांची व्यवस्था केली पाहिजे. त्यांच्यासाठी वृध्दाश्रम, अल्प व्याजदरात कर्ज, मोफत आरोग्य सुविधा, मुलांच्या शिक्षणाची सोय असली पाहिजे. शासनाच्या विकासयोजनांचा लाभ कलावंतांपर्यंत पोहोचवला पाहिजे. त्यासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची गरज आहे. राज्यातील लोककलावंतांकडूनही सातत्याने ही मागणी होत आहे. राज्य शासनाने नुकत्याच घोषित केलेल्या सात महामंडळांबरोबर या महामंडळाचीही घोषणा होईल, ही अपेक्षा होती. परंतु, तसे न घडल्याने, राज्यातील लाखो लोककलावंतांचा अपेक्षाभंग झाला आहे असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आपले मुलगा / मुलगी सद्य परिस्थितीत स्वतःचे सरंक्षण करण्यात सक्षम आहेत का ?
त्यांना तनाने आणि मनाने कणखर बनवण्यासाठी आम्ही येतोय आपल्या जवळच
विश्वस्त जागृत हनुमान मंदीर, विद्यानगर यांच्या सौजन्याने
जूदो प्रात्यक्षिक
आणि
मोफत जूदो व स्वःसरंक्षण शिबीर
१ मे ते ७ मे २०२३ पर्यंत
स्थळ : जागृत हनुमान मंदीर, विद्या नगर
आयोजक
औरंगाबाद जिल्हा जूदो संघटना
श्री. अजित मुळे – अध्यक्ष
श्री. अतुल बामनोदकर – सचिव, ब्लॅकबेल्ट प्रशिक्षक
श्री. दत्ता आफळे – ४ दान ब्लॅकबेल्ट व चेअरमन तांत्रीक समिती
श्री. चंद्रशेखर पोळ – ब्लॅक बेल्ट, प्रशिक्षक
श्री. दत्तु पवार – प्रशिक्षक
सौ. दिप्ती शेवतेकर-नावंदे – ब्लॅकबेल्ट, राष्ट्रीय प्रशिक्षक
मुंबई पब्लीक ट्रस्ट क्रमांक F-779 (सो. रजि. क्र. MAH-28/8/-AGD) सलग्न महाराष्ट्र जूदो संघटना
अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. चंद्रशेखर पोळ 9158882849, श्री. दत्तु पवार 992388839
श्री.अतुल बामनोदकर - 9881067338

# सावळदबारा परिसरात पिकांना गारपिटीने झोडपले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात व सोयगाव तालुक्यात बुधवारी दि.२६/४/२३ वादळाचा मोठा तडाखा बसला. त्यानंतर गुरुवारी दि.२७/४/२३ ला सावळदबारा परिसरात पुन्हा जवळपास १४ ते १५ गावांत अर्धा तास गारपीट झाली. सोबतच वादळी पावसाचा जोरही कायम राहिला. त्यामुळे सावळदबारा व सोयगावसह परिसरात शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले. फळबाग पिकांना मोठा फटका बसला आहे.

देव्हारी,डाभा,मोलखेडा, नांदा गाव, टिटवी, पळसखेडा,जामठी,घाणेगांव तांडा आदी १५ गावांत गुरुवारी दुपारी जोरदार गारपीट झाली. गारांचा आकार लिंबासारखा होता. गारपीट. सावळदबारा व सोयगाव शहरासह परिसरात बुधवारी रोजी वादळी पावसाचा पंधरा गावांना तडाखा बसला आहे. सोयगाव शहर तब्बल अर्ध्या तास वादळाच्या विळख्यात अडकले होते. या वादळाचा सोयगाव, फर्दापूर, जरंडी, निंबायती या चार गावांना मोठ्या प्रमाणात तडाखा अधिक बसला. जरंडीसह परिसरात गारपीट झाली.




# जिल्हा परिषद उच्च प्रा.शाळा मल्हाराला संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हाराला संत गाडगेबाबा ग्राम स्वछता अभियान 2022-2023 स्पर्धेत ग्राम मल्हारा आणि आय. एस. ओ जिल्हा परिषद उच्चं प्रा. शाळा मल्हारा पं. स. अचलपूर, शाळा स्पर्धेत अमरावती जिल्हा मधून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला तर अचलपूर तालुक्यातुन प्रथम पुरस्कार ग्राम मल्हारा आणि आय. एस. ओ. जिल्हा परिषद शाळेला मिळाला. गावचे प्रथम नागरिक सरपंच नारायणराव बोरेकार, अध्यक्ष उत्तमराव शेळके ( शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ) प्रमुख अतिथी दीपकराव तायडे ( उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती ) ग्राम विकास अधिकारी आमझरे साहेब, मुख्यद्यापक कु. शीला सोळंके, केन्दप्रमुख श्रीकृष्ण उघडे सर, जिल्हा पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक बबलू कराळे, शिक्षक कल्पना चौधरी, बबिता पंडित, रुपलाल बेठे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे, यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान पुरस्कार शाळा व गावा संबंधी मोलाची कामगिरी पार पाडली.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# सौर ऊर्जा निर्मिती योजना संपूर्ण राज्यासाठी लाभदायी

## भाजपा प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0' या सौर ऊर्जेद्वारे 7000 मेगावॅट वीज निर्माण करून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याच्या शिंदे-फडणवीस सरकारच्या योजनेच्या परिणामांमुळे शेतकऱ्यासोबत संपूर्ण राज्याला लाभ होणार आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आणि महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी शनिवारी जळगाव येथे पत्रकार परिषदेत केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0 हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानास आणि त्या अंतर्गत 'मिशन 2025' ला नुकतीच उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरुवात झाली. या अभियानात सौर ऊर्जेचा वापर करून डिसेंबर 2025 पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान 30 टक्के कृषी फीडर्स सौर ऊर्जेवर चालविण्यात येतील. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा व भरवशाचा वीजपुरवठा होईल, अशी




माहिती मा. विश्वास पाठक यांनी दिली. ते म्हणाले की, या अभियानात राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून शेतकऱ्यांसाठी 7000 मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येईल व ती कृषिपंपांना पुरविली जाईल. त्यासाठी राज्यात वीजनिर्मिती क्षेत्रात 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. सौर ऊर्जा प्रकल्पांची उभारणी आणि देखरेख यासाठी ग्रामीण भागात हजारो रोजगार निर्माण होतील. सौर उर्जेचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी महावितरणच्या उपकेंद्रांची कार्यक्षमता वाढविण्यात येईल. ज्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात येतील त्यांना विकासकामांसाठी पाच लाख रुपये देण्यात येतील. मुख्यमंत्री सौर उर्जा वाहिनी योजना 2.0 या अभियानाचे व्यापक परिणाम होतील. त्यांनी सांगितले की, या अभियानाचे आर्थिक लाभही महत्त्वाचे आहेत. महावितरणला सरासरी साडे आठ रुपये प्रति युनिट दराने मिळणारी वीज शेतीसाठी सध्या सरासरी दीड रुपये प्रती युनिट या सवलतीच्या दराने पुरविली जाते. दरातील फरक राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांसाठीच्या वीजदरावर लावलेला क्रॉस सबसिडीचा भार यातून भरून काढला जातो. सौर ऊर्जेद्वारे मिळणारी वीज सुमारे तीन रुपये तीस पैसे प्रति युनिट दरापर्यंत मिळणार असल्याने भविष्यात उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन उद्योग – व्यवसायांना स्पर्धात्मक दरात वीजपुरवठा होऊ शकेल. शेतीसाठीच्या दरांमध्ये बदल होणार नाही आणि दुसरीकडे उद्योगांसाठीचे वीजदर कमी करण्याची संधी असा मोठा आर्थिक लाभ या अभियानामुळे होणार आहे. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने देऊन हेक्टरी सव्वा लाख रुपये वार्षिक भाडे मिळविण्याची शेतकऱ्यांना संधी मिळेल. कृषी क्षेत्राला मदत, उद्योगांना रास्त दरात वीजपुरवठा, ग्रामीण विकास, वीज वितरण जाळ्यात सुधारणा आणि राज्य सरकारवरील अनुदानाचा बोजा कमी करणे असे या योजनेचे अनेक लाभ आहेत. त्यामुळे योजनेचा शेतकऱ्यांसोबत संपूर्ण राज्याला लाभ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, तांत्रिक व आर्थिक कारणांमुळे कृषिपंपांना दिवसा आणि रात्री असा वीजपुरवठा केला जातो. रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे शेतीसाठी दिवसा आठ तास भरवशाचा वीजपुरवठा व्हावा अशी अनेक वर्षांची मागणी आहे. त्यासोबत क्रॉस सबसिडीचा भार कमी करून उद्योगांना स्पर्धात्मक दरात वीजपुरवठा करावा अशीही मागणी आहे. ही समस्या सोडविण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळात जून 2017 मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली होती. त्या योजनेची अंमलबजावणी महावितरणमार्फत चालू आहे. आता 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# स्वस्त दुकानावर कारवाईसाठी मनसे तालुकाध्यक्षांचा आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आमखेडा येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानामार्फ़त सर्व सामान्य जनतेला सणासुदीला व नियमित शिधा वाटप न करता सतत दुकान व ई पॉश मशीन बंद असल्याची बतावणी करून शासकीय धान्य काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या शासनमान्य दुकानावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या पुरवठा अधिकाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र दिनी (दी.१ मे) महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोयगाव तालुका अध्यक्ष रामा सुभाष एलिस यांनी तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा ईशारा दिला आहे.



या प्रकरणी त्यांनी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे, महाराष्ट्र राज्य,विभागीय महसूल आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी -छत्रपती संभाजीनगर व जिल्हा पुरवठा अधिकारी -छत्रपती संभाजीनगर, यांना प्रत्यक्ष निवेदन दिली आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष रामा एलिस यांनी सोयगाव तहसीलदार यांना १० एप्रिलला निवेदन देऊन हिंदू - मुस्लिम समाजाच्या अक्षय तृतीया (आखाजी) व ईद येऊन ठेपली असतांना आमखेडा येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानदार आपले दुकान बंद ठेऊन आहे. त्यामुळे गोर गरीब शिधापत्रिका धारक शासकीय शिध्यापासून वंचित आहेत. तसेच जनतेशी उर्मट भाषेत बोलणाऱ्या व मनमानी करणाऱ्या दुकानाचा परवाना रद्द करण्यात येऊन त्यास पाठीशी घालणाऱ्या तालुका पुरवठा अधिकारी नाना मोरे यांची चौकशीअंती व कारवाई करण्याची मागणी केली होती.

सोयगाव तहसील प्रशासनाने वेळकाढू धोरण राबवून अद्याप चौकशी व कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे सोयगाव तहसीलदार, पुरवठा अधिकारी व स्वस्त धान्य दुकानावर यांच्यावर कारवाई व्हावी यासाठी मनसे तालुका अध्यक्ष रामा एलिस यांनी आता प्रशासनाच्या तुघलकी कारभाराविरुद्ध महाराष्ट्र दिनी (दी.१ मे) स्वतःला पेटवून घेऊन आत्मदहन करण्याचा ईशारा दिला आहे. निवेदनाच्या प्रति महसूलमंत्री राधाकृष्ण विखे, महाराष्ट्र राज्य,विभागीय महसूल आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी - छत्रपती संभाजीनगर व जिल्हा पुरवठा अधिकारी -छत्रपती संभाजीनगर, प्रत्यक्ष भेटून देण्यात आल्या आहेत




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# पंढरपूर बाजार समितीच्या निवडणुकीत सत्ताधारी गटाचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या निवडणुकीत परिचारक गटाने विरोधी गटाचा धुवा उडवत सर्व जागा वरती विजय मिळवण्यात यश आले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी शेतकऱ्यांना उभा राहण्यासाठी शासनाने तसा अधिकार दिला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीवर माजी आमदार प्रशांत परिचारक गटाचे वर्चस्व राखण्यात यश आले आहे तरी

यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिजीत पाटील आणि विठ्ठल परिवाराला एक ही जागेवर विजय मिळवण्यात अपयश आले असल्याचे दिसून येत आहे. गेल्या अनेक वर्षापासून माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या गटाचे वर्चस्व असून कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेदाण्याचे सौदे तसेच डाळींब आणि भाजीपाल्याचेही लिलाव होत असल्यामुळे कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असूनही शेतकऱ्यांना पाहिजे तशा सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हा विजय पांडुरंग परिवार व परिचारक गटांचा असल्याचे बोलले जात आहे.



# मन की बातच्या शतकी कार्यक्रमाचे साक्षीदार व्हा

## केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून जनसंवाद, जनसहभागाचा अनोखा प्रयोग केला आहे. 'मन की बात' द्वारे विकासाच्या प्रक्रियेत सामान्य माणसाचा सहभाग वाढवण्याबरोबरच देशहिताची विधायक कामे करणाऱ्यांना कौतुकाची थाप देत पंतप्रधान मोदी यांनी देशाच्या विविधरंगी भाषिक, प्रादेशिक संस्कृतींचा संगम साधला आहे. अशा 'मन की बात' चा १०० वा भाग उद्या ३० एप्रिल रोजी सादर होणार असून या ऐतिहासिक क्षणाचे सर्वजण साक्षीदार व्हा, असे आवाहन केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी शनिवारी केले. मुंबई भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष आ. प्रसाद लाड, आमदार श्रीकांत भारतीय, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

गोयल यांनी सांगितले की ३ ऑक्टोबर २०१४ ते ३० एप्रिल २०२३ असे सलग १०० महिने महिन्यातील एका रविवारी पंतप्रधान मोदी नभोवाणीवरून 'मन की बात' द्वारे जनतेशी संवाद साधत आले आहेत. 'मन की बात' मधून आपल्या भावना व्यक्त करतानाच पंतप्रधान मोदी सामान्य जनतेच्या अपेक्षा, सूचना एकाग्रतेने ऐकतात. एखाद्या सर्वसामान्य माणसाने, संस्थेने, गावाने केलेल्या असामान्य कार्याचे कौतुक करून सर्वांना प्रेरित करण्याचे अनोखे काम पंतप्रधान मोदी 'मन की बात'च्या माध्यमातून करतात. कोरोना काळात सामान्य माणसाला धीर देणे, कोवीड योद्ध्यांना प्रोत्साहित करणे, लसीकरणाचे आवाहन करणे हे कामही 'मन की बात' मधून मोदी यांनी केले. या कार्यक्रमात राजकारण पूर्णतः बाजूला ठेवले जाते.

# 1 मेपासून मेट्रो प्रवासात सवलत : मुख्यमंत्री शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मेट्रोमधून आता ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रवास करता येणार आहे. एक मे महाराष्ट्र दिनापासून 25 टक्के सवलत त्यांना मिळेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मुंबई 1 नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड वापरणाऱ्या श्रेणीतील हजारो प्रवाशांना ही सवलत मिळणार आहे. महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड आणि एमएमआरडीए यांच्यातर्फे महाराष्ट्र दिनाची ही भेट असणार आहे. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि दिव्यांग प्रवाशांना 45 ट्रिप किंवा 60 ट्रिपसाठी पासवर ही सवलत मिळेल.
यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांच्या गरजा आणि सुरक्षितता लक्षात घेऊन आम्ही मुंबई मेट्रो नेटवर्क तयार केले आहे, त्यामुळे त्यांना या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ मिळणे आवश्यक आहे. आम्ही यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत केला आहे. तर महिलांना सुद्धा एसटी बसेसमधून 50 टक्के तिकीट दरात प्रवासाची सवलत दिली आहे. सामाजिक भावनेतून हा निर्णय घेतला आहे. मेट्रो प्रवासातील या सवलतीमुळे देखील अधिक संख्येने लोक यातून प्रवास करतील अशी आशा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ही सुविधा 65 वर्षांवरील वरिष्ठ नागरिक, इयत्ता बारावीपर्यंत शिकणारे विद्यार्थी आणि दिव्यांग लोकांसाठी आहे. या तीन श्रेणीतील प्रवाशांना सवलतीसाठी काही कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. दिव्यांगांसाठी सरकारी/वैद्यकीय संघटनेचे प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाचा पुरावा आणि विद्यार्थ्यांसाठी पॅन (विद्यार्थी किंवा पालक पॅन) सोबत शाळा ओळखपत्र यासारखी वैध कागदपत्रे आवश्यक आहेत.

# कन्नड तालुक्यात पुन्हा वादळ वाऱ्याने कहर

## तहसीलदार कवडकर यांनी नुकसानीची केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यामध्ये गेल्या दोन दिवसापासुन वादळ वाऱ्या सह पावसास सुरवात झाली पुन्हा शेतकऱ्यांना नाहक मनस्ताप सोसावा लागत आहेत तालुक्यात विविध भागात पावसाना ठिक ठिकानी शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची चांगलीच भंभेरी उडताना दिसून येत आहे काही ठिकानी झाडे उळमुन पडले आहे घरावरचे पत्रे देखील पडले आहे हतनुर येथे चारचाकी वाहनावर झाड पडल्याने वाहनाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे याचे अनुशंगाने कन्नड चे तहसीलदार विदयाचरण कडवकर यांनी चापानेर येथील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. तहसीलदार यांनी मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक संबधीत अधिकारी यांनी मुख्यलयी राहुन नुकसानीचे पाहणी करावे, असे आदेश ही दिले, अशी ही माहीती समोर येत आहे चापानेर येथे तहसीलदार विदयाचरण कवडकर यांच्या सोबत मंडळ अधिकारी सचिन भिंगारे,तलाठी नामदेव कुसनुरे, एस .बी.जठार शेतकरी यांची उपस्थीती होती.



# मालेगावात पुन्हा गारपीट, अवकाळी पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** शुक्रवारी सायंकाळी तालुक्याच्या काटवन भागात विजांचा कडकडाट,गारपीट व वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. अनेक घरांची पत्रे उडून गेली तसेच झाडे उन्मळून पडली. सततच्या अस्मानी संकटामुळे शेती पिकांना फटका बसत असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. मालेगाव तालुक्यातील कजवाडे, रामपुरा, पोहाणे, विराणे, चिंचवे, गारेगाव, वडनेर, खाकुर्डी तसेच बागलाण तालुक्यातील चिराई, महड, बहिराणे, टेंभे आदी परिसरात अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. एक ते दीड तास हा पाऊस बरसत होता. काही ठिकाणी गारपीटही झाली. तसेच बराच वेळ सोसाट्याच्या वारा सुरु होता. त्यामुळे काही घरांच्या छतावरील पत्रे उडून गेली. कांदा चाळी,पोल्ट्री व्यवसाय,हरितगृह व शेडनेट शेतीचेही मोठे नुकसान झाले आहे. काटवन भागात गेल्या महिन्याभरात दोन तीन वेळा अवकाळी पाऊस झाला आहे. या पावसामुळे काढणीला आलेले कांदा पीक व फळबागांचेही नुकसान झाले आहे.

# दहा लाखांसाठी सासरच्यांकडून सुनेची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मालाड येथील मालवणी हा परिसर अत्यंत गजबजेला परिसर आहे. मुंबईसारख्या शहरात गुन्हेगारीचे प्रमाणही जास्त आहे. पण तरीही पोलीस प्रशासन गुन्हेगारी आटोक्यात आणण्याचे सतत प्रयत्न केले जातात. पण तरीही शहरातल्या गुन्हेगारीच्या बातम्या सतत समोर येतच असतात. आताही अशीच धक्कादायक घटना मुंबईतील मालवणी परिसरात घडली आहे. स्वतःच्याच मुलाला दिलेल्या पैशांसाठी सुनेची हत्या करण्यात आली आहे. मुंबईतील मालाड येथील मालवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील स्कॅटर कॉलनीत ही घटना घडली. गुरुवारी रात्री सासरा, त्याची आई आणि त्याच्या बहिणीने मिळून सुनेची हत्या केली.10 लाखांच्या व्यवहारातून सून आयेशाची हत्या करण्यात आली. याप्रकरणी मालवणी पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे.

# गटशिक्षणाधिकारी नाळे यांच्यावर कारवाई न झाल्यास 1 मे रोजी राष्ट्रवादी युवक काँग्रेस करणार तमाशा आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** येथील भ्रष्ट व मुजोर गटशिक्षणाधिकारी नाळे यांच्या गैरकारभारविरुद्ध व मुजोरपणाच्या वर्तुणूक बाबतीत शिक्षणाधिकारी साहेब जिल्हा परिषद सोलापूर यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने कारवाईसाठी निवेदन देण्यात आले होते परंतू अद्याप त्यांच्यावर कोणत्याही स्वरूपाची कारवाई करण्यात न आल्यामुळे त्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार केला आहे. आपण जर गटशिक्षणाधिकारी नाळे यांच्या कार्यकाळातील सर्व शाळांचे आर्थिक व्यवहारांची तपासणी न केल्यास दि.1 मे 2023 रोजी महाराष्ट्र दिनादिवशी लोकशाही मार्गाने पंढरपूर येथील पंचायत समितीसमोर शिक्षण खात्याचा तमाशा करणाऱ्या गटशिक्षणाधिकारी यांच्या विरोधात तमाशा आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांनी शिक्षणाधिकारी साहेब जिल्हा परिषद सोलापूर यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे दिलेला आहे. या पत्रात म्हटलेले आहे की, आम्ही राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने निवेदन देऊन ही या भ्रष्ट अधिकारी यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.केवळ कागदी घोडे नाचविण्याचे प्रकार घडत आहेत. त्यांना पाठीशी घालत आहात म्हणजे त्यांच्या वागणुकीला आपण पाठीशी घालत अस उघडपणे दिसत आहे मग आम्हाला संशय आहे उदा.ते 100 रुपये खात असतील तर त्यातील आपल्याला ही काही तर पोहच करत असतील अशी चर्चा जनतेतून ऐकावयास मिळत आहे. आधीच आम्हाला सांगण्यात येत होते हे आजपर्यंत आपण काही ही कारवाई न केल्यामुळे आम्हाला जाणवत आहे की जनता अन् शिक्षक बोलतात ते अगदी योग्य होते. त्यामुळे आपणास या पत्रानुसार आठवण करून देतो की गटशिक्षणाधिकारी नाळे यांच्याकडे कोणकोणत्या तालुक्याची जबाबदारी आहे त्या तालुक्यातील सर्व शाळांचे आर्थिक खर्च व ताळेबंद तपासणी करण्यात यावी तसेच पंढरपूर पंचायत समितीने दिनांक 8/12/2022 रोजी गोपनीय अहवाल सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करून ही 5 महिने होत आले तरी सुद्धा नाळे यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही म्हणून तर हा अधिकारी इतका मुजोर बनलेला आहे त्याला तात्काळ निलंबित करण्यात यावे व त्याचा सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू करण्यात यावी यासाठी प्रधान सचिव शिक्षण विभाग मुंबई, शिक्षण उपसंचालक पुणे यांच्याकडे लवकरच पाठपुरावा करणार असल्याचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.



**पंढरपूर पंचायत समितीच्या अहवालाला केराची टोपली :** विशेष म्हणजे नागरिकांच्या व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या आक्रमक पवित्र्यानंतर पंढरपूर पंचायत समितीने दिनांक 8/12/2022 रोजी गोपनीय अहवाल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करून 5 महिने होत आले तरी सुद्धा त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही म्हणजे पंचायत समितीच्या वतीने कारवाईच्या अहवालाला जिल्हा परिषदेत केराची टोपली दाखविली जात असल्याचेच म्हणावे लागेल अशी संतप्त प्रतिक्रिया श्रीकांत शिंदे यांनी दिली .



वडोद बाजार येथे चिंचोबा महाराज यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी भाविक चिंचोबा महाराजांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी करताना दिसून आले चिंचोबा महाराज च्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती यावेळी वडोद बाजार परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते चिंचोबा महाराज मंदिर परिसरात विविध दुकानाने थाटल्या होत्या ते पासूनच भाविक मंदिर परिसरात दर्शनासाठी येत होते.

# पिंपरी येथे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पिंपरी येथे भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त गुरुवारी ( दी.२७ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.तसेच डॉ. आंबेडकर यांच्या प्रतीमेची गावात सवाद्य मिरवणूक काढून जयजयकार करण्यात आला. यावेळी माळेगाव -पिंपरी ग्रुप ग्राम पंचायतीचे ग्रामसेवक व प्रशासक प्रफुल्ल गोरे, दादाभाऊ जाधव, अनिल जाधव, अंकुश जाधव, पोलिस पाटील मंगलदास अहिरे, रवींद्र परदेसी, संतोष पाटील, कृष्णा कोल्हे, दिलीप पाटील,निवृत्ती डवले, भाऊराव सावळे, प्रकाश सावळे,मधुकर मोरे यांची उपस्थिती होती.



# सिल्लोडचे पत्रकार तथा मराठी सिनेअभिनेते दशरथ सुरडकर यांना आर्ट् बिटस् फाउंडेशन महाराष्ट्रचा कला सन्मान पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** पुणे येथील आर्ट बिटस् फाऊंडेशच्या वतीने देण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठेचा कला क्षेत्रातील २०२२ चा कला सन्मान पुरस्कार सिल्लोड येथील सुप्रसिध्द मराठी सिनेअभिनेते, विद्रोही कवी, साहित्यिक तथा ज्ञानपंख वृत्तपत्राचे संपादक दशरथ सुरडकर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना तो पुरस्कार जाहीर झाला होता. तो पुरस्कार दशरथ सुरडकर यांना सिल्लोड येथील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाचे कर्तव्यदक्ष सहाय्यक जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पदक प्रदान करून नुकतेच त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी साप्ताहिक आपले ज्ञानपंख वृत्तपत्राचे सिल्लोड तालुका प्रतिनिधी संजय दांडगे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. दशरथ सुरडकर यांनी अनेक विषयावर लेखन केले असून त्यांनी मराठी चित्रपटात सुद्धा चांगल्या भूमिका केलेल्या आहे. तसेच साहित्य क्षेत्रातील कांदबरी, एकांकिका, काव्यसंग्रह अशी पुस्तके असून त्यांच्या सामाजिक, राजकीय, पत्रकारिता व साहित्यिक व कला क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन यापूर्वी अनेक संस्थांनी त्यांना सन्मानित केले आहे. त्यांना कला क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख तथा झेप संपादक, साहित्यिक, समीक्षक तथा कवी डी. एन. जाधव यांच्यासह अनेक मित्र मंडळींनी अभिनंदन केले आहे हे विशेष!

# वादळी पावसामुळे विमानाच्या १ तास आकाशातच घिरट्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गुरुवारी रात्री वादळी पावसामुळे वैमानिकाला नागपुरात विमान उतरवता आले नाही. त्यामुळे सुमारे एक तास ते विमान आकाशातच घिरट्या घालत राहिले. दिल्लीहून नागपूरला येणारे इंडिगोचे विमान रात्री नऊच्या सुमारास नागपूर विमानतळावर उतरणार होते. त्यासाठी वैमानिकाने हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला परवानगी मागितली होती. मात्र त्याचवेळी विजांचा कडकडाट आणि वादळ सुरू होते. त्यामुळे विमान उतरवण्याची परवानगी मिळाली नाही. वैमानिकाने सुमारे एक तास आकाशात घिरट्या घातल्या. प्रवाशांना नेमके काय होत आहे, हे कळत नव्हते. दिल्ली ते नागपूर अंतर सुमारे दीड तासांचे आहे. पण जवळपास अडीच तास विमान उडतच असल्याने प्रवाशांमध्ये भीती निर्माण झाली होती. रात्री सुमारे १० च्या सुमारास पाऊस थांबल्यानंतर विमान उतरवण्याची परवानगी मिळाली.



